संगीत कीर्तिसिंह नाटक.

संगीत कीर्तिसिंह नाटक.

मार्तंड नारायण आचार्य

यांनीं रचिलें.

तें

त्र्यंबक हरी आवटे

यांच्या

' इंदिरा ' छापखान्यांत छापिलें.

सन १९०९.

किंमत १ रुपया.

हें पुस्तक **मार्तंड नारायण आचार्य** यांनीं पुणें येथें **त्र्यंबक हरि आवटे** यांच्या “ **इंदिरा** ” छाप-
खान्यांत छापवून जिल्हा कुलाबा मुक्काम
नाडसूर येथें प्रसिद्ध केलें.

हें पुस्तक राजमान्य राजश्री हरि नारायण
आपटे करमणूककार यांस त्यांच्या
महाराष्ट्र वाङ्मयाधिकारित्वादि
गुणांवर लुब्ध होऊन ग्रंथ-
कर्त्यानें त्यांच्या परवान-
गीनें सादर व सप्रेम
अर्पण केलें आहे.

३१/३/१९३४

॥ श्रीशिवःशरणम् ॥

प्रस्तावना.

—:०:—

“ नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम् ”

कालिदास.

प्रस्तुत ग्रंथाचें संविधानक प्रसिद्ध इंग्रजी कवि स्कॉट याच्या “ दी टॅलिस्मन ” नांवाच्या ग्रंथावरून घेतलें आहे; व त्याचा संबंध राजस्थानच्या इतिहासाशीं जोडला आहे. तथापि यांतील विधानें ऐतिहासिकदृष्ट्या सर्वच खरीं आहेत असें म्हणतां येणार नाहीं. अर्थात् ऐतिहासिकदृष्ट्या प्रस्तुत ग्रंथाचें महत्व तादृश नाहीं हें वाचकांनीं पूर्ण लक्षांत ठेवावें. संगीत नाटकांचा जो मुख्य हेतु—अर्थात् मनोरंजनाचा—तो पुढें ठेवून ग्रंथाची रचना केली आहे. गद्यरचनेपेक्षां पद्यरचनेकडे यथामति पूर्ण लक्ष पुरविलें आहे. तें कितपत साधलें आहे हें ठरविणें रसिक व मार्मिक वाचकांकडे आहे. असो !

प्रस्तुत ग्रंथाच्या हस्तलिखित प्रती लो. टिळक, रा. रा. हरि नारायण आपटे व रा. रा. खाडिलकर या सद्गृहस्थांनीं तपासल्या व योग्य त्या सूचना केल्या याबद्दल त्यांचे आभार केवळ शब्दांनीं अथवा लेखनीद्वारें प्रगट करणें दुरापास्त आहे.

तसेंच इंदिरा छापखान्याचे मालक रा. आवटे यांनीं प्रस्तुत ग्रंथ शक्य तितक्या त्वेरेनें व काळजीनें छापून दिला याबद्दल त्यांचाही मी आभारी आहें.

शेवटीं ज्या जगच्चालक प्रभूनें मजसारख्या—केवळ निमित्तमात्र होऊन अहंकाराचा मात्र धनी होऊन बसणाऱ्या—परिमित—मतीकडून हा अल्प ग्रंथ पुरा करविला त्यांस सहस्रशः साष्टांग प्रणिपात करून ही लहानशी प्रस्तावना पुरी करितों.

मु. नाडसूर जि. कुलाबा
ता. १ जून १९०९ } **मार्तंड नारायण आचार्य.**

शुद्धिपत्र.

—:०:—

पृष्ठ.	ओळ.	अशुद्ध.	शुद्ध.
१३	१७	धनता	घनता
१५	२१	मग	मन
२३	८	येईल	येइल
२४	१७	संयोगी	संयोगीं
३०	५	जगतिच	जगतिचे
४२	८	आपद्गत	आपद्गत
४७	५	गणिती	गणितीं
,,	१५	तद्गत	तद्गत
५५	१९	भूपति कुलजा	भूपतिकुलजा
५७	१६	शोभनें	शोभने
६२	४	नेत्र लींला	नेत्रलीला.
६४	७	नयनां	नय ना
,,	१४	प्रेमबंधनीं	प्रेमबंधनां
६५	१६	वरा कां	वराकां
८९	८	सुहासनिर्वासित शशिशोभा	सुहासनिर्वासि-तशशिशोभा
९१	९	मानि	मानीं
९४	३	मी	ती

श्रीशिव:शरणम्

संगीत कीर्तिसिंह नाटक.

अंक पहिला.

नान्दी.

पद—राग काफी, ताल दीपचंदी.

गिरिजाननसुसरोजविहारी । तारक तो मदनारी ॥ धृ० ॥
भस्मतिलक ते भालिं जयाचे । विधुस गुणाहित दाविति साचे
गजमुखचुंबनकामी । संकटिं दासां सुसदय तारी ॥ १ ॥
विषयसुखातें दूर करुनियां ॥ तप आचरि जो ध्यान धरुनियां॥
त्रिनयन लोकहितैषी ॥ भव परि जो कीं अभव पुरारी॥२॥

पद—चाल—पञ्चतुण्डनररुण्ड मालधर.

प्रथमहराहितमानस कमलापतिला वंदन मी करितों ॥
भेदमतीतें भिन्न भासतो परि जो हरिही हर होतो ॥ध्रु०॥
मंदमती परि आविचारें मी महत्कारणीं मन धरितों ॥
प्रथितमहाजनयशोऽभिलाषां साध्य मानुनी अनुकरितों ॥
अक्षर जो, क्षरकार्यां कारण त्यांस प्रथम जो परि नमितो ॥
त्यांस सुयश दे स्वयें प्रभू तो, चिंतुनि हें धीरचि येतो॥१॥

नान्दी समाप्त

[सूत्रधार प्रवेश करितो.]

सूत्र०--- (स्वगत) ह्या रसिक व मार्मिक प्रेक्षकांकडे पाहून मी तर गांगरून गेलों आहें.

दिंडी.

नाट्यनैपुण्य न रसास्वाद नाहीं ।
परी मूढासम सुजन येथ बाहीं ॥
भ्रांत होई मन निंदितील मातें ।
निराशचि त्या जरि परतवी गृहातें ॥ १ ॥

(विचार करून) काय करावें ? माझ्या मठ्ठ डोक्याला इतकं कसं कळलं नाहीं ? आपणास जी गोष्ट अवगत नाहीं तिजविषयीं रिकामकी (रिकामी) फुशारकी मारावी तरी कशाला ? अरे ! पण हें माझ्या मनांतलें वाक्पांडित्य आणि तर्कशास्त्र काय करायचं आहे ? प्रेक्षकांना मी आतां काय सांगूं ? " आपणासारख्या रसिकांना निमंत्रण केलें; परंतु आम्हांला नाट्यकला बरोबर अवगत नाहीं. " असंच तोंडभरून सांगण्याची पाळी आली ना ? (दुःखानें)

साकी.

सुचताचि कांहीं मजला नाहीं अपकीर्तिच पसरेल ॥
लघुत्व येइल सज्जनिं मजला मानहि सकल सरेल ॥
नाहीं गति दुसरी ॥ आतां मरण बरेंच तरी ॥ १ ॥

(खिन्नवदन उभा राहतो.)

[नटी प्रवेश करिते.]

नटी—(स्वगत) आज हा काय चमत्कार ! असें मौन मी आलें असतां पूर्वी कधींच धरिलं नव्हतं. (उघड) प्राणनाथ इतकं गूढ काय पडलं आहे ?

ठुंबरी—चाल—कोन गलि गये शाम.

स्तब्धाचि कां दिसतां ॥ विकल ऐसे ॥ ध्रु० ॥
चित्रितसे सख्या अचल उभे कां मजसि वदा चिन्ता ॥१॥

प्रस्तुत कार्यीं अनुचित कांहीं, व्यग्र करी चित्ता ? ॥ २ ॥
विनति असे मम स्पष्ट वदावें, चरणिं असे प्रणता ॥ ३ ॥

(जवळ जाऊन) मग मला नाहीं का सांगायचें ?

सूत्र०--(प्रेमानें) प्रिये माझ्या चिंतेचें कारण तुजजवळ नाहीं तर दुसऱ्या कोणाजवळ सांगावयाचें ? हें पहा--

पद—चाल—सुटला पितृदिशेचा वारा.

रसिकां तोषवीन म्हणवुनी ॥
आणिलें नाटक विमले मनीं ॥
साहित्यकृपणता परी चित्तिं येउनी ॥
हें शंकित झालें मानस गे गुणखनी ॥ १ ॥

यामुळें मी अगदीं भांबावल्यासारखा झालों आहें.

नटी—इतकंच ना ? मी म्हटल काय आहे नि काय नाहीं. यांत कांहीं इतकी काळजी करायला नको.

पद—चाल—मागील.

आहे सिद्ध सर्व समयिं या ।
चिंता नलगे करणें प्रिया ॥
आज्ञापन केलें मला पाळिलें तयां ।
हें परिसुनि अपुली चिंता जावो लयां ॥१॥

सूत्र०—(सहर्ष) खरंच. मी अगदींच विसरलों होतों. नाटक करण्याचा प्रथमच प्रसंग असल्यामुळें मी विद्वानांच्या सभेकडे पाहून अगदींच स्तंभित झालों. त्यामुळें तुला सांगितल्याची मला मुळींच स्मृति राहिली नाहीं. परंतु तुझी दक्षता किती वर्णावी ?

पद—चाल—आज श्याम मोहे लिनो.

भाग्यवान मीच होय सकल वाटतें जनीं । कार्य-
चतुर होय प्राप्त तुजसमान गेहिनी ॥ध्रु०॥ विनय-

विनत अलसविरत शशिमुखी सुहासिनी ॥ पूर्व-
पुण्य हेतु असे खचित वाटतें मनीं ॥ १ ॥

नटी—(हंसून) पुरे. पुरे. कुणी ऐकेल. अलीकडे हरबऱ्याचीं झाडं इतकीं उंच कां वाढायला लागलीं आहेत ! बरं. आतां दुसरी काय आज्ञा आहे ?

सूत्र०—प्रिये ! आपल्या मधुर आवाजानें रसिकांचे मनोरंजनासाठीं समयोचित गायन कर.

नटी—आज्ञा प्राणनाथ.

पद—चाल- जन खुळावले.

अंध जाहले । आर्य कुपथिं मोहले ॥ ध्रु० ॥
सोडुनियां स्वाभिमान । परवस्तुस देति मान ॥१॥
भूषण तें यांत गमत । विद्येची हीच खूण ॥ २ ॥
द्वैतभाव आपणांत । उत्पादुनि भांडतात ॥३॥
तिसऱ्याचा होत लाभ । उमज न ये मुळिं मनांत ॥४॥

सूत्र०--प्रिये ! तुझ्या गायनांतील अर्थगांभीर्यानें प्रेक्षकसमूह संतुष्ट झालेला दिसतो. बरं. प्रिये ! तूं कोणत्या नाटकाची सिद्धता ठेविली आहेस ?

नटी--प्राणनाथ ! आपल्या आज्ञेप्रमाणें--

कामदा.

कीर्तिसिंह ज्यां बोधिलें जनीं ।
प्रणयरस जयां मुख्यभाजनीं ॥
वीररस असे अंतरालिं कीं ।
तेंचि योजिलें आज नाटकीं ॥ १ ॥

सूत्र०--(दूर निरीक्षण करून) प्रिये !

साकी.

कीर्तिसिंह हा सहपरिचारक आलासें मज वाटे ॥
युक्त न येथें उभें राहणें, जावें आपुल्या वाटे ॥
सखये निजसदनां ॥ जावे उचितचि गमत मनां ॥१॥

(जातात.)

प्रस्तावना पूर्ण.

कीर्तिसिंह व **वीर्यसिंह** शिपायाच्या वेषानें प्रवेश करतात.

कीर्ति०—वीर्यसिंहा ? आपणांस आपली राजधानी सोडून बरेच दिवस झाले. पुष्करतीर्थ यवनांचे हातून सोडवावें म्हणून जे रजपूत वीर समरांगणांत दंड थोपटून उभे राहिले त्यांस धर्मकार्यांत अंशतः तरी मदत करावी ह्मणून वडिलांच्या मताविरुद्ध—आह्मीं गुप्त वेषानें समरांगण गांठलें. रजपूत वीरांचे बाहूंत काय सामर्थ्य असतें तें मीं शत्रूस लढाईस तोंड देऊन अनेक वेळां दाखविलें. परंतु वीर्यसिंहा ?

पद—चाल-नागिणी चपललल जिव्हा.

वीर ते हरपले सारे । अवचितरे । विधिसारें ।
ये म्हणुनि चित्त माघारें ॥ धृ० ॥ धर्मरती जी
वीरनराली । सोडुनि सौख्यां रणीं निघाली । तिज
ने विलयां विधि कांरे ! ॥१॥

ते रणागणीं पडले असते तर मुळींच वाईट नव्हतें. परंतु मार्गांत हाल हाल होऊन–शिव ! शिव ! त्या समयाची आठवण झाली म्हणजे चित्तास फारच उद्वेग होतो.

वी०—सरकार ! दैवाची गति फार विचित्र आहे. झाल्या गोष्टींस इलाज नाहीं. तरी सरकारस्वारींनीं आतां निरर्थक खेद करूं नये. उलट सरकारस्वारीस अशा वेषांत पाहून माझ्या मनास फारच दुःख होत आहे. आपलें नांव गुप्त ठेवून महाराजांनीं या पुढें असल्या हलक्या वेषांत कालक्रमणा करूं नये अशी या नम्रसेवकाची विनंति आहे.

कीर्ति०—वीर्यसिंहा ? तुला इतकं वाईट कां वाटतं ?

वी०—सरकार ?

दिंडी.

पुष्टपरि ही कृश दिसे स्वामि काया ।
क्षीण झाला नृपवरा बहुत वायां ॥
म्लान दिसतें मुखकमल कमलनेत्र ।
देह दिसतो कीं सकल विकलगात्र ॥१॥

कीर्ति०—(हंसून) वा: हें वीर्यसिंहच कां बोलत आहे ? वीर्यसिंहा ! रजपूत वीर इतके कां नाजूक असतात ? अरे ! रजपूत वीर प्रसंगानुसार—

साकी.

सोडुनि शय्या सुखासनाची सेवितील वनवास ।
तृणहि भक्षिती देशोद्धारां कष्टविती जीवास ॥
क्षत्रियतेज असें । ज्ञात न तुज नच तें ऐसें ॥१॥

तर, वीर्यसिंहा ! धर्मकार्यार्थ देह झिजत आहे असें पाहून आम्हांस दुःख न होतां उलट आनंदाचें भरतें येत आहे. कारण—

पद—चाल— होतों द्वारकाभुवनीं.

सारीं सार्थ कीं जगतीं । योग्य तें कवी वदती ॥
सावधानें जरी सुमती । तयां परिसे सफल भासती ॥ध्रु०
दानें धनी जरि हो कृशधन, सुरपरिकरसेवितकल शशि जरि विकलचि, हेतिनिहत भट, सुरतें कृशतनु तरि युवती १

वीर्य०—(स्वगत) काय करणार या स्वच्छंदीपणापुढें ? असो. आतां दुसरी युक्ति योजून पाहूं. (उघड) सरकारस्वारीचा पराक्रम या नम्र दासास अगदींच विदित नाहीं असें नाहीं. परंतु प्रस्तुत

मोहिमेपासून कोणताही फायदा झाला नाहीं; आणि पुढेंही होईल असें वाटत नाहीं. कारण आपआपसांतच फाटाफूट.

कीर्ति०--(आश्चर्यानें) काय म्हणतोस? आपआपसांत फाटाफूट?

वीर्य०--होय सरकार. मोहिमेवर आलेले सर्व संस्थानिक महाराणा प्रतापसिंहाचा द्वेष करितात. इतकेंच नव्हे तर ते आंतून अकबरशहास फितूर आहेत असेंही माझ्या ऐकण्यांत आलें आहे.

कीर्ति०--(त्वेषानें) षंढानो ! रजपूत वीरांच्या उदरीं येऊन कुलांस डाग लाविलात. देशकार्यांत स्वार्थाचें घोडें ! आपआपसांत मत्सर ! तुमच्यासारखे कुलकलंक मत्सरी निपजले असतां देशाचें दुर्दैव ओढवलेंच म्हणून समजावें. मूर्खांनो तो रणशूर महाराणा कोणीकडे आणि तुमच्यासारखे शेंदाडशिपाई कोणीकडे ?--

साकी.

श्वानकाकबकसम तुम्हि सारे मृगाधिपति तो नृपती ।
द्वेष तयाचा करूं पाहतां, लाज कशी नच कुमती ॥
नसहे मूढाला । अथवा, सुजनसुयशमाला ॥ १ ॥

(विचार करून) असो ! वीर्यसिंहा ! तूं आतां तंबूवर जा. मला कांहीं गुप्त कामाकरितां अरण्यनाथ साधुमहाराजांकडे जावयाचें आहे.

वीर्य०--(स्वगत) काय करणार ! अनेक प्रकारें सांगून पाहिलें परंतु स्वारीचा हेका कायम तो कायमच. (विचार करून) हां ! आतां हीच युक्ति योजावी म्हणजे स्वारी बेतावर येण्याचा बराच संभव आहे. (उघड) सरकार, दासास कांहीं विनंति करावयाची आहे. आज्ञा असल्यास करितों.

कीर्ति०--(हंसून) वीर्यसिंहा ! तूं जरी आमचा नोकर आहेस तथापि माझा बालपणापासूनचा जिवलग स्नेही आहेस. तुला आज्ञेची अवश्यकता नाहीं.

वीर्य०--आज्ञा सरकार ! सरकारस्वारींनीं आजपर्यंत केलेले परा-

क्रम राजभगिनी मोहिनी ताईसाहेब यांच्या कानांवर गेल्यामुळें त्या वेळोवेळीं आपली स्तुति करीत असतात.

कीर्ति०–(स्वगत) माझ्यां मनांतलेंच निघालें. परंतु वीर्यसिंहा! त्या मनमोहिनीची स्मृति देऊन माझ्या कार्यांत मात्र व्यत्यय आणलास.

पद.––चाल– आलि कालि या मज तरुणदशा.

तापनिदानां करिशि विधानां ॥ धृ० ॥
येतां ध्यानीं भान हरोनी मोहविते शारदशशिवदना १
ज्ञात केविं तुज हें न असे कीं नामें केवल मोहवि ललना २

(उच्छ्वास सोडून) ईश्वरा! तुझी लीला अगाध आहे. असो! पण आपले खरें मन याला आतांच कळूं देता कामां नये. (उघड) वीर्यसिंहा! रजपूत वीर समरांगणांत असतां, असल्या गोष्टी त्यांच्या स्वप्नांतही येत नाहींत हें तुला अद्याप समजलें नाहीं काय? असो! ज्या अर्थी आम्ही तुला आज्ञा दिली आहे त्या अर्थी हरकत करीत नाहीं. हं. चालूं दे पुढें.

वीर्य०–(स्वगत) मात्रा थोडी तरी लागू पडली असें वाटतें. नाहींतर मला अधिक सांगण्यास मुळींच परवानगी दिली नसती. असो! आतां हें सांगून तरी काय होतें तें पहावें. (उघड) आणि त्यांचे प्रेम सरकार चरणीं जडलें आहे. असें माझ्या कानीं आलें आहे. परंतु सरकारस्वारीची खरी योग्यता त्यांस माहित नसल्यामुळें त्या साशंक होतात. तरी दासाची अशी विनंति आहे कीं सरकारस्वारींनीं शिपायाचा वेष टाकून आपलें खरें नांव प्रगट करावें म्हणजे सर्व सुयोग लवकरच जुळून येतील.

कीर्ति०–(स्वगत) वीर्यसिंहा! मी शिपायाचा वेष सोडावा म्हणून तूं आजपर्यंत अनेक उपाय योजलेस. परंतु हा शेवटचा मात्र रामबाण उपाय शोधून काढला आहेस. (उच्छ्वास सोडून) मदना! तुझी युद्धचातुरी अनिर्वर्णनीय आहे.

पद—चाल– गुरुजि तुमच्या प्रीतिस पार नसे.

करिशि मदना युद्ध अलौकिकसें। युद्ध अलौकिकसें॥ धृ०

निशितशराजित सुमनशरें नर पडती विकल कसे ॥१॥
अमित युवतिपदिं नमाविशी नरवर। अनतहि किंकरसे ॥२॥
युद्धविशारद तुजसम मदना। कोण जनीं विलसे ॥३॥

(विचार करून) असो! परंतु वीर्यसिंहास खरें मर्म इतक्यांतच कळूं देतां कामा नये. (रागाचा आविर्भाव आणून उघड) वीर्यसिंहा! तुलाच म्हणून गय करितों. इतक्या दिवसांचे सहवासांत तूं माझी हीच परीक्षा केलीस काय? आणि शिवाय रजपूत वीर लढाईवर असतां—

पद.--चाल- कांरे हरी तूं मज छळशी.

वश नच होती मदनाला। युवतिकटाक्षां नच ते
गणिती दूषविती नच सुमनाला ॥ ध्रु० ॥ गगनां-
तुनि वा इंद्रसभेंतुनि ॥ सुंदरी, जरि धरणिवरी,
अवतरति तरी, हे मदनारी, ॥ इंद्रियदमनीं दक्ष सदा
हे, ध्याति न ललनावदनाला ॥ १ ॥

वीर्य०-(नम्रतेनें) सरकारस्वारीस राग आला असल्यास सेवकांस क्षमा असावी.

कीर्ति०-अरे त्यांत राग कसला! परंतु असल्या गोष्टी मला आवडत नाहींत म्हणून जरा मोठ्यानें बोललों. त्यांत मी रागावलों असें समजूं नकोस. असो. तूं आतां तंबूवर जा. मला पण माझे कामास जावयाचें आहे.

वीर्य०--(स्वगत) आतां मात्र इलाज संपला. असो! स्वारीच्या नशिबीं जर कष्ट लिहिले असले तर ते कसे चुकणार (उघड) आज्ञा सरकार.

[**वीर्यसिंह** जातो].

कीर्ति०-(स्वगत) सुंदरी, तुझी योग्यता मला माहित असल्यामुळें उच्च कुलांत जन्मलेल्या तुजसारख्या सद्गुणखनीवर मजसारख्याचें प्रेम जडल्यास त्यांत आश्चर्य मानण्याजोगें कांहींच नाहीं. परंतु मोहिनी!

जगांस केवळ शिपाई म्हणून माहित असलेल्या (छातीस हात लावून) या कीर्तिसिंहाच्या कीर्तीचे तूं पोंवाडे गातेस त्याअर्थी तुझें अंतःकरण फारच गुणग्राही असलें पाहिजे. ज्याअर्थी महान् महान् संस्थानिकांस दूर लोटून या कीर्तिसिंहास जवळ ओढून धरतेस त्याअर्थी—

पद—चाल–वीरशिरोमणि सकल-धनुर्धरनायक.

मधुलोलुप तूं चतुर षट्पदी कमल मला मानिशी ॥
इतरां चंपक तूं समजशीं ॥ धृ० ॥ निशाचि अथवा
माझे ठायीं विधुत्व तूं पाहशी ॥ इतरां चण्डरश्मि
लेखिशीं ॥

बहु सेवक तुजला मिळतिल गे राजसे ॥
जे तत्पर तुजला तोषविण्या दाससे ॥
जे ध्यातिल तुजला निशिदिनीं गे मानसें ॥
सत्य; परी तूं गुणज्ञ, गंगा वरी सागरां जशी ॥
तेवीं मजला स्वीकारिशी ॥१॥

(उच्छ्वास सोडून) सुंदरी, तुजसारखी गुणवती माझ्या ललाटीं लिहिली असेल काय ? वा विधात्या ?––

पद––चाल–मित्रां मम जन्मकथा

शोभवील काय अंक हाच सुंदरी ॥
तोषवील एकांतीं रम्य मांदिरीं ॥ ध्रु ॥
कोमलकर ठेविल का कंठिं रसभरें ॥
प्रथमयोग तिजासिच कां कंप दे दरें ॥
प्रेम-कथागमितानिशा तिजसवें सरे ॥
अथवा हें स्वप्न होय मोहसागरीं ॥ १ ॥

(आठवल्यासारखें करून) अरे ! पण मी अगदींच विसरलों ! संस्थानिकांनीं दिलेला लखोटा घेऊन मला अरण्यनाथ साधूकडे

जावयाचें आहे. तरी धर्मकार्यांत व्यत्यय येईल असें मुळींच वागतां कामां नये.(गांभीर्य आणून) चञ्चल चित्ता—

पद—चाल—दृष्टि भरें जलभारे.

स्थीर जरा अनिवारा, स्वैरा, सुविचारां दे थारा, करि दूर मोहबाजारां ॥धृ०॥ धर्मरती तुज सुपथीं नेवो, स्वकरिं धरी तव पुनरपि ही असिदारा ॥१॥ सिद्ध समयिं या हो रिपु-दलनां, सोडि जरा अनुरागाविकल कुविचारां ॥२॥

तरी मना ! आतां धर्मकार्याची महती लक्षांत घेऊन आत्म-संयमन कर.

(जातो.)

प्रवेश **पहिला** संपूर्ण.

स्थळ—मोहिनीचा महाल.

[दोन दासी बोलत आहेत.]

सारजा—कायग गजे, ताईसाहेबांच्या वृत्तींत आतांशीं फेर झाले-ला तुला वाटतो कां ग ?

गजी—अग हो सारजे. आतांशीं पहिल्यासारखं मोकळं मन क-रून त्या आपल्याशीं तरी नीट बोलतात कां ?

सार०—कायग ! पण त्यांना असं झालय तरी काय बाई कुणास कळे ! राणासाहेब तर त्यांच्यावर रागावले नाहींत ना ? काय असेल ते असो बाई !

गजी—अग राणासाहेब त्यांच्यावर कसें रागावतील ! ताईसा-हेब ह्मणजे त्यांचा जीव कीं प्राण.

सार०—मग काय बाई झालं असावं ?

गजी—अग किनई मी तुला सांगतें आतांशीं आपल्या ल-ष्करांत कोणी कीर्तिसिंह म्हणून शिपाई आला आहे. तो बाई म्हण-तात फार शूर आहे. मागच्या लढाईंत त्यानं राणासाहेबांच्याही पुढें

जाऊन किती तरी मुसलमान एकट्यानें मारले. काल ताईसाहेब ललिताराणीसाहेबांकडे गेल्या होत्या. तेव्हां त्यांनीं मला बरोबर नेलं होतं. तिथें लढाईच्या गोष्टींत कीर्तिसिंहाचं नांव निघालं म्हणजे त्यांना आनंद झाल्यासारखा दिसे. तेव्हां मला वाटतं—

सार०—अग वाटायचं काय ! आतां मला सगळं समजलं, पण काय ग हें राणीसाहेबांच्या ध्यानांत आलंय कां ग ?

गजी--अग हो त्या ताईसाहेबांची थट्टा दिखील करीत होत्या.

सार०-अग तें सगळं ठीक आहे. पण हें जुळावं कसं बाई ? तो कीर्तिसिंह नुसता शिपाई आणि आपल्या ताईसाहेब तर प्रत्यक्ष राजकन्या.

गजी— खरंच गडे. (आठवल्यासारखें करून) पण अग आपण अगदींच विसरलों. आतां ताईसाहेबांची येण्याची वेळ झाली आहे. आतां यासंबंधीं कांहीं बोलतां कामा नये. (पाहिल्यासारखें करून) आल्याच वाटतें. (दोघी उठतात.)

[**मोहिनी** येते.]

मो०-सारजे, गजे; माझं आज कपाळ दुखत आहे. तुम्ही बाहेर असा. जरूर लागल्यास हांक मारीन.

दोघी—जी ताईसाहेब. (जातात.)

मो०-- (स्वगत) माझं मन अगदीं बुचकळ्यांत पडलं आहे. ते खरोखरीचे शिपाई असतील कां ? पण नुसत्या शिपायांत तसलं तेज कोठलं असणार. त्या दिवशीं स्वारी मैदानावर पहारा करीत होती तेव्हां मी प्रत्यक्ष पाहिलं--

पद--चाल-बलसागर तुम्ही वीरशिरोमणी.

वीररसाचि तो काय जगावरि वाटे अवतरला ॥
दर्पाविलरणदर्प हराया सहज जगीं आला ॥ ध्रु० ॥
मूर्ति गमे ती सुंदर चित्ता कामचि अवतरला ॥
घटनाविशारद बनवुनि जीतें सार्थ विधी झाला ॥
यापरि वाटे शृंगारासह वीराचि कीं रमला ॥
बनवुनि यापरि करिल कसा विधि सेवक वीराला ॥ १

(विचार करून)

अगबाई ! पण मला वेड तर नाहीं लागलं ना? ते जर खरेच सरदार असते तर अशा हलक्या वेषानें कां राहते ? मला बाई कांहींच कळत नाहीं. (प्रेमविवश होऊन) अथवा कांहीं कां असेना ! वीरधुरंधरा कीर्तिसिंहा !

पद--चाल-अरसिक किति हा शेला.

कोणी असा हो साचे । हें प्रेम मनाचें नोहे धनाचें ॥ध्रु०॥
सेवक जरि अन्याचे । तुह्मि झाला स्वामी या देहाचे ॥१॥
मूर्ती लोचनिं नाचे । ती आपुली मधुरा, मन्मथ जाचे॥२॥
सांगू किति मी वाचें । चिर अंतर होतां नच मी वाचे ॥३॥

(प्रेम विकल होऊन) बा मदना ! तुझें सामर्थ्य अबलांवर हत्यार उचलण्या पुरतेंच कां? यांत तुला कोणत्या पुरुषार्थाची जोड होणार ? पंचबाणा, मजसारख्या अबलेवर बाणांचा वर्षाव कां करतोस ?

पद—चाल-तेथेंच उभी कीं आलें.

निर्वीर सृष्टि कां झाली । कीं जोड तुला जगिं नुरली । ॥ रतिवरा ॥ संगरीं युवति ही वरिली । शुभ्रता कीर्तिची गेली ॥ रतिवरा ॥ सुमनें तव सायक झालीं । त्यां केवीं धनता आली ॥ रतिवरा ॥ चाल ॥ हें नसे । उचित तुज असें । बुधाला पिसें । वृत्ति बावरली । म्हणुनि ही विनति मी केली ॥ रतिवरा ॥ १ ॥

अथवा मदना ! तूं मला खुशाल पीडा कर. परंतु पक्षपात मात्र करूं नकोस. (विचार करून) काय करावं ? मला बाई कांहींच सुचत नाहीं. जरा मधुकरिकेला तरी बोलावणं पाठवावं. (उघड) गजे अग गजे.

[**गजी** येते.]

गजी—जी बाईसाहेब.

मोहिनी—अग, मधुकरिकेकडे जा आणि तिला म्हणावं मी बोलावलं आहे. समजलीस ?

गजी—जी ताईसाहेब. (जाते.)

मोहिनी—(स्वगत) मीं किती प्रकारें विचार करून पाहिला; पण कांहींच कळत नाहीं. इतका शूर पुरुष माझ्या कांहीं ऐकण्यांत आला नव्हता. आमचे दादा इतके शूर पण त्यांनाही त्यांनीं मागें सारलं आणि हें सारं तेज कुणाचं—शिपायाचं—छेः ! मुळींच नाहीं कांहीं तरी निराळं असलं पाहिजे. (स्तब्ध बसते.)

[**मधुकरिका** प्रवेश करिते.]

मधु०—(स्वगत) शेवटीं माझा तर्क खरा होऊं पहात आहे. मदना ! तुझं सामर्थ्य अलौकिक आहे.

कामदा.

सार्थ होशि तूं वाटतें मना ।
करुनि कीं सखी-देहमंथना ॥
मन्मथा तुझी युद्धचातुरी ।
पाहुनी रथी राहतिल दुरी ॥१॥

चार दिवसांपूर्वी ही कशी तेजस्वी दिसत होती ! पण आतांशीं अगदीं कोमेजलेल्या फुलासारखी झाली आहे. (उघड) मोहिनीताई ! इतका गूढ विचार कसला चालला आहे ? मी आलेली देखील माहित नाहीं ना ? (तिच्या खांद्यावर हात ठेवून)

पद—चाल–नच मातें कोणी स्नेही.

सखे चिंतातुर कां दिसशी। वद कांगे कांहिं न वदशी ॥धृ०॥ दुखवी कां कुणी बोलुनि तुजला म्हणुनी कोपित होशी ॥१॥ म्लानसुमनसम आनन झालें तव हें कां गुणराशी ॥२॥ वद गे मानसिं काय आणोनी स्वतनूतें शिणवीशी ॥३॥

मोहिनी—अग चिंतातुर कसली ? आज माझं कपाळ दुखतय, तेव्हां तोंड जरा उतरल्यासारखं दिसत असेल, दुसरं काय ?

मधु०-वाः ताई तुला बतावणी अगदीं छान करतां येऊं लागली !

मोहिनी—अग बतावणी कसली ? तुला खरं होतं तें सांगितलं.

मधु०—तर मग हें इतकंच सांगण्यासाठीं का मला बोलावणं पाठविलं ? हें गजीजवळ सांगितलं असतंस तर तिलाही ऐकू गेलं असतं. मग मलाच कशाला बोलवायला हवं होतं ? (रागावल्यासारखं करिते.)

मोहिनी—(स्वगत) हिला राग आलासा दिसतो. ही माझी जिवलग मैत्रीण आहे. तेव्हां हिच्याजवळ खरं सांगण्याला कांहीं हरकत नाहीं. शिवाय, जिवाच्या माणसांजवळ चिंतेचं कारण सांगितलं म्हणजे मनाला हलकं वाटतं असं म्हणतात तेंही खरं आहे. (उघड) मधुकरिके अशी रागाऊं नकोस. तुझ्यापाशीं का मी कांहीं चोरून ठेवीन ? हें पहा ऐक.—

पद--चाल-पाण्डु नृपति जनक जया.

विष्णु शिवहि युवति-पदीं ।। सखे नमवि पदोपदीं ।।
ब्रह्मा ज्याचे चरण वंदी ।। कामदेव तो ।। १ ।।
कुसुमबाण म्हणवुनियां ।। जनां फसवि, मिळवि जयां ।।
जगतां करि प्रेममयां ।। तोच छळि मला ।। २ ।।

मधु०-(स्वगत) माझा अंदाज बहुतेक खरा ठरणार. (उघड) इतकंच ना ? मग हें कांहीं जगाविरुद्ध नाहीं आणि तुझं मग ज्या भाग्यशाली पुरुषावर जडलं असेल तो अशा चालत आलेल्या लक्ष्मीला झुगारून देण्याइतका कां वेडा असेल ? मग त्यांत इतकी चिंता ती कशाला ?

मोहि०-सखे, तूं म्हणतेस तें सगळं खरं. पण--

पद—चाल-मी तप्त जरी मदनशरें

ते शूर जरी बहुत सखे संगरीं तरी ।।
ते लाजविती कांतीनें रतिवरां तरी ।। ध्रु० ।।

लघुपदवी ती त्यांची येत आडवी ॥
हें शंकित गे मन करिते वृत्ति बावरी ॥ १ ॥

मधु०--(स्वगत) बहुतेक जुळलंच म्हणायचं. हिला कीर्तिसिंहाविषयींच वेड लागलं आहे. (उघड) म्हणजे ! तुझ्या सांगण्यावरून ज्यांच्यावर तुझं मन गेलं आहे ते कीर्तिसिंहच असावेत असें वाटतं !

मोहि०--मधुकरिके, तूं अगदीं बराबर ताडलंस. आणि म्हणूनच मी म्हणतें--

पद--चाल-हे प्रभो विभो अगाध.

हें कसें सखे रुचेल गे दादांना । मी थोर कुळीं झालें ना? ॥धृ०
ज्यां मान लोकिं नाहींच ॥
त्या स्वयें वरी जरि मीच ॥
जगतांत रीति मग हीच ॥
हे कुतर्क येती नाना ॥ १ ॥
ह्या गतानुगतिकां जगतां ॥
कुल रुचे, न ती गुणवत्ता ॥
धन अधिक वाटते चित्ता ॥
हे कुतर्क येती नाना ॥ २ ॥
(दीर्घ उच्छ्वास सोडून स्तब्ध राहते.)

मधु०—पण ताई, ह्यांत कांहीं निराळं असावं असं वाटतं. खर माणिक राखेच्या गोळ्यांत जरी झांकून ठेविलं तरी त्याची प्रभा लपत नाहीं. तसंच कीर्तिसिंह जरी शिपायाच्या वेशांत आहेत, तरी त्यांच्या मुद्रेकडे पाहिलं म्हणजे अगदीं सरदारी बाणा दिसतो.

मोहि०—(सानुराग) अग सरदारी बाणा म्हणजे काय सांगू ?

पद—चाल-मम चित्तसरोजनिवासी.

मन्नयनचकोरसुचंद्रां ॥ अवलोकितां दर इंद्रां ॥ ध्रु० ॥

प्रणयसुनिर्झर मदनमनोहर मृणालमृदुकर ॥
जितारिपरिकर बहुगुणनिकर विहारी रतिकर ॥ १ ॥

मधु०—ईश्वर करो आणि हेंच खरं होवो म्हणजे झालं.

[**गजी** प्रवेश करिते.]

गजी—ताईसाहेब. ललिताराणीसाहेबांकडून जासूद आला आहे.

मोहि०—जा. त्याला आंत पाठव.

गजी—जी ताईसाहेब. (जाते.)

[**जासूद** येतो.]

जासू०— (लवून मुजरा करून) महाराणा प्रतापसिंह यांची प्रकृति दिवसानुदिवस अधिक अस्वस्थ होत चालली आहे म्हणून आज ललिता राणीसाहेबांचा विचार अरण्यनाथसाधुमहाराजांच्या मठांत असलेल्या श्रीगिरिजेस नवस करण्याकरितां जाण्याचा आहे. तरी बरोबर ताईसाहेबांनीं यावें अशी त्यांची इच्छा आहे.

मोहि०--ठीक आहे. तूं जा.

जासू०--जी ताईसाहेब.

[**जासूद** जातो.]

मोहि०--मधुकरिके तूंही बरोबर चल. जा. आपली तयारी करायला गजीला सांग.

मधु०--बरं. तूं हि लवकरच ये हो !

मोहि०--ही मी आलेंच.

मधु०--बरं. [मधुकारिका जाते.]

मोहि०--(स्वगत) आईजगदंबे माझ्या दादांस लवकर आराम पाड.

पद—चाल-अजुनि खुळा हा नाद पुरेसा.

देवि भवानी देइ अनामय वीरां बंधुला ॥ ध्रु० ॥
जोडुनि कर हे नम्रपणें ॥ विनवीते मी तुला ॥ १ ॥

जगतिं नसे तव दुजि माते ॥ प्रेमाला ती तुला ॥२॥
मातेविण जगिं इतरें कां ॥ राक्षियले कीं मुलां ॥ ३ ॥

(जाते.)

प्रवेश दुसरा पूर्ण.

प्रवेश तिसरा.

स्थळ—प्रतापसिंहाचा खासगत दिवाणखाना.

[**प्रतापसिंह** बसला आहे.]

प्रता०—(स्वगत) शिव ! शिव ! ! कालचक्राचा महिमा अतर्क्य आहे ! जी आर्यमाता रामचंद्रासारखे सत्वनिष्ठ धनुर्धर प्रसवली तीच आज आपल्या अंकावर बेहिंमत कुलांगार पुत्र घेऊन नशीबाला हात लावून बसली आहे !

पद—चाल-करि दळो बारो कामिनी.

बहुसुता वंध्या परि गमे ॥ आर्यभूमी ॥ ध्रु० ॥
कायविडंबन परकीयांनीं ॥ केलें म्हणुनी शिणली
स्वमनीं ॥ झुरतें चित्तीं ती दिनरजनीं ॥ नयन अग्नि-
परि अमुचा न वमे ॥ १॥

(विचार करून) आर्यभूवर कालचक्र फिरल्यासारखें दिसतें. युद्धास नुकती कोठें सुरवात झाली. तों मला रोगांनीं ग्रस्त केलें ! काय करूं !

[**कुमारसिंह** येतो.]

कुमा०—सरकारस्वारीच्या आज्ञेप्रमाणें राणी-साहेबांची रवानगी श्रीगिरजेच्या मंदिराकडे केली.

प्रता०—ठीक आहे तें असूं दे. कुमारसिंहा ! आम्ही आजारी असल्यामुळें राजेरजवाड्यांनीं धीर तर सोडला नाहीं ना ?

कुमा०—सरकारस्वारीस अलिकडे दरबारास जाववत नसल्या-

मुळें संस्थानिकांच्या मनास आळा घालणारा कोणीच राहिला नाहीं. त्यामुळें सर्वच बेबंदशाही झाली आहे. सर्वांची मनें बदलून गेल्यासारखीं दिसतात. माझ्या कानावर अशीही बातमी आली आहे कीं, त्यांचा विचार दुसरा सेनापति निवडावा असा आहे.

प्रता०—(त्वेषानें) काय म्हणतोस ? दुसरा सेनाधिपति ? त्यांना सेनाधिपत्य म्हणजे काय पोरखेळ वाटले आहेत काय ? मूर्खांनो !

दिंडी.

बाललीला वाटते का तुम्हां ही ॥
व्हाल सेनापति ओळखाल कांहीं ॥
जरी असतां तुह्मी पात्र व्हावयास ॥
धुरिण करितों मी स्वयें तुम्हां खास ॥ १ ॥

परंतु षंढांनो ! माझ्या हतभाग्य जन्मभूमीचें इतकें भाग्य उघडण्याचा समय अद्याप आला नाहीं. (जरा शांत होऊन) बरें ! कुमारसिंहा ! ते सेनाधिपति तरी कोणाला करणार हें समजलें आहे का ?

कुमा०—सरकार ते मालदेवजी अथवा विजयसिंह यांपैकीं कोणास तरी निवडणार अशी बातमी आहे.

प्रता०—(त्वेषानें उठून) मूर्खांनो ! हा प्रतापसिंह तुमच्या छाताडावर तांडवनृत्य करण्याकरितां जिवंत असून त्याच्या विरुद्ध असले कट ! आजपर्यंत मोंगलांशीं झालेल्या प्रसंगांत विजयसिंह अथवा मालदेवजी कुठें लपले होते ?

कुमा०—(त्यांस मध्येंच अडवून) अशा कोपानें सरकारस्वारीची प्रकृति विकोपास जाण्याचा संभव आहे. तरी सरकारस्वारींनीं जरा स्वस्थ पडावें अशी दासाची विनंति आहे.

प्रता०—(बसून) ठीक आहे. कुमार ! उद्ईक मी दरबारास हजर राहणार आहे असें जाहीर कर. उदेपूरचा सिंह आजच अगदीं हतवीर्य झाला नाहीं हें त्या शेळपटांस पूर्ण समजलें पाहिजे.

कुमा०—(स्वगत) आतां काय उत्तर द्यावें ? प्रकृतीची स्थिति अशी असतां जर उद्यां कांहीं अतिप्रसंग घडला तर फारच कठिण (विचार करून) हो असंच करावं (उघड) परंतु माझी एक विनंति आहे.

प्रता०—बोल.

कुमा०— सर्व संस्थानिकांनीं कीर्तिसिंह नांवाच्या शिपायास अरण्यनाथ साधूकडे लखोटा देऊन पाठविले आहे. यांत त्यांचा हेतु साधुमहाराजामार्फत अकबरशाहाशीं तहाचें बोलणें लावण्याचा दिसतो तरी कीर्तिसिंह परत येईपर्यंत दरबारचा बेत रहित व्हावा अशी दासाची नम्र विनंति आहे.

प्रता०— (त्वेषानें) बेहिंमत ? नपुंसकांनो ! मनगटांत जोर नव्हता तर धर्मयुद्धाचे मिषानें शौर्याची खोटी फुशारकी मारण्याकरितां आपआपले देश सोडून येथवर येण्यापेक्षा घरींच स्वस्थ बसला असतां तर काय वाईट झालें असते ! मुळमुळित सौभाग्यापेक्षां ढळढळीत वैधव्य काय वाईट ! तुमच्या सारखे बेहिंमती पुरुष निपजण्यापेक्षा देश स्त्रीमयच झाल्यास बरें .

पद—चाल–श्वानाहुनि अति नीच तुह्मी रे.

धिग्जीवित षंढांनो तुमचे पूर्वज होते कशापरी ।
कर्परशकलां तुर्ययुगीं कां रत्नखनी अंतरीं धरी ॥धु०
वीरकुलीं जन्मुनी फुकट कीं मंद होतसे सुधी परी ।
खाया आधीं निजावया मार्धि कामाला तर कधीं तरी ।
बाप होउनी गेले तुमचे त्यांनिं कांपले किती अरी ।
देहकालिक ती ज्यांची फुलली कोमेजाया वनांतरीं ।
वाहती रणीं शिरकमलां । मिळविती राज्यलक्ष्मीला ।
जलपाट रक्तपूराला । समजुनी कष्ट देहाला ।
धर्मार्थ रजा सौख्याला । दाविती रणीं बळ अरिला ।

मिळविति पूर्वज जिवावरी जें स्वामी त्याचे तुह्मांपरी ।
मृगपति मारी ग्रासी जंबुक न्याय दिसे हा जगावरी १

आणि शिवाय माझ्या अनुमोदनांशिवाय तुह्मांस बादशहाशीं कोणतेंही बोलणें सुरू करण्यास काय अधिकार ?

कुमा०—सरकार. अशा स्थितींत कोप करणें अनिष्ट आहे. दोन दिवसांनीं सरकारस्वारीस आराम वाटल्यावर सर्व गोष्टींचा विचार करितां येईल.

प्रता०-(शांत होऊन) कुमार ! तूं म्हणतोस तसेंच करावें उदईक दरबार भरविण्याचें कांहीं प्रयोजन नाहीं. (आठवल्यासारखें करून)हो ! पण कायरे! कुमार ! हा कीर्तिसिंह फारच शूर आहे अशी माझी पूर्ण खात्री झाली आहे. आजपर्यंत झालेल्या चकमकींत त्यानें आपलें शौर्य आमच्या पूर्ण निदर्शनास आणलें आहे. परंतु तो कोणत्या संस्थानांतून आला आहे याची तुला कांहीं माहिती आहे काय ?

कुमा०—(कीर्तिसिंहाचा द्वेष करीत) सरकार ! तो एक अलवरवाला आहे. हे अलवरवाले फार असत्यवादी व घातकी असतात.

प्रता०--(रागानें) कुमार ! तूं कोणासमोर बोलत आहेस ? शूराची निंदा शूराजवळ केली असतां ती रुचली जात नाहीं हें तुला माहित नाहींसें दिसतें.

कुमा०--(ओशाळून) सरकार ! कीर्तिसिंहाची निंदा करावी म्हणून मी हें बोललों नाहीं. परंतु मला जी माहिती होती ती सांगितली.

प्रता०—(आठवल्यासारखें करून) अरे हो ! कुमार ! श्रीगिरिजेस गेलेल्या मंडळींबरोबर संरक्षणार्थ योग्य लवाजमा दिला आहे किंवा नाहीं ?

कुमा०--सरकार ! बरोबर पुष्कळ लवाजमा देऊन योग्य व्यवस्था केली आहे. शिवाय अकबरशहानें आपल्या सैन्यास अशी

सक्त ताकीद केली आहे कीं, मलिक महाराणा प्रतापसिंह यांचा कबिला श्रीगिरिजेस गेला आहे असें आम्हास समजतें, तरी त्यांस कोणताही त्रास होणार नाहीं अशी प्रत्येकानें खबरदारी घ्यावी.

प्रता०—(संतुष्ट होऊन) शाबास अकबरशहा शाबास ! शत्रू असावा तर तुझ्यासारखाच असावा. आम्हांस फार अभिमान वाटतो कीं आमची गांठ ईश्वरानें तुजसारख्या धर्मशील वीराशीं घातली आहे.

[**पहारेकरी** प्रवेश करितो.]

पहा०—(मुजरा करून) बाहेर संस्थानिकांकडून कोणी शिपाई आला आहे.

प्रता०—जा. त्याला आंत पाठव.

पहा०--आज्ञा सरकार. (जातो)

[**शिपाई** येतो.]

शिपा०--(मुजरा करून) हा लखोटा सरकारस्वारीस देण्याकरितां सर्व संस्थानिकांनीं दिला आहे. (लखोटा देतो.)

प्रता०—ठीक आहे. तूं जा.

शिपा०--आज्ञा सरकार. (जातो.)

प्रता०--कुमार ! संस्थानिक लखोट्यांत काय लिहितात ? वाच.

कुमा०--(वाचतो) "मलिक महाराणा प्रतापसिंह यांचे चरणीं राजस्थानचे सर्व लहान थोर संस्थानिक विनंती करितात कीं, महाराणासाहेबांची प्रकृति बरेच दिवस अस्वस्थ आहे; तरी ती आतां सुधारत असल्याचें वर्तमान आम्हांस कळवून महाराणासाहेब आमची चिंता दूर करितील अशी आशा आहे--

नम्र—राजस्थानचे संस्थानिक.

प्रता०--कुमार ! त्यांस योग्य तें उत्तर लिही.

कुमा०--आज्ञा सरकार. (स्वगत) किती मूर्ख ! मागें गुला-

माचे फार फुशारकी मारतात. पण या सिंहाच्या समोर आले म्हणजे सगळे ताटाखालचीं मांजर !

(पडद्यांत)

शार्दूलविक्रीडित.

आज्ञेनें प्रभुच्या रथीं जरि सकृत् योजी तुरंगां रवी ॥
मध्यान्हीं क्षणविश्रमाहितमती, वाटेच अंगार वी ॥
भूपाला ! तव कार्य तें जरि असे अश्रांत कीं मानवीं ॥
विश्रांति क्षण घेइ येईल पुन्हां कार्यार्थ ती मा नवी॥१

कुमा०—सरकारस्वारीची विश्रांतीची वेळ झाली. तरी आतां उठावें.

प्रता०—ठीक आहे.

[जातात.]

प्रवेश तिसरा पूर्ण.

प्रवेश चवथा.

स्थळ—अरण्यमार्ग.

(कीर्तिसिंह चालला आहे.)

कीर्ति०—(स्वगत) राजस्थानच्या संस्थानिकांची आज्ञा पार पाडून धर्मकृत्यांत अंशतः तरी सहायभूत व्हावें म्हणून मनाचा निश्चय करून अरण्यनाथसाधूच्या मठाकडे जावयास निघालों. परंतु माझ्या मनाची किती चमत्कारिक स्थिति झाली आहे !

पद—चाल-बिंबाधरा मधुरा.

सौदामिनी हासिनी वदनीं;नयनीं रत्नखनी, हासिनी ॥ध्रु०॥
ती कामिनी ॥ मनिं येउनी ॥ मजला न सुचे कांहिं जनीं १

(पाहून) काय करणार ! भ्रमांत रस्ताही चुकलों !

पद—चाल–साध्य नसे मुनिकन्या.

मानस संभ्रमिं वाही ॥ न सुचे निजकार्यीं मज तिळभर कांहीं ॥ ध्रु० ॥ विसरत नाहीं मूर्ति सखीची ॥ रतिसुमनोहर पलही साची ॥ हृदयनिबन्धन होई ॥ निद्रा नच ये मज पलभरही ॥ १ ॥

स्मरतां साखिचें साचिविलोकित ॥
स्मृति ही माझी सकला लोपत ॥
हृदयविदारण होई ॥
अजितां राणिं मज जिंकि युवति ही ॥ २ ॥

(विचार करून) माझी मति अगदीं गुंग होते. मोहिनी तूं विष आहेस अथवा अमृत आहेस ? तूं विष तर खचित नव्हेस. तसें असतें तर मी तुझ्या प्राप्तीची इच्छा मुळींच धरिली नसती. तुला अमृत म्हणावें तर परिणाम अगदीं विपरीत ! (विचार करून), ईश्वरा ! स्त्री म्हणजे काय ?

पद—चाल–[ही का देवी वनिंची]

ही कां वह्नि विषाची ॥ कीं न कळे आहे पीयूषाची ॥ धृ० ॥ संजीवनि ही साची ॥ संयोगी धरि परिपाटि सुधेची ॥ १ ॥ विरहीं सखि मदनाची ॥ विषशरसंधानीं चतुराचि साची ॥ २ ॥

(विचार करून) हं ! आतां पूर्ण समजलें. ही—

वह्नि सुधाविष यांची ॥ संयोगिं सुधेची विरहिं विषाची ॥ ३ ॥

(विचार करून) असो ! पण इतकेंहि समजून काय उपयोग ?

अंजनीगीत.

शाद्वलदलगतजललवकांती ॥ मोहवि मन ती युवति

नितांतीं ॥ होइल सुखदा परि कां अंतीं ॥ दुःखद कीं न कळे ॥ १ ॥

(आठवल्यासारखें करून) पण मी अगदींच विसरलों ! आतां ह्या निर्जन वनांत मला मार्ग तरी कोण दाखवणार !

दूर पाहिलेंसें करून) अरे वाः ! समोरून कोणसं येत आहे. त्यालाच विचारूं म्हणजे झालं.

[अमीराचे वेषानें अकबरशहा प्रवेश करितो.]

कीर्ति०—(त्यास पाहून) अरे ! शत्रू ! (तरवार काढतो).

अमी०-(कीर्तिसिंहास पाहून) ओ हो गनीम !(तरवार काढतो) परस्परांवर चालून जातात. परस्परांचीं शस्त्रें गळून पडतात).

कीर्ति०--(स्वगत) हा काय चमत्कार ! असें कधींही झालें नव्हतें. आजच्या प्रसंगावरून ईश्वरीसंकेत निराळाच असवा असें दिसतें. (उघड) अमीरसाहेब ! ज्याअर्थी आपली दोघांचीही शस्त्रें गळून पडली त्या अर्थी आपण दोघे या क्षणापासून स्नेही झालो.

अमी०--(मनांत चकित झालेला.) फार योग्य सांगितलत. मलाही तसंच वाटतं.

कीर्ति०—(साश्चर्य) आपणास आमची भाषा अवगत आहे असें दिसतें ?

अमी०--होय. आमचा बहुतेक जन्म इकडेच गेल्यामुळें आम्हास ती सहज बोलतां येते. आणि मी स्वतः तर तुमचीच भाषा नेहमी बोलतों.

कीर्ति०--आपलं नांव मित्राला कळेल काय ?

अमी०—मित्रा ! मी अकबरशहाचे पदरचा एक अमीर आहे. माझें नांव शेरकाह असें आहे. बरं आतां आपल्या प्रश्नाचा प्रतिध्वनि करण्यांत मजकडून कांहीं गैर होईल काय ?

कीर्ति०—छेः छेः परंतु अमीरसाहेब ! आपली योग्यता मज-

पेक्षां फार मोठी आहे. कारण मी धर्मयुद्धार्थ आलेला एक सुखवस्तु रजपूत शिपाई आहे. मला कीर्तिसिंह असें म्हणतात. ?

अमी०–किर्तिसिंहा ! एकदा स्नेह झाला म्हणजे योग्यतेचा विचार मुळीच करावयाचा नसतो. आपण या क्षणापासून स्नेही झालो

(परस्पर भेटतात.)

कीर्ति०– (आठवल्सारखें करून) अरें ? पण मी अगदींच विसरलों अमीर साहेब ! ऑपणांस अरण्यनाथ साधूच्या मठाचा मार्ग माहित आहे काय ?

अमी०–कोणांचा मठ ! अरण्यनाथ साधूचा ? त्या वेड्या हम्या-कोचा ? वा:? मलाही तिकडेच जावयाचे आहे.

कीर्ति०– (आनंदानें) चला तर.

(जातात.)

प्रवेश **चवथा** पूर्ण.

प्रवेश पाचवा.

स्थळ– अरण्यनाथ साधूचा मठ.

(अरण्यनाथ व त्यांचा शिष्य बसले आहेत)

अर०—(स्वगत) हें नश्वर जग शाश्वत आहे अशी कल्पना करून अज्ञ जन नानाप्रकारच्या व्यासंगांत मग्न झासेले असतात. दृश्यमानाच्या नश्वरत्वाची साक्ष पदोपदीं प्रटत असतांही मोहान्ध प्राणिमात्रांस मुळींच उमज पडत नाहीं. जरा लक्ष लावून विचार केला असतां सहज ध्यानांत येते कीं—

पद—चाल–निजरूपीं जगदाकृति भासा

क्षर सारी जगदाकृति आहे अक्षर तो विभु विकृतिनि-धानीं ॥ ध्रु ॥ कायाप्रतिमा पाहुनि कीं जलें । ओळखिती

जन निष्फल ह्मणुनी ॥१॥ दृष्टिविकारां बघुनि मृगजला । होई सिद्ध कां जन तत्पानीं ॥२॥ निर्वाणीं रत संत म्हणुनि ते । माया केवल ही समजोनी ॥३॥

तत्वतः आमच्यासारख्या विरक्तजनांस या जगापासून कांहीं मिळ-वावयाचे नाहीं. तथापि प्राणिमात्रांस योग्य दिशा लागावी म्हणून आम्हांस बाह्यात्कारीं सहेतुक कर्मांचा अंगिकार करावा लागतो. (उघड) नारायण, प्रतापसिंहाकडील कांहीं वर्तमान समजलें आहे काय ?

नारा॰-गुरुमहाराज ! आजच राणीवगैरे स्त्रिया श्रीगिरिजेस नवस करण्याकरितां आल्या आहेत. कारण प्रतापसिंहाची प्रकृति बरीच अस्वस्थ झाली आहे.

अ॰--(स्वगत) देशाचें दुर्भाग्य अद्याप संपलें नाहीं. दुसरें काय ! (उघड) नारायण ! ह्यांची व्यवस्था योग्य केली आहे ना ?

नारा॰—होंय गुरुमहाराज.

अर॰—त्यांचा विचार येथें किती दिवस राहण्याचा आहे ?

नारा॰—एक दोन दिवस राहतील असें दिसतें.

(**गुंड्या** प्रवेश करितो.)

गुंड्या—गुरुजींची भेट व्हावी म्हणून बाहेर दोन गृहस्थ आले आहेत.

अर॰—जा. त्यांना आंत पाठव.

गुंड्या—आज्ञा गुरुमहाराज. (जातो.)

(**कीर्तिसिंहासह अमीर** प्रवेश करितो.)

अमी—(अरण्यनाथाकडे पाहून) कीर्तिसिंहा ! हेच तुमचे अरण्यनाथ साधु.

कीर्ति॰-(स्वगत) संतदर्शनाचा महिमा अनिर्वर्णनीय असतो !

पद—चाल—जलधर धनतर फिरति गगनभर.

मुनिजन शमधन सुजलविमलमन तुष्ट बहू करितो
मम लोचन पावन हा जन करित महाजन ॥धृ०॥
मदनमथनवरचरणनिहितमन सहजीं करितो षड्रिपु-
विदमन, तपोहरींचें काय सुदर्शन ! ॥१॥ पावन-
दर्शन पुण्यनिदर्शन अनशन धुंडित परब्रह्मवन
विरक्तिलतिकामुक्तिसुमनमन ॥२॥

(उघड) राजस्थानच्या संस्थानिकांकडून आलेला मी कीर्तिसिंह आपणांस वंदन करितों.

अरण्य—कीर्तिसिंहा ! तुझा विजय असो. (दूर पाहून) मागें दुसरं कोण आहे ?

अमी०—(पुढें होऊन) सलाम हम्याको साधुमहाराज.

अर०—कोण ? मोंमढ ?

अमी०—(कीर्तिसिंहास एकीकडे) मला यांनीं मोंमढ म्हणून हांक मारली याचें तुम्हांस आश्चर्य वाटण्यास नको. हा असाच वेडा आहे. (उघड) होय. साधुमहाराज.

अर०—(स्वगत) याच्यादेखत कांहींच बोलून उपयोग नाहीं. (उघड) ठीक आहे. चला मजबरोबर. नारायण ! चल.

नारा—(उठून) आज्ञा गुरुजी,

(सर्व जातात.)

प्रवेश पांचवा पूर्ण.

पहिला अंक समाप्त.

॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु. ॥

अंक दुसरा.

—:०:—

प्रवेश पहिला.

स्थळ—अरण्यनाथसाधूंच्या मठांतील श्रीगिरिजामंदीर.

[**कीर्तिसिंह** देवीसमोर उभा आहे.]

कीर्ति०—(स्वगत) जगदादिमाये अंबिके ! आज तुझें दर्शन झाल्यामुळें मी आपणांस कृतकृत्य समजतों.

पद-- चाल–वंदू श्रीगुरूपदकमलां.

अंबे हतपिशाचकदंबे ॥ दे रणिं दासां यश जगदंबे ॥ध्रु॥
असुरनिहंत्री तुजला वदती, तारी नत हे जन अविलंबें १
विघ्नपरिकरां दूर करुनिया दे यश वीरां सुतहेरंबे ॥२॥
संसृतिपाथोनिधिनौका तूं ने परतीरां जगदालंबे ॥३॥

(विचार करून) परंतु आजच्या या अलभ्य योगाचें मूळ अरण्यनाथ साधु होय. साधुवर्या ! तुझी स्तुति करावी तितकी थोडीच.

दिंडी.

शारदा ती होईल वाग्विहीन ॥
करिल मुख कीं सुरगुरू तोहि दीन ॥
यत्न करितां गुणवर्णनीं प्रभूच्या ॥
खचित अथवा त्या संतमालिकेच्या ॥१॥

(विचार करून) शेरकोह आणि मी एकां ठिकाणीं निजलों असतां मला गुप्तपणें उठवून एकीकडे आणिलेंस; प्रस्तुत युद्धासंबंधीं उपयुक्त अशा गोष्टी सांगितल्यास. इतकेंच करून न राहतां मला श्रीअंबिकादर्शनपुण्याची जोड करून दिलीस. साधुवर्या या तुझ्या रुपेचा मी कधीं उतराई होणार ? मुसलमान लोक वेड्यांना ईश्वरप्रेरित समजतात म्हणून तूंही वेडाच बनला आहेस. अरण्यनाथ ? तुला वेडा

कोण म्हणेल ? मी तर असें समजतो कीं तुझ्यासारखा शहाणा जगांत नाहीं.

दिंडी.

ज्ञात तुजला तें आत्मतत्त्व सारें । परी अंतरिं राहोनि निर्विकार॥
कासया हें तुज जगातिच पसारें।संत शिकवी मूढांस सदुपचार

(ऐकलेंसे करून) अरे ! पण हा मंजुळ ध्वनि कसला ऐकूं येत आहे ? (पुन्हा ऐकलेसें करून) स्त्रियांच्या नूपुरासारखा आवाज ? अथवा छेः ! इतक्या रात्रीं इतक्या गुप्त देवळांत कोणीही-तशांत स्त्रिया—येणें मुळींच संभवत नाहीं.

[**ललिता, मोहिनी** वगैरे स्त्रिया प्रवेश करितात.]

कीर्ती॰—(साश्चर्य स्वगत) हा काय चमत्कार ? ह्या स्त्रिय कोण असाव्यांत ?

पद—चाल-निजरूप हिला मी दापू.

कमनीययौवना ह्या ललना ॥धु०॥ विधुसमवदना नुपुर-कलकलसरभसहारितजननयना ॥ १ ॥ कोण असति कीं कोठुनि येती कांहींच हें मज समजेना ॥२॥

असो ! ह्या आतां काय करतात तें एकीकडे उभें राहून पहावें. (एकांकडे उभा राहतो)

ललि॰—वन्सं ? मी पूजा आवरते आणि मग प्रार्थना करून आज आपण लवकरच परत जाऊं. कारण रात्र फार झाली आहे.

मोहि॰—खरंच. आज भारीच उशीर झाला आहे.

ललि॰—(बसत बसत) म्हणूनच (ललिता पूजेला बसते)

कीर्ति॰—(स्वागत) वन्सं कोण ? पूजा कसली ? काय असेल तें असो.

मोहि॰—(कीर्तिसिंहास पाहून चपापून स्वगत) अगबाई ? इथें कोण हे ?

(सहज पुढे गेल्यासारखेंकरून ओळखलं बरं.)

पद—चाल-वैशाखमासि वासंतिक

जी मूर्ति बाई एकवार भरलि लोचनीं ।
जागवि कीं निशिदिनिं मज जी अलोचनीं ॥ ध्रु॥
जी पाहुनीच विधिरचना गमत पूर्ण ती ।
स्मृति एकवार बघुनि जिला होय शाश्वती ।
जी बघुनि कुपित मानिनिही मान सोडिती
केवीं ती विसरुं बाइ चित्तमोहिनी ॥१॥

कीर्ति॰—(मोहिनीकडे पाहून स्वगत) ही पूर्वी स्त्री पाहिली असावी असें वाटतें.

पद—चाल-रुतला दर्भांकुर चरणीं.

वाटे दृष्टपूर्व साची । मूर्ती लावण्यरसाची ।
किंवा स्मृति जननांतरिची । भ्रांती पाडितसे साची।
वदनकांति शशिमाजीं कमलीं कांति लोचनाची ।
पाहुनि कीं सादृश्यसंभ्रमे भ्रांती ये साची ॥१॥

ललि॰—(पूजा आटपून) चला प्रार्थनेला.

सर्वज॰—(प्रार्थना करितात).

पद-चाल-सत्य आहे गुरुची खुण

जगज्जननि तूं खरी ॥ भवानी ॥ तव कृपेस नाहीं सरी ॥ भवानी ॥ ध्रु ॥ आहो चरणकिंकरी ॥ भवानी ॥ तूं दया करी लेकरीं ॥ भवानी ॥१॥ महाधर्मसंगरीं ॥ भवानी रत, तदीय दुःखा हरी ॥ भवानी ॥ २ ॥ विनवाणि जगिं जन करी ॥भवानी॥ तुजविणे कुणाला तरी ॥ भवानी ॥३॥

ललि—वन्सं प्रदक्षिणेला चला.

मोहि॰—(ऐकूं न आल्यासारखं करीत) काय म्हणाला वहिनीसाहेब ?

म०—मोहिनी ताई ? एवढा कसला विचार करीत होतीस कीं तुला प्रदाक्षिणेला-चल म्हणून म्हटलं तें ऐकूं आलं नाहीं ?

ललि०—बरं चला आतां.

(सर्व स्त्रिया प्रदक्षिणेस सुरवात करितात)

कीर्ति०—(स्वगत) वाः ? माझा तर्क अगदीं बरोबर जुळला ? काय म्हणाली ? मोहिनीताई ? तेंच नांव. छे ? अथवा एका नावाचीं पुष्कळ माणसें असतात.

(पहिली प्रदाक्षिणा पुरी होण्यापूर्वी मोहिनी कीर्तिसिंहाचे पायावर फूल टाकिते)

कीर्ति०—(प्रेमविकल होऊन स्वगत) आतां मात्र नावासारखीं नावे नव्हत; तेंच नांव आणि तीच प्रतिमा ? (साल्हाद) कीर्तिसिंहा ? आतां आपणांस कृतकृत्य समज.(विचार करून), छे? अथवा

दिंडी.

सहज अवलोकी लोललोचना ती ॥
मूढ लावुनि आपणांकडे घेती ॥
सहज हंसतां, मज पाहुनीच हांसे ॥
म्हणुनि कामीजन करुनि घेइ हांसे ॥ १ ॥

हें फूल तिच्या हातुन सहज पडलं असेल.

(दुसरी प्रदक्षिणा पुरी होण्यापूर्वी दुसरे फूल मोहिनी टाकते).

कीर्ति०—(प्रेमविकल स्वगत) आतां मात्र पूर्ण खात्री झाली. मोहिनी ? (फूल उचलून)

पद---चाल–त्रैलोक्यसुंदरी होशि अशी.

हें काय सुंदरी ? बाण असे अनिवारी ॥ सोडिना; कुशंका जाइ लयां मम सारी ॥ ध्रु० ॥ तूं होई राजसे सदय, करांस निवारी ॥ काठिन्य तयाचें भूषण कां सुकुमारी ? ॥ १ ॥

मोहिनी! त्या दुष्ट करांस आतां पुष्प वर्षाव करूं देऊं नकोस. मला त्यामुळें किती बाधा होते त्याची कल्पना त्या जडांस कशी होणार!

ललि०---(तीन प्रदक्षिणा पूर्ण झाल्यावर) वन्सं. चलायचं ना आतां ?

मोहि०----हो चलायचं.

(सर्व स्त्रियांसह श्रीगिरजेस नमस्कार करून मोहिनी कीर्तिसिंहाकडे पहात जाते)

कीर्ति०----(पुढें येऊन स्वगत) काय नांव मोहिनी! अगदीं अन्वर्थक आहे. अथवा मोहिनी ? मोहिनी या शब्दांत जी जादू भरली आहे ती प्रत्यक्ष तुला पाहिली असतां कांहींच नाहीं असें वाटतें. भाषण तरी किती गोड ! " हो चलायचं. " किती मधुर ! परंतु इतक्या सगळ्याला न शोभेल असा दुर्गुण मला तुझ्या ठिकाणीं दिसला. तो कोणता म्हणशील तर ऐक.

अंजनीगीत.

पुष्पनिपाताविद्ध मनां यां ॥
कटाक्षसूचीहत करुनीया ॥
क्षारार्पण तूं क्षतिं समया या ॥
करिशि असें वाटे ॥ १ ॥

जे बाह्यतः कठोर दिसतात ते अंतर्यामीं फारच नाजूक असतात हें तुजसारख्या सुज्ञ स्त्रीस माहित नसावं हें आश्चर्य आहे. मोहिनी ? (फुलाकडे पाहून)

पद—चाल--[सुरसुंदरी जणु खालीं]

त्वां दाविलें मृदु म्हणुनी ॥ अनुरागां विमलें सुमनीं
॥ धृ० ॥ असें दयालय ॥ नच मी निर्दय ॥ प्रणय-
कुसुमचय ॥ गमताचि सुहृदय बोलिलें तव सुमनीं ॥
॥ अंतरा ॥ तें हें परि मनीं ॥ जाचे गुणखनी ॥
मदनशरासनिं ॥ मजला बैसुनि ॥ सुलक्ष्य समजुनि ॥

सखे मम हृदय हें विकलचि बहु होई ।। कामिनी ! ।।
महावनीं ।। प्रवेशुनी ।। मतींधनीं ।। जळे मनीं ।।
दाववन्ही बनुनी ।। १ ।।

(दीर्घ उच्छ्वास सोडून) मोहिनी ? तू पुष्प टाकण्याकरितां आपला हात जेव्हां बाहेर काढलास तेव्हां त्यावर अंगठीच्या माणकाची पडलेली प्रभा मी कधींही विसरणार नाहीं.

साकी.

गौरकरीं तव, माणिक्याची प्रभा रक्त पाहोनी ।।
मन्मानसशुक मोहित होई दाडिमबीज ह्मणोनी ।।
सखये पुरवावी । इच्छा मनिंच न विरजावी ।। १ ।।

(कानोसा घेऊन) हा कशाचा आवाज ?

(**वक्रतुण्ड** व **कुब्जा** प्रवेश करितात.)

कीर्ति०– (स्वगत) हें काय ? असो ! पुन्हां एकदां आडून पाहूं (एकीकडे उभा राहतो.)

वक्र०–(स्वगत) माझी प्रिया किती उत्तम आहे ! कवि म्हणतात युवतिजनांकडे पाहून कुणाला मोह पडणार नाहीं ? या प्रश्नाचें उत्तर आमचें प्रीतिपात्र दृष्टमात्र होतांच मिळाले असते. परंतु मंदभाग्यच ते; आणि मंदमती पण खरे. कारण पृथ्वींत माझ्या प्रियेसारखीही कांहीं रत्न आहेत हे त्या मूर्खांना माहित नव्हतं असं दिसतं (उघड) सुंदरी ! प्राणप्रिये ! प्रेमलतिके कुब्जे ! अहाहा ! किती मधुर नांव ? उच्चार करितानां आमची जिव्हा तन्मय होऊन जाते. (हंसतो)

कुब्जा०–(रागानें) असलीं खवचट बोलणीं मला समजत नाहींत असं नाहीं. तरी बरं. स्वतःच नांव तितकंच गोड आहे म्हणून ! माझं नांव उच्चारतांना जीभही कुब्जा होते असंच ना ?

कीर्ति–(स्वगत) ही एक गंमतच आहे.

वक्र०–(स्वगत) शेवटीं आमच्यावरच आणलंन. कारण

आमचंही नांव तसंच मंजुळ आहे. अगदी नूपुरासारखा ध्वनि करीत कानांत शिरतं हो ! वक्रतुण्डच आम्हीं (उघड) प्रिये ! अशी रागावूं नकोस. खरंच पण चालून चालून आज तुझे खैराच्या शुष्क पानाप्रमाणें कोमल पाय दुखावले असतलि नाहीं ? अथवा तुला विचारण्याची मुळींच जरूर नाहीं. या वक्रतुण्डाला तें स्पष्ट दिसत आहे.

पद–चाल– घेउनि ये पंखा वाळ्याचा

शिणलिस तूं भारी, सुकुमारी, स्पष्ट दिसे नयनां ॥ धृ ॥
घर्मबिंदुमाला छिन्नतमोऽहंकारां झांकी कीं तव वदनां ॥१॥
श्वासोच्छ्वासाची घाइ उडाली साची शब्द तुला वदवेना॥२॥

कुब्जा–हे पहा. नेहमीं थट्टा कसली ! (दुःखानें.)

पद–चाल–असे कालाचि जी भगिनी.

बहु कांता ! पहा शिणले । पदां सामर्थ्य या नुरलें ॥ ध्रु ॥
चालुनि चालुनि कोमल काया राया मम दुखवे ।
सांगु किती मी शब्दीह आतां मुळिं नच मज वदवे ॥१॥
मंद पदें जरि टाकित जातां येइन मी पुढती ।
वदतें इतकें जीवितनाथा दया न कां ये ती ॥ २ ॥

वक्र—वा: ! लाडके आतां असं करूं नकोस. आपण अगदीं देवीच्या देवळांतच येऊन पोहोचलों. ती पहा गिरिजेची मूर्ति ?

कुब्जा—(आनंदानें) खरंच. आपण केव्हां आलों तें मला समजलं देखील नाहीं.

वक्र०—(देवीजवळ जाऊन हात जोडून) माते ! हें असलं रत्न (कुब्जेकडे हात करून) असल्याच (आपल्याकडे हात करून हिऱ्याच्या पदरीं टाकीत जा. नाहीं तर मोठीच यातायात पडायची !(कुब्जेकडे पाहून हांसतो.)

कुब्जा—(रागानें) काय म्हटलं ? मी रत्न का ? उगीच एखाद्याला हिणवायचं म्हणजे काय ?

वक्र०—प्रिये ! तूं अशी रागाऊं नकोस. तूं खरोखरींच रत्न आहेस. कारण जर कोळशांची सरसानिरस निवड करण्याची वेळ आली तर त्यांत तुलाच रत्न ठरवायला लागेल. (हांसतो.)

कुब्जा--(रागानें) आणि त्याला कोंदणही इकडच्याशिवाय दुसरं मिळायचं नाहीं. माणसांनीं अगदींच ताळ सोडला म्हणजे तिथें काय बोलायचं ?

वक्र०—(कीर्तिसिंहाकडे नजर जाऊन) ऑ ! हे इथें कोण ?

कुब्जा--(सभय) कोण आहे ?

वक्र०--(कीर्तिसिंहाकडे जवळ जाऊन पाहुन स्वगत) कोणी तरी योद्धा दिसतो. (उघड) प्रिये तूं परपुरुषासमोर उभी राहूं नकोस.

कुब्जा--मी जातेच घरीं.

वक्र०--हं. जा.

[**कुब्जा** जाते.]

कीर्ति०—(पुढें येऊन स्वगत) हा कोण असावा ? कांहींच तर्क चालत नाहीं. भूत ह्मणावें तर कृति आणि आकृति कांहींशी मनुष्यासारखी ! मनुष्य म्हणावें तरी जुळत नाहीं यक्षादिकापैकीं म्हणावें तरी तशी तेजस्विता अथवा अद्भुत सामर्थ्य यांचा प्रत्यय नाहीं (विचार करून) एकंदरींत पिशाचच असावें. (त्यास दटा-वीत उघड) कायरे निशाचरा ! इतक्या रात्रीं तुझें देवळांत काय काम आहे ?

वक्र०--(मोठ्यानें हंसत) आपल्याला अगदीं सबंद बुटकु-लीभर हंसू येतयं (पुन्हां हंसतो) काय प्रश्न ! निशाचर रात्रीं येणार नाहीं तर काय दिवसा ? वाः ! खूप ! (कीर्तिसिंहाकडे रेखून पाहून) अहो दिवाचर महाराज ? आपणच रात्रीं देवळांत कां यावें उत्तर द्या.

कीर्ति०--(स्वगत) मोठेंच आश्चर्य ! मी यास इतका दटावला तरी मुळींच भ्यालेला दिसत नाहीं (उघड रागानें) कायरे ! अशा पवित्र स्थानीं एखाद्या निर्लज्जासारखें वर्तन करितांना तुला शरम वाटत नाहीं ?

वक्र॰— (हंसत डोळे मिचकवीत) भले महाराज ! आम्हींच निर्लज्ज ! वाः ! आम्ही कांहीं लोकांच्या बायकाकडे पहात कोंपऱ्यांत उभे नाहीं राहिलों !

कीर्ति॰—(ओशाळून स्वगत) ह्या गुलामानें मघाचा प्रकार पाहिला असं दिसतं. असो ! आतां याजवर रागावून उपयोग नाहीं. (उघड) बरें ! पण तें असूं दे वक्रतुण्डा तूं राहतोस कोठें ?

वक्र॰—(स्वगत) अँ. कसे आले ताळ्यावर राजश्री ! आम्हीं तरी अगदीं आंतलंच दिलं ठेवून ! (उघड) महाराज--

[पडद्यांत " वक्रतुंडा चल लवकर " असा शब्द होतो.]

वक्र—(तो ऐकून) अरे बापरे ! (कांपत) नमस्कार महाराज. आतां आमचं वास्तव्य पुढील भेटींत. (पळत जातो.)

कीर्ति॰—(स्वगत) गेली एकदाची पीडा ! पण तो ध्वनि कोणाचा ? किंवा कोणाचा कां असेना ! ती ब्याद एकदाची गेली म्हणून बरं झालं. मुलाचं नांव अगदीं बरोबर ठेवलय. वक्रतुण्ड! अगदीं यथार्थ! अथवा हेंही नांव पुरेसें दिसत नाहीं. कारण जिथें सर्वच वक्र तिथें तोंडाच्या वक्रत्वाचाच विशेष कशास पाहिजे होता ! मुलाला वक्र सर्व हें नांव अगदी बरोबर साजलं असतं.

[पडद्यांत " कीर्तिसिंहा चल " असा शब्द होतो]

कीर्ति॰-(ऐकून स्वगत) अरण्यनाथ साधूचाच शब्द ! आतां गेलंच पाहिजे. (देवीस नमस्कार करून जातो)

प्रवेश पहिला पूर्ण.

प्रवेश दुसरा.

स्थळ—अरण्यनाथ साधूचे मठांतील बाग.

[दोन शिष्य फुलें तोडीत आहेत.]

दोघे--(गातात.)

पद—चाल-आम्रमंजिरी तुला अर्पिते.

जागृत हो प्रभुवरा । सोडी क्षणभरि ती इंदिरा ॥ध्रु॰
" होतां भुवनीं धर्मग्लानि । आश्रित करितो मानुषयोनी॥

शस्त्र धरी मी पार्था कुजनीं" ॥ वदशि हरे ही गिरा ! ॥ १ ॥
सज्जन पडती कारावासीं ॥ धर्मग्लानी अर्जुनिहि कैशी ॥
मध्यस्थासम कां मग असशी ॥ सोडि जरा इंदिरा ॥ ५ ॥

नारा०---(स्वगत)गुरुजीनीं हें पद रोज म्हणत जा असें आम्हांस सांगितलें. आहे अगदीं यथार्थ आहे. अशी प्रार्थना जरी प्रत्येकानें रोज केली तरी तो निद्रित प्रभू जागा होऊन सर्व संकटांचें निवारण करील. (दुःखानें) आमच्या धर्माची-आणि ह्मणूनच देशाची- किती कष्टतर अवस्था झाली आहे ! (विचार करून) हर ! हर !

कामदा.

पुण्यकेसरी सार्थ पद करी ॥ स्वाभिमान तो अंतरीं धरी ॥
ग्रामसिंह ते असति परिसरीं ॥ सिद्ध वर्षण्या गालिजलसरी १

प्रतापसिंहा ? तू देशाकरितां इतके कष्ट घेत असतांही तुला नांवे टेवणारे कुऱ्हाडीचे दांडे अद्याप आमच्यांत आहेत त्याला तुझा काय इलाज ? हर ? हर ? संस्थानिक गुरूजीस काय लिहितात ? अकबरशहाशी तह करावा. आणि तोही कसा ? तर पुष्करतीर्थ त्यांस देऊन ! हें सर्व जेव्हां मला गुरुजीनीं सांगितले तेव्हां मी ब्रह्मविद्यापाठक असूनही मला त्वेष आल्याशिवाय राहिला नाहीं. असो ! इतकेंही असून ते मानी प्रतापसिंहालाच मूर्ख ठरवितात ? कारण तो बाहुबलानें आपले रक्षण करा असें शिकवितो ! असो ! अद्यापि कालच उलट आहे असं समजलं पाहिजे.

गुंड्या०–कायरे नारायण ? तो कीर्तिसिंह गुरुजीकडे कशाला आला होता ? तुला माहित आहे ?

नारा०–(स्वगत) हा गुंड्या आहे गुलामाचा अर्धवट याच्याजवळ फारसें बोलून उपयोग नाहीं (उघड) अरे ? आपलं पुष्कर तीर्थ यवनांपासून सोडवावें म्हणून प्रतापसिंहादि रजपूत वारांनीं युद्ध आरंभिलें आहे. तेव्हां त्यासंबंधी आपल्या गुरुजीना गुप्त सल्लामसलत विचारण्याला आला होता. दुसरं काय ?

गुंड्या०–आणि तो दुसरा मुसलमान कोणरे ?

नारा०-अरे तो नेहमी आपल्या गुरुजीकडे नाहीं कां येत ? तो शेरकोह अमीर ?

गुंड्या०-पण कायरे तो अमीर सुद्धां भला माणूस दिसतो.

नारा०-(स्वगत) पाहिलं याला कांहीं कळत नाहीं. (उघड) गुंडया ? तुझं आणि तिच मुळींच हाडवैर आहे. तेव्हां तुला दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अरे ? तो अमीर लाख भला असला म्हणून आपल्या धर्मयुद्धा संबंधी गुप्त मसलती कां त्याच्या देखत कोणी बोलेल ?

गुंड्या०-(विरस होऊन) अरे तें मला समजतं. मी कांहीं अगदींच वेडा नाहीं.

नारा०-(स्वगत) अगदीं वेडा असतास तरी बरं, पण तूं गुलामा धड हें नाहीं आणि धड तें नाहीं (उघड) अरे पण तू अगदींच वेडा आहेस असं मी म्हणत नाहीं आपला थोडासा तसा आहेस म्हणून म्हणतो. (हंसतो)

गुंड्या—(रागावून) ए नारायण तूं मला नेहमीं अस टाकून बोलतोस. तें मी निमूट ऐकून घेतो पण आज मात्र गुरुजीला सांगितल्याशिवाय राहणार नाहीं.

नारा०—गुंड्या असा रागावूं नकोस गुलामा ? ती आपली तुझी उगीच थट्टा केली.

गुंड्या०—(तोंड वांकडे करून) ती आपली तुझी उगीच थट्टा केली ? तो कीर्तिसिंह मघाशींच गेला म्हणून ? नाहींतर त्याला मी सांगितलं असतं तुला ते कंबरेच लांब काढून दाखवायला. मग कळली असती थट्टा ?

नारा०-(हातांतील फुलाकडे पाहून स्वगत) फुलें तर पुरेशी झाली. आतां या मूर्खाजवळ फार वेळ बोलतां कामा नये शिवाय ललितादि राजस्त्रियांची आतांच रवानगी करायची आहे. (उघड) बरं गुंडया आतां थट्टा पुरे कर. गुरुजीची पूजेची वेळ झाली. आत. आपणांस लवकर गेलं पाहिजे.

गुंड्या०-बरें. तर चल.

(जातात.)

प्रवेश दुसरा पूर्ण.

प्रवेश तिसरा.

स्थळ—अरण्य मार्ग.

(**कीर्तिसिंह** व **अमीर** एका झाडाखालीं बोलत बसले आहेत)

कीर्ति–अमीरसाहेब, आपल्या सहवासांत दोन दिवस केव्हां सरले हें मला मुळींच समजलें नाहीं.

अमी०–कीर्तिसिंहा ? थोर लोकांची अंतःकरणें नेहमीं थोर विचारांनीं परिपूर्ण असतात; म्हणूनच तुह्मी माझा इतका गौरव करितां वास्तविक पहातां मलाच आपला सहवास अधिक सुखकर वाटला.

कीर्ति०—छेः ? छेः ? अमीरसाहेब, आपण–

दिंडी.

बहुत दिवसांच्या परिचयासमान ।
प्रेम दाविलें मजसि त्यां प्रमा न ॥
म्हणति " आभाषण पूर्व सज्जनांचा ।
स्नेह असतो " ही सत्य दिसे वाचा ॥१॥

अमी०–(स्वगत) कीर्तिसिंहा ? तुझें स्फटिकाप्रमाणें निर्मल अंतःकरण पाहून मला तुजविषयीं अधिक आदर वाटूं लागला आहे. (उघड) बरं. तें असो. कीर्तिसिंहा ? मालिक महाराणा प्रतापसिंह याची प्रकृति अस्वस्थ आहे. असं मी ऐकलं तें खरं कां ?

कीर्ति०—

पद—चाल–ठाउक मजला असे ऋषीचें.

क्षत्रियशब्दां सार्थ करी जो परसंकट हरुनी ।
भूदुःखानें दुःखित होई भूप सार्थ म्हणुनी ॥
शौर्यादिक सद्‌गुणगणभावें आदरिला सुजनीं ।
महासंकटीं अचलांसम जो अचल असे मानी ।
व्याधिविद्ध तो अवचित होई हें वदण्या, वदनीं ।
गद्‌गद कोणां येइ न सांगे अश्रुतती नयनीं ॥ १ ॥

अमीरसाहेब ! त्या वीराची सांप्रत अशी अवस्था झाली आहे.

अमी०--कीर्तिसिंहा ! मला एक विनंती करावी असें वाटतें.

कीर्ति:—मित्राजवळ विनंतीची अपेक्षा नसते.

अमी०—आमच्या अकबरशहाचे पदरीं एक नामांकित हकीम आहे. मजवर अकबरशहाची मर्जी असल्यामुळें मी त्याच्याजवळ मलिक महाराणा प्रतापसिंहा करितां विनंति करीन; आणि माझी खात्री आहे कीं अकबरशहा हें कधींही अमान्य करणार नाहीं.

कीर्ति०--(सानंद) असा कुशल हकीम पाठवून महाराण्यास बरें करण्याचें श्रेय घेतल्यास महाराणा अकबरशहाचा फार गौरव करील यांत मुळींच शंका नाहीं.

अमी०--आणि आमच्या बादशहाची इच्छाही महाराण्याशीं नेहमीं सलोख्यानें रहावें अशीच आहे.

कीर्ति०—तें मात्र मला अशक्य दिसतं.

अमी०—कां ?

कीर्ति०—कारण महाराणा पुष्करतीर्थाविषयीं आपला हेका सोडणार नाहीं; आणि मला वाटतें अकबरशहाही पुष्कर तीर्थ सोडणार नाहीं.

अमी०--अकबरशहा तीर्थही सोडील.

कीर्ति०—(साश्चर्य) काय ? अकबरशहा पुष्करतीर्थ सोडील ?

अमी०—हो. पण त्यांत एक अट आहे. आणि तिही अगदीं स्वल्प आहे.

कीर्ति०—(औत्सुक्यानें) अशी कोणती अट ? कीं जीवर अकबरशहा पुष्कर तीर्थही सोडण्यास तयार होईल !

अमी०—(स्वगत) आजपर्यंत अकबरशहाशीं—आपल्या मुली देऊन—शरीरसंबंध करणारे पुष्कळ नामर्द रजपूत पाहिले. ही गोष्ट आमच्या हितसंबंधास अनुसरून असल्यामुळें आम्हांस इष्टच आहे. परंतु असल्या नामर्दास निंद्य समजल्याशिवाय आम्हांस मुळींच राहवत नाहीं. मूर्खांस स्वाभिमान असा नाहींच. असो. आतां या माझ्या मित्राची परीक्षा करितो. (उघड) कीर्तिसिंहा ! ती अट कांहीं असाध्य नाहीं. अकबरशहाचे मनांतून महाराण्याच्या घराण्याशीं शरीरसंबंध व्हावा असें आहे.

कीर्ति०--(त्वेषानें स्वगत) अरे मूढा यवना ! तूं महाराणा प्रतापसिंह म्हणजे काय समजलास ? त्याच्या घराण्याशीं शरीरसंबध ? मूर्खा ! त्याच्या समोर हें बोललास तर तुझ्या जिव्हेचे तो शतशः तुकडे करील. तूं सार्वभौम आहेस आणि प्रतापसिंहास इतर संस्थानिक फारसे अनुकूल नाहींत म्हणून तो आपलें दैन्य तुजपुढें प्रगट करील असें समजूं नकोस कारण.—

अधोमुखहि तो करितां वह्नी ज्वाला ऊर्ध्वग असते ॥
आपद्गतही नामितपरशिर वीर न नमवि शिरातें ॥
मूढा ! प्रकृती ती ॥ लोपे, कधिंहि न कल्पांती ॥ १ ॥

(विचार करून) अथवा तुझ्याकडे कसला दोष ! आमच्यांतच---

पद्--चाल–किति गेले सुकोनी.

ते स्त्रैण महा कीं जन्म कुलीं घेती ॥ लोटीति आत्मजा यावन शुद्धांतीं ॥ १ ॥परचरणपंकजीं मिलिंदसम होती ॥ कुलास कुमती यापरी उद्धरिती ॥ २ ॥ जे पुरुष शरीरीं लिंगभेदिं होती ॥ जरि गुणां पाहिलें गमति मना युवती ॥ ३ ॥

आणि अमिरा !

हे शब्द म्हणोनी वदनिं तुझ्या येती ॥ साहील वीर ज्या समज न कल्पांतीं ॥ ४ ॥

(विचार करून) असो ! पण आपलें मन याला कळवून उपयोग नाहीं. (उघड) अमीरसाहेब ! आमच्या राणाजींचा संबंध कधींच झाला आहे. आतां त्यास द्वितीय संबंध करणें असल्यास त्याविषयीं मला कांहीं माहिती नाहीं.

अमी०—(स्वगत) कीर्तिसिंहा ! तुझं अंतर्गत माझ्या पूर्ण ध्यानांत आलें. शाबास ! तूं खरा वीर आहेस. तुझी चित्तवृत्ती आम्हांस जरी अनिष्ट वाटली तरी तुझ्याठिकाणीं ती स्तुत्यच आहे.

आम्हांस येऊन मिळणाऱ्या नीचांपैकीं तूं खास नव्हेस. हें पाहून तुझ्याविषयीं माझा स्नेहभाव वृद्धिंगत होत आहे. असो ! पण जरा अधिक गंमत करितो. (उघड) कीर्तिसिंह! माझ्या भाषणाचा आशय तुमच्या लक्षांत आला नाहीं. स्पष्ट सांगतों. मोहिनीसाहेबांशीं आपला संबंध व्हावा असें अकबरशहाच्या मनांत आहे.

कीर्ती०---(चवताळून स्वगत) काय करूं रे ! नीचा अकबरा---

पद-----चाल---असा कोण रे मदन तो.

क्रोध हा जाळितो देह सारा ॥ स्फुरण येई भुजां दृष्टि अति धूसरा ॥ ध्रु० ॥ येशि माझ्या करीं, संगरीं कधिं- तरी ॥ तुजासि दावीन मी प्रेमभारां ॥ मत्प्रिया इच्छिशी देहिं माझी असी ॥ ही, तुझ्या लोटविल रक्तपूरां ॥ १ ॥

(राग आवरून) अरेरे ! पण हें भलतेंच होत आहे. या अमीरांस यासंबंधीं माझी खरी वृत्ति कांहींच कळता कामा नये. (उघड) अमीरसाहेब तें मात्र अशक्य दिसतं.

अमी०----(स्वगत) कीर्तिसिंहा ! आतां मात्र माझी पूर्ण खात्री झाली आणि दुसरीही शंका आली. तुझ्या आरक्त मुद्रेवरून मोहिनीवर तूं प्रेम करीत असला पाहिजेस. असो ! हें जर खरं असेल तर तूं खरा शूर आहेस आणि अकबरशहाही उदार आहे. तुझेंच मनोरथ पूर्ण होतील. (उघड) मग मात्र काय होईल तें सांगतां येत नाहीं. असो ! हकीमाविषयीं मात्र लक्षांत ठेवा. बरं, आतां उशीर झाल्यासारखा दिसतो तेव्हां उठावं.

कीर्ति०--(उठून) ठीक आहे बराच वेळ झाला. जय रघुनाथ.

अमी०--सलाम.

[परस्पर भेटून जातात.]

प्रवेश तिसरा पूर्ण.

प्रवेश चवथा.

स्थळ—प्रतापसिंहाचा खासगत दिवाणखाना.

[**प्रतापसिंह** व **कुमारसिंह** बसले आहेत.]

प्रताप॰—कुमार ! कीर्तिसिंह परत आल्याविषयीं कांहीं वर्तमान कळलें आहे काय ?

कुमार॰—सरकार ! तो आल्याचें मला अद्याप समजलें नाहीं. तथापि तो आज येणार असं समजलं होतं.

प्रताप॰—ठीक. श्रीगिरिजेस गेलेली मंडळी आली काय ?

कुमार॰—सरकार ! त्यांच्या स्वाऱ्या येण्याची वेळ झाली आहे. सरकारस्वारीच्या आज्ञेप्रमाणें कालच जरूरीचा जासूद रवाना केला आहे.

प्रताप॰—असो ! संस्थानिकांची स्थिति कशी काय आहे ?

कुमार॰—(स्वगत) संस्थानिकांची स्थिति मी तरी काय सांगणार ! अथवा जें समजलें आहे तें सागणं प्राप्त आहे. (उघड) सरकार ! त्यांची स्थिति समाधानकारक आहे असं मला खात्रीपूर्वक म्हणतां येणार नाहीं. त्यांच्या कोणत्याही कृत्याला मेळ राहिला नाहीं. वाटेल त्यानें वाटेल तें करावें अशी स्थिति झाली आहे. सर्वजण आपला काल ख्यालीखुशालींत घालवीत आहेत. मला असेंही समजलें आहे कीं उद्ईक ते विजयसिंहाकडे जमून जलशा करणार आहेत.

प्रताप॰—(त्वेषानें) षंढांनो ! देश पारतंत्र्यशृंखलेनें जखडून गेला असतांही तुमची जलशाची हांव पुरी होत नाहीं. निर्लज्जांनो ! दीन प्रजेच्या कष्टांवर पोसलेल्या जहागिरी तुमच्या आपमतलबी स्वार्थांकरितां ईश्वरानें निर्माण केल्या आहेत असें तुम्ही समजतां काय?

पद—चाल—ते कुटिल कपटि.

कां नयन असुनि अंध जाहला । स्वाभिमानशून्यहृदय
मूढसे विलासहासिं, उलट चालला ॥ धृ० ॥
स्वर्गिं पितर लाजतील । अश्रुबिंदु गाळितील । ख-
चित तुम्हां निंदितील निंद्य अशा कुटिलां ॥ १ ॥

राणा, महाराणा हीं विशेषणें म्हणजे पोरखेळ समजतां काय ! धिःकार असो तुम्हांला.

दिंडी.

होत तुम्हां कां प्राप्त जन्म वाया ।
मातृयौवनवनिं कुठारां धराया ॥

बरं, इतकंही होऊन

जन्मतांच न कां पावला लयातें ।
वृथा जगला भूभार कासया ते ॥ १ ॥

मूर्खांनो ! यवनसूत्रधारांच्या हातांतील तुम्ही केवळ कळसूत्री राजे आहांत हें तुम्हांस अद्याप कळलें नाहीं काय ? अथवा तूप गेलें तरी तेलही गेल्याशिवाय तुम्हांस रिकामें धुपाटणें कस कळणार ?

कुमार०-(स्वगत) काय करणार! अशा प्रकृतींत इतका कोप केला असतां विलक्षण होणार. (उघड) सरकास्वारीची प्रकृति अद्याप सुधारली नाहीं. तरी असा कोप करणें अनिष्टकारक आहे.

[**पहारेकरी** प्रवेश करितो.]

पहा०—(लवून मुजरा करून) बाहेर कोणी कीर्तिसिंह नावाचा शिपाई आला आहे. त्यास सरकारस्वारीची भेट घेणें जरूर आहे असें तो म्हणतो.

प्रता०--जा. त्यांस आंत पाठव.

[**पहारेकरी** जातो.]

प्रता०--कुमार ! आतां अरण्यनाथसाधुमहाराजाकडील सर्व वर्तमान कळेल.

[**कीर्तिसिंह** येतो.]

कीर्ति०--(प्रतापसिंहाकडे पाहून दुःखानें स्वगत) शिव ! शिव !

पद—चाल–दिसली पुनरपि गुप्त जाहली.

प्रतीपगामिनि काय निसर्गें विधिसरणी ही या भुवनीं ॥
स्तुत्यविरोधां दाखवुनी जणु विजयशालिनी तुष्ट मनीं

॥धृ०॥ निजधर्माचा दक्षिण हा कर वीर गुणाकर अजित रणीं ॥ विकलचि होई शीतकरांसम कृष्ण-पक्षिच्या दिनरजनीं ॥ १ ॥ श्वानांसम जे स्वार्थी करिती पुच्छचालनां परचरणीं ॥ देशद्रोही, त्यां सुख-डोहीं डोले हतविधि बुडवोनी ॥ २ ॥

(उघड) **महाराणा प्रतापसिंह** यास **कीर्तिसिंह** प्रणिपात करितो,
(लवून मुजरा करून उभा राहतो.)

प्रता०—(साश्चर्य स्वगत) वाः ! हा कीर्तिसिंह केवळ शिपाई असून इतका गंभीर दिसत आहे. याजकडे पाहतां माझ्या मनांत आदरबुद्धि उत्पन्न होत आहे. (उघड) काय अलवरवाले बहादर ! तुम्ही साधुमहाराजांकडे संस्थानिकांचा खलिता घेऊन गेला होता काय !

कीर्ति०—होय सरकार.

प्रता०—मग साधुमहाराजांनीं काय उत्तर दिलें ?

कीर्ति०— साधुमहाराजांनीं प्रथम सरकारस्वारीची कुशलता विचारली. स्वारी अस्वस्थ आहे असें मी त्यास सांगितलें तें ऐकून तें फार कष्टी दिसले.

प्रता०—(स्वगत) साधुश्रेष्ठा ! तुझी मजवरची प्रीति अद्वितीय आहे. (उघड) बरें ! त्यांनीं संस्थानिकांस काय उत्तर दिलें ?

कीर्ति०--साधुमहाराजांनीं मजबरोबर त्यांस असा संदेश सांगितला आहे कीं महाराणा प्रतापसिंह यांची प्रकृति सुधारेपर्यंत आम्हांस कांहींच सांगतां येत नाहीं.

प्रता०--(संतुष्ट होऊन स्वगत) सद्गुरो ?

दिंडी.

गौरवीतां मज उगीच पामरातें ॥
हेतु सर्वां श्रीकृपा मात्र होते ॥
चंडरश्मी तो जरि न दे प्रकाशा ॥
शीतरश्मीतें जगतिं ये निराशा ॥ १ ॥

(उघड) साधुमहाराजांची मजवर इतकी कृपा आहे काय ?

कीर्ति०—(स्वगत) यांत आश्चर्य तें कोणतें ?

पद—चाल–ईश चिंता निवारील सारी.

धर्मवर्मा रणाचार्य भूपा ! । युक्त दावित गुरू स-
द्गुरू ती कृपा ॥ ध्रु० ॥ संकटां न गणिती पुण्य-
राशी । धर्मसेवेसि हा देह देशी । स्तविल ना कोण
तुज पावनाशी । राजमुक्तावलीसन्मणी तूं नृपा ॥ १ ॥

(उघड) स्वधर्माची व स्वदेशांची कांस प्राणांतींही न सोडणाऱ्या वीरशिरोमणीवर कोण लोभ करणार नाहीं ?

प्रताप०—(फार खुष होऊन) अलवरवाले बहादूर ! श्रीगिरिजेस गेलेली मंडळी तुम्हांस भेटली काय ?

कीर्ति०—(स्वगत) महाराण्या ! ती भेट मी कशी विसरेन !

पद—चाल–स्वार्थी जी प्रीति मनुजाची.

मंदीरीं प्रेमलतिका ती भेटली ॥ धृ० ॥
स्मृति माझी ती तद्वत अजुनी नाहीं लव लपली ॥ १ ॥
स्मरतें–केवीं पाहुनि मजला सस्मित सखि दिसली ॥ २ ॥
अर्पितसुमनें सखिच्या धरणी सुमनमयी गमली ॥ ३ ॥

(विचार करून) परंतु महाराण्या ती हकीगत तुला सांगितली असतां तुझ्या मानी स्वभावास रुचणार नाहीं म्हणून तुझ्या प्रश्नाचें उत्तर निराळ्या मार्गानें देतो. (उघड) होय सरकार ! आतां मी स्वाऱ्यांबरोबरच आलों.

प्रताप०--काय ! श्रीगिरिजेस गेलेली मंडळी परत आली ? ठीक आहे. अलवरवाले बहादूर ! तुम्हांस जाण्यास परवानगी आहे.

कीर्ति०—(स्वगत) आतां हकीमाविषयीं विचारावें (उघड) थोडी विनंती आहे.

प्रताप०—बोला.

कीर्ति०--अकबरशहाचे पदरीं एक अमीर आहे. त्याचा व माझा स्नेह आहे. त्यास सरकारस्वारी आजारी आहे असें समजल्यावरून त्यानें मला बादशाहाचे पदरीं असलेल्या एका नामांकित हकीमाविषयीं कळविलें आहे. सरकारस्वारीची हरकत नसल्यास अकबरशहा हकीमास पाठविण्यास फार खुषी आहे.

प्रताप०—(स्वगत) शत्रूकडील हकीमावर विश्वास ठेवतां येईल काय ? (विचार करून) अथवा ही शंकाच अस्थानीं आहे. अकबरशहाचे हातून नामर्दपणाची गोष्ट होणें मुळींच संभवत नाहीं. (उघड) कीर्तिसिंह ! आम्ही यास कबूल आहों. तुम्ही हकीमास आणण्याविषयीं व्यवस्था करा.

कुमार०--(स्वगत) या कीर्तिसिंहाविषयीं मला आधींच द्वेष वाटत आहे. तशांत यानें हकीम आणून सरकारस्वारीस बरें करविल्यास याचा डौल अधिकच वाढेल. तर असें होऊं देतां उपयोग नाहीं. (उघड) सरकार ! शत्रूकडील हकीमावर कसा विश्वास ठेवतां येतो !

प्रता०--(रागानें) कुमार ! अकबरशहाची योग्यता तुला माहित नाहीं काय ? आमची मंडळी श्रीगिरिजेस गेली होती त्या समयीं त्यानें काय व्यवथा केली होती तें तूंच सांगितलेंसना ?

कुमा०--(ओशाळून) होय सरकार. तेहीं खरें आहे.

कीर्ति०—(स्वगत) शुद्ध नंदीबैल दिसतो.

प्रता०--कीर्तिसिंह ! तुह्मांस जाण्यास परवानगी आहे.

कीर्ति०--आज्ञा सरकार.

[मुजरा करून जातो.]

प्रता०--कुमार ! आतां आपणही श्रीगिरिजेहून मंडळी आली आहे तिकडे जाऊं.

कुमा०--चलावं सरकार.

(जातात.)

प्रवेश चवथा पूर्ण.

प्रवेश पांचवा.

स्थल--मोहिनीचा बाग.

मोहि०--(स्वगत) जिवाला मेलं कुठेंच चैन पडत नाहीं. त्या रात्रीपासून मी अगदीं परतंत्र झालें आहें. माझं मन माझ्या ताब्यांत मुळींच नाहीं. कुठेंही जा जिवाला सुख असं नाहीं. तिकडे करमेना म्हणून इथें बागेंत आलें म्हटलं इथें तरी जरा बरं वाटेल. पण मी वेडी नव्हेना? माझं सुख कुठें आहे तें मला पक्कं माहित असून मी भलत्याच ठिकाणीं कसं शोधावं (प्रेमविकल होऊन) प्राणेश्वरा ! कीर्तिसिंहा !

पद--चाल-पुष्पपरागसुगंधित.

कांतविलासमनोहर मारुत अतिशीत परी मज जाळि हा ॥ उपवनकोकिलकूजितगानें आज उठे शिरिं शूल हा ॥धु० ॥ अमृतधारि परि आज असा कां विषचि वमत चंदिर हा । उलट दिसत मज सकल आज कीं, प्रियकर पाहिन नाद हा ॥ १ ॥

(आठवल्यासारखें करून) अग बाई ! पण मला एकटीला असं वाटून काय उपयोग ! त्यांनाही असच वाटत असेल कां ? अथवा त्यांनीं माझ्या कृतीला दोष तर दिला नसेल ना ? प्रियकरा !

पद--चाल-मज चैन नसे मुळिं.

मज आठवितां पलभर तरी ॥ धृ० ॥ प्रेमनिमग्ना मुद्रा तुमची योगिवराची करिल सरी ॥ १ ॥ मानसिं येऊनि गिरिजा-मंदिर प्रणयविकल का हृदय करी ॥ २॥ मन्मय अथवा वाटे मजला प्राणविसाव्या अवनिवरी ॥३॥

(चपापल्यासारखें करून हाताकडे पाहून) अगबाई ? पण माझी अंगठी काय झाली.

(पद्यांत)

" फुलांबरोबर नाहीं ना गेली ? "

मोहि०—(ऐकून) मधुकरिकेचाच आवाज ? एकूण हिच्या तें लक्षांत आलं.

[**मधुकरिका** प्रवेश करिते.]

मधु०–मोहिनीताई ? लेकानां भेटीला बोलवावं आणि आपण उपवनांतून आंगठ्या शोधीत बसावं ना ? म्हणावं तरी काय बाई याला ?

मोहि०–(स्वगत) आतां इच्याशीं इथें कांहीं बोलून उपयोग नाहीं. अगदीं एकीकडे गेलं पाहिजे. (उघड) मधुकरिके अशी रागावूं नकोस. तुला येण्याला उशीर होता म्हणून जरा इकडे आले. चल आतां. मला तुझ्याशीं पुष्कळ बोलायचं आहे.

मधु०–बरं चल पोटभर बोल.

(जातात)

प्रवेश पांचवा पूर्ण.

दुसरा अंक समाप्त.

श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु.

अंक तिसरा.

--:०:—

प्रवेश पहिला.

स्थळ—रजपूत छावणींतील रस्ता.

[**बचंभट** व **रामभट** बोलत उभे आहेत.]

बचं०—(तपकीर ओढीत) कायरे रामभट ? भिक्षुकीची चंगळ होईल ह्मणून आपण इथें पैशाच्या लोभानें आलों खरें; पण बाबा मला आतां असं वाटतं कीं निघतांना माझ्या कुणी तोंडांत मारायाला नव्हता.

राम०—(हंसत) मला हें निघतांनाच सांगायला काय झालं होतं. मी देखील तेवढं केलं असतं. बाकी बचंभट असा रागावूं

नकोस. माझी देखील तुझ्या सारखीच अवस्था झाली आहे. तोफांचा धडड आणि फडड ऐकलं कीं आपल्या तर पोटांत गडडचा गडगडाट उडतो. हो ? आपण बोलून चालून भटगडी ? आपली लढाई झटली म्हणजे तुह्मी दहा तर आह्मी पंधरा—आपले लाडू हो ! दुसरं तिसरं कांहीं नाहीं. पण कायरे बचंभट आपल्याला कांहीं भ्यायला नको. कारण नाहीं विचारलंस ? अरे ? ब्रम्हहत्त्या होईल ब्रम्हहत्त्या ! आपल्याला कोणी हात देखील लावावयाचा नाहीं मग मारण्याची गोष्ट कशाला ?

बचं०—— रामभट, तुला लेका कांहीं कळत नाहीं. आपलं, तोंड आहे म्हणून वाटेल तें बहकत सुटतोस झालं. अरे ? मुसलमानांनीं आपल्याला पकडून नेण्याला आपल्या प्रतापासारख्या क्षत्रियवीरांनीं बांगडया भरल्या आहेत ?

राम०——मग तूं रे कां एवढा त्रासला आहेस ?

बचं०—अरे मी काय मुसलमान पकडतील म्हणून त्रासलों आहें ? पण कोण दगदग पडते ! शिवाय आपल्या राजेलोकांत तरी एकी कुठें आहे ! तरी एक बरं झालं कीं कीर्तिसिंहानें तो हकीम आणवून प्रतापसिंहाला बरा करविला. त्यामुळें आतां हे संस्थानिक कांहीं तरी ताळ्यावर येतील.

राम०—खरोखर तो हकीम म्हणजे प्रतिधन्वंतरि ! दीड दिवसांत राण्याला बरा केला म्हणून म्हणतात. पण कायरे हा कीर्तिसिंह कोण ?

बचं०—तो आपला एक शिपाई आहे. (सादर) पण फार शूर आहे हो ! त्या दिवसाची हकीगत तुला कळली नाहीं वाटतं ?

राम०——काय ती ?

बचं०——अरे. त्या दिवशीं विजयसिंहानें दारू पिऊन, धुंदींत महाराण्याचें निशाण उपटून टाकलें !

राम०—हत् ! मूर्ख विजयसिंहा ! बरं पुढें.

बचं०——हें जेव्हां महाराण्याला समजलं तेव्हां त्यानें चवताळून विजयसिंहाच्या निशाणाचे तुकडे तुकडे केले.

राम०--अगदीं बरोबर ! त्या मानी महाराण्याला असला अपमान कसा सहन व्हावा ?

बचं०—तेव्हां महाराण्यावर विजयसिंहाचे चार लोक धांवले. त्या वेळेस त्या कीर्तिसिंहानें एकट्यानें तिघांस ठार मारून राण्याचा प्राण वाचवला.

राम०—शाबास ! कीर्तिसिंहा ! शाबास ! तूंच खरा क्षत्रिय !

बचं०--त्यानें केलेला पराक्रम जेव्हां महाराण्यानें पाहिला तेव्हां खुष होऊन त्यानें त्याला आपले निशाणाचा पहारा करण्याची जागा दिली.

राम०--मग यांत कांहीं राण्यानें त्याचा ह्मणण्यासारखा गौरव नाहीं केला.

बचं०--वाहवा ! तुझी अक्कल ह्मणजे काय ? तुझ्या मनांतून त्याला महाराण्यानें पंचपक्वानें खाऊं घालायचीं ! हो ! भटगड्यांना तेंच मोठं इनाम ! अरे ! सार्‍या राजस्थानच्या सेनानायकाचें निशाण संभाळण्याची जागा ह्मणजे तूं काय समजतोस ? ती जागा मिळविणें ह्मणजे अद्वितीय वीरत्वाचें लक्षण आहे समजलास ?

राम०—अरे असेल तें. आपल्याला काय त्यांत कळणार ? पण कायरे ! तिथें तो रात्रीचा एकटा पहारा करतो ?

बचं०—अरे हो.

राम०--आणि बेट्या तिथें तर भुनखेतं देखील असायचीं ! कारण आजपर्यंत त्या रणमैदानावर किती माणसं मेलीं असतील ! मग त्याला तिथें भय कसं नाहीं वाटत ? हं. बाकी रामरक्षा येत असेल झालं.

बचं०--(हंसून) शुद्ध पढतमूर्ख आहेस गुलामा ! बरं चल. आपली नित्यकर्माची वेळ झाली.

राम०—छे ! आपलं दुपारीं झालं आहे सडकून. आतां आपल्याला मुळींच क्षुधा नाहीं.

बचं०--(हंसून) तुझं नित्यकर्म ह्मणजे भोजन ! अरे कांहीं संध्या वगैरे आहे का नाहीं ?

राम०—हं हं हं मी आपला समजलों तसं. बरं एकदां डबी तर काढा.

(तपकीर ओढीत जातात).

प्रवेश पाहिला पूर्ण.

प्रवेश दुसरा.

स्थळ—रजपूत छावणी बाहेरील मैदान, उदेपूरचें निशाण.

[**कीर्तिसिंह** पहारा करीत आहे.]

कीर्ति०—(फिरत आल्याशीं) आर्यमाते ! तुझी अवस्था किती कष्टद झाली आहे ! तुझ्या पूर्वेतिहासाकडे लक्ष दिलं म्हणजे अंतःकरण कसं भरून येतं. त्या वेळेस तुला कशाची उणीव होती ? अथवा सुपुत्र पोटीं आले असतां मातेला कसली उणीव राहणार ? त्यासमयीं:—

पद—चाल-निजमख रक्षाया.

गणति न हो साची, वीरवरांची, हतरिपुमशकांची, वीरवरांची, ॥ वदुनि परी तें काय सुफल ये विफल स्मृति ये त्या समयाची ॥ १ ॥

आतां आम्हाला, इंद्राचा हत्ती पाठीवर मारून आणणारा आमच्यांतलाच कोणी भीम म्हणून होता असं सांगितलं तर ते मूर्ख कवीचं महामूर्ख कल्पित असं वाटतं. कारण हल्लीं आमचा अंगरखाच आम्हाला जड लागतो ! म्हणून—

चाल–वरील.

नाटकसें आतां, खास गमे तें, सेवुनि परवशता, खास गमे तें ॥ अंध म्हणे जन अंधाचि सार, निर्बल समजे निर्बल जगतां ॥ २ ॥

आमच्या संस्थानिकांनीं तरी त्या दिवशीं मजबरोबर करूला लखोटा दिला होता ? तहाचा. तह कसा ? तर जे तीर्थ परकीयां-

पासून बाहुबलाच्या जोरावर हिसकून घेण्याकरितां आले तेंच देऊन टाकण्याचा ! अथवा बाहुबल आतां कोठून राहणार ! शस्त्राची आणि आमची जर भेटच होत नाहीं तर लढाई करयाचें बाहुबल आमच्यांत कोठून असणार ? तेव्हां ओढून ताणुन लढाईस आलेल्या संस्थानिकांनीं केलं तें योग्यच केलं. (विचार करून) हे राजस्थानच्या राजसमूहा ! तुझं बल जरी मलीन झालं आहे तरी--

चाल-वरील

परवशतापाशां, छिन्न कराया, हृदयिं धरि आशा
छिन्न कराया ।। कालें होइल सौख्यद, करिते संहति
फलदा बलिरिपुनाशां ।। ६ ।।

(उच्छ्वास सोडून) अथवा तुमची आपसांत दुही स्पष्ट दिसत असतां ऐक्याची आशा कशी करूं ? विजयसिंहा ? प्रतापसिंहाचं निशाण उपटून आपल्या कुलाचा उद्धार केलास ! आणि तेंही त्याच्या परोक्ष ! धिःकार असो तुला ! अथवा—

अंजनीगीत.

वसती सज्जन साधु जगावरि ।। कोणाचाही द्वेष न
अंतरिं ।। निष्कारण त्या दुर्जन वैरी ।। जगतिं अशी
रीती ।। १ ।।

तेव्हां तूं केलंस तें स्वभावाला अनुसरूनच केलंस. (आवाज ऐकल्यासारखें करून) अरे ! पण हा आवाज कसला ऐकूं येत आहे ? (पुनः कानोसा घेऊन) मनुष्याच्या पावलासारखा वाटतो. असो. (बंदुक सरसावतो) पण अद्याप कोणी पुढें कसा येत नाहीं ? (पाहिलेंसें करून) वाः ! ती आकृति इकडेच येत आहे असं वाटतें.

(**वक्रतुण्ड** प्रवेश करितो.)

कीर्ति०—(त्यांस ओळखून स्वगत) अरे ! हे वक्रतुण्ड महाराज ! याचें या वेळीं इथें काय काम ? असो. या मूर्खाला भलतीच मोकळीक देऊन उपयोग नाहीं. (उघड) कोण आहे तें ?

वक्र०—(हंसत) मी वक्रतुण्ड, आपला आलों होतों--

कीर्ति०--(दटावून) वक्रतुण्डा ! मीं तुला ओळखलें. काय काम असेल तें दुरून बोल. निशाणापासून दहा पावलांच्या आंत आलास तर फुकट जिवास मुकशील.

वक्र०—(स्वगत) अगदीं दहीदाही शंभर पावलांवरून बोलतों. पण अशी कांहीं मोहिनी घालतों कीं आपण होऊनच जवळ हांक माराल. (उघड) म्हटलं एक निरोप होता. जरा बोलावलं होतं. (तोंड वेडेवांकडें करितो.)

कीर्ति०--(रागानें) मूर्खा ! रजपूत शिपाई पहाऱ्यावर असला म्हणजे प्रत्यक्ष काळाचाही निरोप ऐकत नाहीं हें महशूर असून तूं कुणाचा निरोप घेऊन आला आहेस ? चल. चालताहो. नाहीतर फुकट मरशील.

वक्र०--पण त्यांचं पायावर वाहिलेल्या फुलाप्रमाणें कोमल असलेलं अंतःकरण हें उत्तर ऐकून दुखवेल हो !

कीर्ति०--(बसून स्वगत) ईश्वरा ! मला मोहापासून सोडव. याच्या तोंडचे शब्द ऐकून माझें धैर्य एकाएकीं नाहींसें झालें आहे. मोहिनी ! तूं रजपूतकुलकन्या असून असा गुप्त संदेश कसा पाठविलास ? मी अगदीं भ्रमांत पडलों आहें.

पद--चाल-नमुनि शिवा बलवंत रची अति.

भूपति कुलजा होशी दयिते सोडिशि तूं विनयां कां ? ।
दोषास्पद कीं आचरिशी हें राजकन्यके वाया कां ? ॥धृ०॥
मोहित मजवरि समजुं तरी, मी नाहिं तसा शुभमूर्ती ।
उत्सुक जरिही मानुं तरी तुज, ज्ञात असे जनरीती ॥
प्रणयनिरीक्षण समजुं जरी हें, ही न तयां हित रीती ।
कांहीं न कळे मज या ठायां, अनुचित युवति करी कां? १

माझी मति अगदीं कुंठित झाली आहे.

वक्र०--(स्वगत) अँ. बघा कशी मुद्रा झाली आहे ? बरं जरा गंमत करावी. (उघड) कांहो ! कांहीं उत्तर द्याल कीं नाहीं ? हा मी चाललों नाहीं तर. (जाऊं लागतो.)

कीर्ति०—(विनवीत) अरे ! वक्रतुण्डा ! असं काय करतोस ? निरोप कुणाचा आहे, काय आहे, तें स्पष्ट सांगशील किंवा नाहीं ?

वक्र०-(स्वगत)हा एवढा शूर पण कसा गोगलगाय बनून गेला आहे. या बायकांची कमाल आहे बुवा ! निरोप ऐकण्यापूर्वी आम्हांला शौर्य दाखवीत होती स्वारी ! बरं आतां जरा आणखी मजा करावी. (परत येऊन उघड) अहो ! मी तर तो निरोप कुणाचा, काय, तें सर्व सांगेनच ह्मणा. पण मजजवळ एक मुकी आहे ती देखील सर्व सांगेल. समजलां ?

कीर्ति०--अरे वक्रतुण्डा ? हा थट्टेचा समय नव्हे. काय तें स्पष्ट सांग.

वक्र०--(स्वगत आंगठी काढीत काढीत) चल. छु मंतर. आतां अशी भारणी करतो कीं यंव्. (आंगठी काढून उघड) ही पहा ती मुकी. तुमच्या आहे कां ओळखीची ?

कीर्ति०-(अंगठी घेऊन स्वगत) छेः ? आतां कसली शंका ? आतां तर माझा धीर पार नाहींसा झाला. तिचीच ही ? (आंगठीकडे पहात)

पद- चाल-मजवरि तरु कुसुमरेणु.

अवाचित मज विकल केविं करित मुद्रिका ।
किरणसवें सुमनबाण बाण मारि कां ? ॥ ध्रु० ॥
मुद्रिका न, हा सखिचा नयन मज दिसे ।
कीर्ण किरण, हे कटाक्ष प्रणयगत जसे ॥
सकलमुद्रिका ही कीं सुतनुचें हसें ।
मादक ही विकल करी वारुणीच कां ? ॥ १ ॥

आतां काय करावं ? (विचार करितो)

वक्र०-(स्वगत) नुसती अंगठी पाहिली तर इतकं ? मग प्रत्यक्ष ताईसाहेब पुढें आल्यावर काय होईल कुणास ठाऊक ?

कीर्ति॰–(स्वगत) छे ? कांहींच निश्चयात्मक ठरवितां येत नाहीं. जावें अथवा न जावें ?

पद्–चाल–कां पतिनि मजसि आजि.

हें द्विविध मनचि मम जाहलें ॥ धु॰ ॥
स्वकार्यनिष्ठा मजसि परतवी ॥
सखि ही माझे भान हरपवी ।
जाळी मज मदनानलें ॥ १ ॥
काय करावें कोठें जावें ? ।
उगिच असे कां स्वस्थ रहावे ॥
मंत्रीं जणु मज मोहिलें ॥ २ ॥

(प्रेमविव्हल होऊन) अथवा मोहिनी ? हा मी आलोंच ?

पद्–चाल–वस्त्रानें देह सारा सुंदरिनें.

सुंदरि कां जलदबिंदू अवगणिला चातकें ? ।
अवगणिलें कीं चकोरें विधुरश्मीमालिकें ? ॥
लोटियली दूर किंवा धनराशी निर्धनें ।
अवमानी केंवि मी गे तुजलागीं शोभनें ॥ १ ॥

(उघड) वक्रतुण्डा ? मला लवकरच परत येतां येईल ना ?

वक्र॰– (वेडेवांकडे हंसत) आतां तिथें तुम्हाला किती वेळ लागेल हें मला कसं सांगतां येईल ? शिवाय ही पहिलीच भेट ? बरं चलायचं कां ?

कीर्ति– (स्वगत वर पाहून) परमेश्वरा ? मी येईपर्यंत निशाणाचं रक्षण करणारा तूंच आहेस ! उघड) हँ. चल.

(जातात.)

प्रवेश दुसरा पूर्ण.

प्रवेश तिसरा.

स्थळ—ललितेचा महाल.

[ललिता, मोहिनी वगैरे बसल्या आहेत.]

मोहिनी—वहिनीसाहेब ! आज चार दिवस सारखी विचारीत आहें, पण तुम्ही कांहींच सांगत नाहीं ना ?

ललिता— स्वगत) आतां सगळं कळेल अशी माझी खात्री आहे. (उघड) काय सांगू वन्सं ? नुसतं " सांगत नाहीं ना " म्हणून माणसांनीं काय समजावं ?

मोहिनी--शर्थ आहे बाई तुमच्यापुढें ! म्हणजे इतका वेळ मी बडबडलें तें पालथ्या घड्यावरच का पाणी झालं ? (मोठ्यानें) माझी आंगठी सांपडली आहे का ? आतां तरी समजलं काय सांगायचं तें ?

(**कीर्तिसिंह** प्रवेश करितो.)

कीर्ति०--(आड उभा राहून साश्चर्य स्वगत) म्हणजे याचा अर्थ काय ? मजकडे अंगठी मोहिनीनें पाठविली नव्हती काय ?

ललिता--वन्सं ! असं रागवायला काय झालं ? अंगठी किनई जायच्याच ठिकाणीं गेली आहे.

मोहिनी०—(रागावून) वहिनी ! तुम्ही अशीच माझी नेहमीं भलभलती थट्टा करतां हें कांही चांगलं नव्हे.

कीर्ति०—(दुःखानें स्वगत) दैवा ! फार चांगली धाव घेत-लीस ! आतां शंका कसली ? हें जर कोणाला कळलं तर—

साकी.

म्हणतिल मजला स्त्रैण असे हा निंदितील जन मातें ।
कलंक सुकुलां अर्पियला मी व्यर्थ येइ जन्मातें ॥
न सुचे कांहिं मला । सरली कीर्ती मम विमला ॥ १ ॥

असो ! आतां यांचा संवाद तरी पूर्ण ऐकावा.

ललिता—वन्सं ! त्यांत थट्टा कसली ? मी कांहीं खोटं कां सांगत आहें ? आतां चोरून काय उपयोग ? आणि तशांत तुम्ही केलेली निवड कांहीं गैर नाहीं.

मोहिनी—(स्वगत) वहिनींना बाई हें कुणी सांगितलं ? कां त्यांनीं स्वतःच पाहिलं ? (उघड) वहिनी ! पण माझी अंगठी कुठें आहे तें नाहीं का सांगायचं ?

कीर्ति०—(स्वगत) काय ? एकंदरींत हें सर्व ललितेचं कृत्य ? मोठंच आश्चर्य ! ललिते ! तुजसारख्या राजपत्नीस हें कसं शोभलं ? असो ! याचा पुरा निर्णय झाल्यावांचून येथून जाणें इष्ट नाहीं !

ललिता--वन्सं ! मला तुमच्याविषयीं कांहींच वाटत नाहीं असं कां तुम्हांला वाटतं ? माझ्यापासून ती गोष्ट तुम्ही कां चोरून ठेवावी बरं !

पद--चाल-जरी कुणा श्रीमंताची सून.

युक्त योजिलें कीं चित्तीं प्रियकरां सुशोभनां । हर्षवीत सखये बहु ही मनां थोर कामना ॥ ध्रु० ॥ जन्हु-कन्यका अवतरली सागरा जशी ती ॥ शीतकिरण चरणीं रमली कीं विभावरी ती ॥ वीरकन्यका वीरांशी उचित, हीच रीती ॥ मजसि भिन्नता कां माया नाहें काय मन्मनां ॥ १ ॥

मग वन्स ! माझ्याजवळ हें सांगायाला कांहीं हरकत होती कां ? (हंसत) मी आपली तुमच्यापाशीं मनमोकळं बोलतें पण तुम्ही मात्र फायद्याचं तेवढं मजजवळून चोरून ठेवतां ?

मोहि०--(लाजुन) हें काय वहिनी ! पण माझी आंगठी नाहीं का देत ? (तोंड रडवें करिते.)

ललि०--(हंसत) इश्श ! अंगठीच ना ! मग त्यांत रडायला काय झालं !

कामदा.

येत कां अशी नयनिं आसवें ।
अंगुलीय तें प्रियकरांसवें ॥
प्राप्त ते क्षणीं होत राजसे ॥
मंत्रवागुरा-बद्ध फणि जसे ॥ १ ॥

मोहि०----(घाबरून) म्हणजे काय ? यांनीं माझी अंगठी तिकडे कां पाठविली आहे ? (उघड) हें काय बरं वहिनीसाहेब अशी का एखाद्याची थट्टा करावी ? आतांशीं दादासाहेबांनीं त्यांना निशाण संभाळायाला नेमलं आहेना ? ते जरी शूर आहेत तरी राजभगिनीची आंगठी पाहून त्यांना कसा धीर धरवेल ? हें जर दादासाहेबांच्या कानावर गेलं तर त काय शिक्षा करतील बरं ?(कळवळ्यानें) काय होईल तें खरं बाई ! जगदंब ! त्यांना निशाण सोडून येण्याची वासना देऊं नकोस.

कीर्ति०—(स्वगत) इतके भाग्यशाली ते कोठें आहेत !

ललि०---आयाईग ! वन्सं इतक्यांतच कां एवढी काळजी !

मोहनी०—वहिनी ! तुम्हाला सारीच थट्टा दिसते. अहो कुणालाई आपल्यासाठीं विनाकारण दुःख भोगण्याला लागलं तर वाईट नाहीं कां वाटणार?

ललि०--(हंसत) आणि तशांत आपल्याच माणसाला लागलं तर मग काय विचारावं ! असंच ना ! अहाहा ! वन्स ! कांहीं अधिक उणं झालं तर माझं जवळ अगदींच वजन नाहीं का ?

मोहि०----हें पहा वहिनीसाहेब ! तुमचं नवीनच लग्न झालं आहे तेव्हां तुह्मांला अजून दादासाहेबांचा स्वभाव पुरा कळला नाहीं. सरकारी कामांत ते ब्रह्मदेवाचं देखील ऐकणार नाहींत. समजलां ?

[**वक्रतुण्ड** धांदलीनें प्रवेश करितो.]

वक्र०----ताईसाहेब ! येणं झालय ना ?

मोहि०—कायरे चावटा ?

ललि०—(घाबरून) अरे म्हणजे काय ?

वक्र०—ते कीर्तिसिंह इथें मघाशींच आले आहेत.

ललि०—आणि तूं कुठें काळ केलं होतस ?

वक्र०—अँ ? चालून चालून दमलों होतों म्हणून आपला थोडे पोहे खाऊन आलों.

ललि०—म्हणजे त्यांनीं आमचं भाषण ऐकलं का ?

वक्र०—हो. हो. अगदी सगळं ऐकलं.

(**कीर्तिसिंह** पुढें येतो.)

ललि०—(एकीकडे) वन्सं ? आतां तुम्ही तरी त्यांना कांहीं सांगून समजवा. मी जाते बाई ? हा वक्रतुण्ड आहेच तसला विद्रा. (धांदलीनें दासींसह जाते.)

वक्र०— स्वगत) ही एक मोठी गंमत आहे बुवा ! चला आपणही जावं. उगीच दोघांत तिसरं कशाला ? (वेडावांकडा चालत जातो.)

मोहि०—(स्वगत) प्रियकरा ? माझ्यासाठीं आपण उगीच फसलांत. (साल्हाद) परंतु हेंही एक प्रकारें बरं झालं. आपली मूर्ति मी आतां डोळेभरून पाहीन.

(कीर्तिसिंहाकडे पाहून) अगबाई ?

पद—चाल—होय संसारतरु मुग्धकोरक.

काय हा काम शिवदृष्टिदग्धाचि नयनिं ।
पाहि मी पंचशर आज बाई भुवनिं ॥ ध्रु० ॥
रम्यमुख चंद्रसम । अधरही बिंबसम ।
कांति सर्वानुपम । तेज झळके नयनिं ॥ १ ॥
बहिरुपाधीविहित । प्रेम नाहीं खचित ।
यांस बघुनी येत । हृदय केवीं भरुनि ॥ २ ॥

पण आतां मी बोलूं तरी काय ? माझा कांहीं बाई धीर होत नाहीं.

कीर्ति०—(स्वगत) प्राणप्रिये ? निशाणाचं काय होणं असेल

ते होईल. परंतु हृदयंगमे ? तुझी मूर्ति हृदयांत नीट सांठवून ठेवूं दे. (मोहिनीकडे पाहून)

पद–चाल–ऐकराया दे रघुराजजाया.

नेत्र लीला । जिंकि सखीची नीलां ।। ध्रु० ।।
गर्व खंडिल सुंदरींचा स्वर्गिच्याही सुंदरी ।
अप्सरा ही अवतरे वा शापिता धरणीवरी ।। १ ।।
सर्गनिधि कीं हा विधीचा फिरतसे जगतावरी ।
रूपगर्वितकामिनीजनमान खंडित सत्वरीं ।।२।।

असो ! आतां आपणच भाषणास सुरुवात करावी. (उघड) राजकन्ये ! तुझ्या अंगठीनें–

पद–चाल–ग्यां लोटिली संकटीं.

मज पाडिले कीं फशी । मंदमती जे मोहसुजालीं
मोहतील त्या गतिच अशी ।। ध्रु० ।। स्वार्थ न ये
परमार्थ न हातीं । विमलयशाची झाली माती ।
दुष्कृत घालि उडीं मजवरती धावुनी व्यालशी ।।१।।

राजकन्ये ! यांत माझा अपराध असल्यास क्षमा कर.

मोहि०–(स्वगत प्रियकरा!या दासीनं क्षमा मागावयाची ती आपल्याला मागण्याची पाळी आलं ना!मींच आपली क्षमा मघापासून मागण्याचा यत्न करीत आहे पण मेला शब्दच उमटत नाहीं (विचार करून) आतां यांना हांक तरी कशी मारावी ? " प्रियकरा ! " असं उघड म्हणूं का ? पण नकोग बाई ? मी कुमारिका आहे ना ? (विचार करून) हो. असंच करावं. (उघड) वीरवरा ? आपणाला या अभागिणीकरितां उगीच श्रम झाले त्याची क्षमा करा.

पद––चाल– बहुत छळियलें.

उगिच शिणविलें ।। वीरा ! संकटिं लोटिलें ।। ध्रु० ।।
पाडियलें मोहीं तुम्हाला ।। निजकार्या, आर्या, आतां,

त्यजिलें, ऐसें नृपतीला ॥ हें सारें समजे तरी करिल काय ना कळे ॥ १ ॥

मी आज अधीक काय सांगावें ? परंतु

पद--चाल पंजाबी- **बैरागी मेरे राम.**

ठेवावी संस्मृती ॥ एकांतीं वदु किती ॥ ध्रु० ॥ प्रिय-जन दिसतां युवतिजनाच्या त्यां मोदां ना मिती ॥ १ ॥ अधिक वदुनि कां मुग्ध कुमारी भावांतें दाविती ॥ २ ॥ यशोधवलिमाजितविधुकांती ॥ एकांतीं वदुं किती ॥ ३ ॥

आतां आपण लकवर परत जावंत हें बरं. निशाण रात्रींच पहाऱ्याशिवाय असणं धोक्याचें नव्हे कां ?

कीर्ति०—(साल्हाद स्वगत) कीर्तिसिंहा ! आज तूं कृतकृत्य झालास. मोहिनी ! तूं आपलें हृद्गत पूर्वींच प्रगट केलें होतेंस तेव्हां आज पुन्हां कांहीं सांगण्याची अवश्यकता नव्हती हें खरंच आहे. शिवाय--

दिंडी.

बोलिलें तव अनुरागरागवाही ॥
कान्तमुख मज सुमुखि तें सर्व कांहीं ॥
आधिक, सोडुनि वदशील काय शील ॥
करिल इतुकेंही मजसि धैर्यशील ॥ १ ॥

(उघड) राजकन्ये !

पद--चाल--**जागृत ठेवा लग्नाची.**

विस्मृति होईल ती कैशी या समयाची ॥ ध्रु० हृत्पटलीं हे लिखिताचे सम गे मी वाची ॥ " दे स्थल हृदयीं दासाला क्षण तरिं " हें याची ॥ १ ॥

मोहि०--(स्वगत) काय म्हटलं " दे स्थल हृदयीं दासाला" मना ! हें ऐकून तुला मोह पडत चालला आहे. पण सावध हो. हा

समय नव्हे (उघड) अजून खात्री नाहीं कां झाली ? आतां आपण परत जावं हें बरं नव्हे का ?

कीर्ति०--राजकन्ये ! मी जातों. परंतु--(आंगठी पुढें करून)

साकी.

दुष्ट नको मज अंगुलीय हें बहु शिणवी गे
नयनां ॥ कपट--युक्ति हें मंत्रकारसे कुटिलचि वी
ह्यां नयनां ॥ अपुलें सांभाळी ॥ तापें मन्मानस जाळी १

मोहिनी—(स्मित करून) इतका कां तिचा कंटाळा आला ! कांहीं नाहीं, तिला स्थान मिळालं आहे तेंच योग्य आहे. हें पहा–

पद—चाल–उद्धवा शांतवन कर जा.

ही असो जवळि कीं अपुल्या, प्रेमाची खूण म्हणोनी ।
ही देइल मद्विनतीची, स्मृति द्या नच झिडकारोनी ॥
ही करविल शौर्यचि समयीं, संगरिं कीं बल देवोनी ।
ही प्रेमबंधनीं घटवी दृढतर सान्निध्य करोनी ॥
॥चाल॥ रमवील फावल्या काळीं । जरि वियोग आप-
णा जाळी ॥ म्हणुं नका मला " सांभाळी " ।
मजजवळीं येइल सुदिनीं ॥ १ ॥

कीर्ति०—(स्वगत) अहाहा ! अंगठीच्या मिषानें तरी सुंदरीचा करस्पर्श होईल म्हणून ती देत होतों. पण त्याहीपेक्षां अधिक सौख्य झालं

पद--चाल–झाली सफलहि मम मनकामना.

आतां अधिक न मम मनिं वासना ॥ धृ० ॥
करयोग न जरि घडला, सखि ही । शतगुण
सुखवित या मनां ॥ १ ॥ हृद्गत वदुनि सखिनें
सारें । केलें सार्थक या जनां ॥ २ ॥

मोहिनी--आतां अजून परत जावंसं वाटत नाहीं कां ?

कीर्ति०--(स्वगत) आतां निघालोंच होतों. परंतु सुंदरी दर वेळेस अधिक मोह उत्पन्न करणाऱ्या तुझ्या मोहक भाषणानें माझें मन पुन्हां आकर्षित केलें आहे. (विचार करून) परंतु छेः ! असें करून उपयोग नाहीं. आतां मला सत्वर गेलेंच पाहिजे. (उघड) राजकन्ये ! येतो आतां.

(तिजकडे पहात जातो.)

मोहिनी--(त्याकडे पहात स्वगत) गेले. रूपसृष्टी दृष्टीच्या पुरी आड झाली. (दृष्टि फिरवून) किती तरी गंभीर मुद्रा ! भाषण तरी किती गोड आणि विनययुक्त ! प्रियकरा !—हो ! आतां त्यांना प्रियकर म्हणायला काय हरकत !—प्रियकरा ! आपण मजसाठीं फसावत असाच योग होता त्याला मी तरी काय करूं ? (आठवल्यासारखें करून) अग बाई ! पण निशाण सुरक्षित असेल ना ! ईश्वरा !--

पद--चाल-होय मला अपशकुन असा का.

आश्रय कीं पदकमलवरा कां । झालें देवा शरण अनेकां ।।धृ०
ठेवि सुरक्षित दीनदयाळा दादांची ती विजयपताका ॥ १ ॥

(दुःश्चिन्ह झाल्यासारखें दाखवून) अग बाई ! पण मला असं काय होतंय ?

दक्षिण परि हा अदक्षिणासम स्फुरणां दावी नेत्र असा कां२
साधुनि संधी दुष्ट कुणीं कां साधित दावा नेत पताका ॥३

काय असेल तें असो. माते ! भवानी ! माझा सर्व भार तुझ्यावर आहे ग बाई !

(जाते.)

प्रवेश तिसरा पूर्ण.

प्रवेश चवथा.

स्थळ—रजपूत छावणी बाहेरील मैदान. उदेपूरचे छिन्नविछिन्न निशाण.

[**कीर्तिसिंह** प्रवेश करितो]

कीर्ति०—(निशाणाकडे पाहून दुःखानं स्वगत) हर ! हर ! झाला—अवतार येथेंच संपला.

पद—चाल— मजवरि हें आलें संकट कैसें.

मार्ग नसे आतां । भूवरि दुसरा । आतां नच त्राता ।
। भूवरि दुसरा । मदंत परिसुनि हृदयाविदारण होईल
कीं तव वार्धकिं ताता ! ॥ माते । निजहातें । करातें ।
धरुनी वाढविलेस माते ॥ आठवितां हें शोकजलाच्या
नेत्रिं तुझ्या गे येतिल सारिता ॥ १ ॥

शिव ! शिव! दुष्टा विधे ! हा कीर्तिसिंह मरणाला मुळींच भीत नाहीं परंतु—

पद—चाल— जन सारे मजला म्हणतिल कीं.

अपकीर्ती पदरीं आली ही ॥ ध्रु० ॥
निंदास्पद मज वदतिल सारे ॥
भूमि शिणविली म्हणतिल भारें ।
चिंतुनि हें मन ये माघारें ।
कृतांतभय लव मज नाहीं ॥ १ ॥

(उच्छ्वास सोडून) ईश्वरा ? माझ्या निर्मल यशाला अंतीं असें काळाकुट्ट डाग पडणार हे मनांत येऊन माझ्या काळजला घरे पडत आहेत ! (कांहीं वेळ स्तब्ध बसून) लाडके ! सुंदरी ! मोहिनी ? आतां तुझी अवस्था काय होईल ?

ठुंबरी—चाल—मज चैन नसे.

मज आठवुनी पलभरतरी ॥ धु० ॥
कोमल मन तव भग्नचि होईल शोकलहरि तव श्वसित हरी १
स्मरशिल सारे प्रणयसुभाषित तापें स्मर तुज विकल करी२

(स्तब्ध बसून) वीर्यासिंहा ! तूंही मला कपटी समजशील ? (उद्विग्न होऊन) अथवा वृथा शोक करून तरी काय फल ?

पद—चाल-आतां शशिमुखिच्या विकथनिं.

चिंता मनिं करुनी विधिविलिखित कां तें टळे ॥ ध्रु० ॥
आधीच लिहिलें भालिं विधीनें, अन्यथा न तें होई ।
अभाव्य जें कीं संभव त्याचा, कल्पांतींही नाहीं ।
सत्य; तरी मग चिंतेचा हा ओघ मोघ कां आतां ॥ १ ॥

(पडद्यांत)

" मित्रा ? असा धीर सोडूं नकोस "

कीर्ति०—(ऐकून स्वगत) अरे हा ध्वनि कोठून आला असावा ? अथवा (वर पाहून) ईश्वरा ! मला वाचविण्याकरितां तूं एखादा दूत पाठविला नसशील ना ?

[**अमीर** प्रवेश करितो.]

अमी०—(कीर्तिसिंहास जवळ घेऊन) मित्रा ? असा धीर सोडूं नकोस.

कीर्ति०—(साश्चर्य) कोण ? अमीर साहेब ?

अमी०—नव्हे. तुझा वचनबद्ध मित्र. असो ! कीर्तिसिंहा ? आतां चल.

कीर्ति०—(सद्गदित होऊन) प्रियमित्रा ?

दिंडी.

जातिभिन्नत्वा दूर सारुनीया ।
येशि रक्षाया सुजनमाननीया ॥
नाहिं दिसला तुज सारखा वदान्य ।
दिसत नाहीं दिसणार नाहिं अन्य ॥ १ ॥

अमी०—(स्वगत) कीर्तिसिंहा ? दैवानें तुझी पुरी कसोटी पाहण्याची वेळ आणली आहे. तरी तुला कसाला लावतों. (उघड)

छे ? छे ? मित्रा ! माझी इतकी स्तुति कशाला ? अकबरशहाचे आश्रयास गेल्यावर काळाचेंही भय कमी असते.

कीर्ति०—(तिरस्कारानें) म्हणजे काय ? तूं मला शत्रूकडे पळून जाण्याची युक्ती शिकवीत आहेस होय ? अमीरा धिःकार असो तुला ?

पद—चाल–लते खचित तूं प्रियकरिणी.

कसें शिकविशी भलभलतें । अथवा जाशी जातीवरती, त्यांत नसे लव नवलचि तरि तें ॥ ध्रु० ॥ लावुनी रे डाग कुला मी । आज जरी । जगलोंच तरी ॥ मजला अमरीं । पद का मिळतें ॥ १ ॥

चल ? चालता हो येथून ? तुझा माझा स्नेह इतकाच.

अमी०–(स्वगत) शाबास कीर्तिसिंहा ! शाबास. तुझ्याशीं स्नेह करण्यांत मला फार अभिमान वाटूं लागला आहे. (उघड) मित्रा ! पण जरा एकीकडे चल. मी काय सांगतों तें ऐकून तर घे.

कीर्ति०–(स्वगत) असो ! मित्र आहे. काय म्हणतो तें पुनः ऐकावं. (उघड) बरं चल.

(जातात)

प्रवेश चवथा पूर्ण.

प्रवेश पांचवा.

स्थळ–रजपूत छावणीबाहेरील मैदान.

वीर०–(त्वेषानें स्वगत) प्रतापसिंहा ! तू अन्यायाची आणि हटवादीपणाची कमाल केलीस ! मूढा ! तू कीर्तिसिंह म्हणजे काय समजलास ? त्याच्या अन्नावर पोसलेला हा अखंड पिण्ड तुझ्या सैन्यांत संचार करण्यास समर्थ असतां त्याच्या एका केसालाही हात लावण्याची तुझी काय प्राज्ञा ? अधिकाराच्या मदांत कीर्तिसिंहास केलेली शिक्षा पार पाडण्याचा प्रयत्न करशील तर या वीर्यसिंहाची— (तरवार काढून)

साकी

नेइल सर्वां असिधारा ही धारातीर्थी कुटिला ।
गर्वारूढा ! ओढिल तुजला नयमार्गी मद्जटिला ॥
कीर्तीसिंहाची । दाविल महति तुला साची ॥ १ ॥

(विचार करून) अरे ! तूं कीर्तिसिंहास न्यायानें–सुळाची नव्हे तर त्यांहीपेक्षां अधिक कडक शिक्षा केली असतीस तरी हा वीर्यसिंह आपल्या स्वामीस महापातकी समजून नशीबाला दोष देऊन स्वस्थ बसता. परंतु मूढा !

चाल–जीस कपट ठाउकें.

पापलेश नाचरी नसेच दोष अंतरीं ॥
रक्षण्या तुला नृपा ! स्वशस्त्र जो करीं धरी ॥
तयांस, ऐकतां न वृत्त, दाविशी वधस्थलां ॥
सूर्यवंशीं जन्मुनी कलंक लाविला कुलां ॥ १ ॥

प्रतापसिंहा ! धिःकार असो तुला !

पद—चाल–चतुरानन हा विधि.

न्याय नसे तो नृपती कैसा ॥ सुमार्गदर्शक नेत्र राहितसा ॥धृ०॥ कांहिं न बघतां कांहिं न पुसतां वाधिशी अदोषी केंवि दोषिसा ॥ १ ॥ क्रोधविवश तूं नृपदूषण रे ॥ षड्रिपुदमनीं होशि विकलसा २

प्रतापसिंहा ! अविचारी कृत्यांचा पश्चात्ताप करण्याचा प्रसंग खात्रीनें येतो हें तुला समजलें नाहीं असें दिसतें. (उद्विग्न होऊन) सरकार ! मी आपल्याला विचारलं तेव्हां आपण मला झिडकारून " वश नच होती मद्नाला " असं सांगितलं; आणि माझ्या मठ्ठ डोक्याला तेंच खरं वाटलें! अथवा दैवानुसार सर्व घडतं. त्याला कोणाचा उपाय ? थोरल्या सरकारस्वारीच्या कानीं ह्या आपल्या हालअपेष्टा गेल्या तर त्यांची काय अवस्था होईल ! (शोक आवरून) अरे पण मी असा शोक करीत काय बसलों आहें ! (त्वेष आणून) वीर्य-

सिंहा ! रजपूत खाल्लेल्या अन्नास कितपत जागतो तें पहाण्याचा आज समय आला आहे. तर चल. तयार हो.

पद--चाल-कंठ चरचर चिरुनि मारिन.

घेउनी करि शिर करी स्वामिमुक्ती झडकरी ॥
निर्दलोनी निर्दयासी, न्याय दाखवि संगरीं ॥
स्वामिभक्तीची पताका रोंवुनी जगतावरी ॥
आत्ममानासिं तुष्ट होई सुजनता सुजनीं वरी ॥ १ ॥

(जातो.)

प्रवेश पांचवा पूर्ण.

प्रवेश सहावा.

स्थळ—मोहिनीचा महाल.

मोहि०--(शोकाकुल स्वगत) वहिनी ! तुम्हांला ही भलतीच थट्टा करण्याची कशीहो वासना झाली ! (आधिक शोकानें) झालं. आतां सगळ आटपलं ! आश्रयाचा वृक्ष पडला असतां वरील लता कशी जगणार !

पद—चाल-अचाकित जाऊं मै बिरहन.

दशदिशिं झालें शून्य सकल ॥ प्रणयनिलय
संहारुनि हा विधि दाखवि मज बल ॥ध्रु० ॥मदन
मनोहर रणशूरां त्यां दुष्टा लोटुनि संकटिं आतां ॥
सांग विधे तुज काय मिळत मज तरि जगवुनि
फल ॥ १ ॥

(विचार करून) ईश्वरा ! तुला दीनांचा त्राता म्हणतात तें खोटंच का रे ! मी असं कोणतं पातक केलं कीं तूं मला इतकी भयंकर शिक्षा केलीस ! दयासागरा !

पद---चाल-मी समजूं तरि काय.

हें तुजसि तरि काय रुचे शिव ! ॥ प्रणयकलिक ती कुसुमित नसतां तोडियली कशि सांब सदाशिव ॥ धृ० ॥ मुखधृतजलभाजन हें अथवा ॥ बळें काढिलें ओढुनि देवा ॥ कसा साधिला असाचि दावा ॥ शिव शिव आतां तारि सदाशिव ॥ १ ॥

प्राण विसाव्या ! कीर्तिसिंहा ! आतां माझे मनोरथ कोण पूर्ण करील ! इतकं प्रेम दाखवून त्याचा शेवटीं असा अंत करणं आपल्याला आवडलं का !

पद---चाल-व्यर्थ मी जन्मलें थोरकुळीं.

व्यर्थचि कल्पिलि सुखलहरी ॥ अंति होय शशशृंगपरी ॥ ध्रु० ॥ मजला कांतासाठीं वरितां, पडते कृतांतकरीं ॥ १ ॥ मानसिं येउनि प्रीतिनिवेदित, भानचि माझे हरी ॥ २ ॥

(दीर्घ उच्छ्वास सोडून) अथवा परमेश्वरा ! मला अश्रु ढाळायला जिवंत ठेवण्यापेक्षां आधींच माझे डोळे कां मिटविले नाहींस ?

पद---चाल--आजि अक्रूर हा नेतो.

हतभागी मी जगलें तरि कां देवा हरपतां प्रीतिचा ठेवा ॥ कीं बधिर मला कां नच केले देवा ॥ मी नसतां केला हेवा ॥ चाल ॥ नच केलें पातक कांहीं ॥ कीं देहीं फोडिशि लाही ॥ गतजन्मींचें दुष्कृत अथवा देवा अवचित हा साधी दावा ॥ १ ॥

[**ललिता** प्रवेश करिते.]

ललि०---वन्सं हें काय असं वेडयासारखं ?

पद---चाल--रडसि काय ह्मणुनि.

सूज्ञ तुह्मि असुनि असें काय हें गडे ॥
कोणतें न खचित कळे पडत सांकडें ॥ धृ० ॥

रडुनि रडुनि केंवि नेत्र लाल जाहले ॥
फिरुनि फिरुनि सारुनि हे केश विखुरले ॥
स्फुंदनिं हा हृदयसवें अधरही हले ॥
होत काय मजसि वदा आवरा रडें ॥ १ ॥

मोहि०--(तिला मिठी मारून) वहिनी ! अजून तुम्हांला थट्टाच वाटते कां !

पद--चाल--लग्न नव्हे मरण उद्या.

कांत नव्हे प्राण दुजा लपतां तो साहूं केंवि । ध्रु॥
अंतरिं न धीर कांहीं । सुचत कांहीं मजसि नाहीं ।
देहाची होत लाहि । साहूं गडे दुःख केवीं ॥ १॥
अस्ताचलिं चण्डकिरण । जातां तम माजवि रण ॥
करितो तो तेजहरण । समय सखे गमत तेवीं ॥ २ ॥

दादा तुम्ही तरी इतके निष्ठुर कसे झालां हो ! तुम्हीं आपल्या हातांनींच माझं सौभाग्य नाहींसं करतां ना ?

ललिता--(तिला पोटाशीं धरून गहिंवरून) वन्सं ! नकाहो असं भलतंसलतं बोलूं.

पद--चाल--यादवराया भाईयारे.

पाहुनि तुम्हां दुःखित माझें तिळतिळ काळिज कीं तुटतें ।
दुःखें तुमच्या नेत्रीं माझ्या अश्रुजलाचें ये भरतें ॥ १ ॥
अश्रु पुसा हो ! शोकां आवरा सोडुं नका तुम्हि धीरातें ।
जाउनि आतां जवळी, कथितें कांता तुमच्या सोडवितें ॥२
तिळही नाहीं सांगा काहो माझि तुम्हावरती ममता ।
दुःख मनींचें सगळें सोडां सोडवितें तुमच्या कांता ॥ ३ ॥

मोहिनी--(गहिंवरून) वहिनी !

पद--चाल--काय मी अभागिणी.

कोण होय या जनीं । अधिक मजसि तुम्हाहुनी ध्रु० ॥
इतर कोण वाहणार । माझा हो सर्व भार । मजसि एक

तुम्हि आधार । अधिक काय बोलणार । येत गडे कंठ दाटुनी ॥ १ ॥

(सद्गदित होऊन) खरंच हो वन्सं ! चला आतां मजबरोबर.

(जातात.)

प्रवेश सहावा पूर्ण.

प्रवेश सातवा.

स्थळ--प्रतापसिंहाचा खासगत दिवाणखाना.

[**प्रतापसिंह** फिरत आहे.]

प्रताप०--(त्वेषानें स्वगत) अरे कुलकलंका कीर्तिसिंहा !

पद--चाल- जठरा नलशमवाया नीचा.

कुटिलाधम नरनंदी कारे जन्मतां न तूं जाशि लयातें ॥धृ०॥ वीर परी तूं निश्चित तैसा । विषकुंभचि कीं दुग्धमुख जसा ॥ सुभाषि अथवा दुर्जन जैसा । दर्शन दे तव अधोगतीतें ॥ १ ॥

तुला मी आजपर्यंत शूर म्हणून मान देत असे. परंतु कुमारसिंहाच्या सांगण्याप्रमाणें तूं आपल्या जातीवर गेलास. मूढा ? इतका स्त्रैण होतास तर रणांगणांत तरी कशाला आलास ? (अति त्वेषानें) आणि अपरात्रीं कोणाची भेट घेतलीस ? जिच्या केसाकडेही पहाण्याची कोणाची प्राज्ञा नाहीं त्या (छातीस हात लावून) या--प्रतापसिंहाच्या--बहिणीची ! काय करूं रे ! देहान्तप्रायश्चित्तापेक्षांही अधिक कडक शिक्षा ईश्वरानें ठेवली असती तरी तिलाही तूं पात्र होतास. मोहिनी ! दुष्टे !--

अंजनीगीत.

व्याघ्रमुखीं कां पडलिस नाहीं ।
दग्ध करि न कां तुज वन्हीही ॥

सत्कुलकीर्ती कीं विलयां ही ।
नेण्या जगलिस तूं ॥ १ ॥

तूं आपल्या दुष्ट कृत्यानें विमलसूर्यवंशास कालिमा आणलास. (विचार करीत बसतो.)

(**ललिता** प्रवेश करिते.)

ललिता—(स्वगत) वन्संना मीं अगदीं खात्रीनें सांगितलं आहे कीं मी कीर्तिसिंहाची मुक्तता करिते. परंतु इथें आतां मीं बोलूं तरी काय असं झालं आहे. तरी बरं कीं माझ्या चतुरिकेनं मला सगळं शिकवून ठेवलं आहे. काय नामी करामत काढलीन ! माझ्यावरचा दोष दूर करून वन्संनाही अगदीं नामानिराळ्या ठेवल्यान्. असो ! पण आतां सुरवात केली पाहिजे. (प्रतापसिंहाजवळ जाऊन उघड) प्राणनाथ !

प्रताप०—(तिजकडे पाहून त्रासून) कां ? आज येथवर येण्याचें काय कारण ?

ललिता—(सविनय) तसंच जरूरीचं काम आहे म्हणून—

प्रताप०—(रागानें मध्येंच) हं. एकूण तुम्हां बायकांनाही जरूरीचीं कामें असतात ! ठीक आहे. काय म्हणणं आहे ?

ललिता—(रडवें तोंड करून) हें काय गडे ! इतकं रागवायला काय झालं ?

पद—चाल–सुखवि नयन ही.

राग असा कां करितां कान्ता ॥
नत ही किंकरि विनवित असतां ॥ध्रु०॥
पाहुनि अपुली सकोपमुद्रा कंप सुटे मज भय ये चित्तां ॥१
मावळली कां माया सारी मजसि वदावे हे गुणवंता ॥२॥

प्रताप०—(स्वगत) हिच्या भोळ्या मुद्रेकडे पाहिलं म्हणजे माझा सर्व राग नाहींसा होतो. (तिला जवळ घेऊन) बरं. मी रागावत नाहीं. काय म्हणणं आहे ?

ललिता—(स्वगत) आतां मला धीर आला. (उघड) प्राणनाथ !

पद---चाल--तनु ईची सुंदरा.

ऐकावे नरमणी । करुं नये कुणी । होई निंदास्पद
जें जनीं । झालें वादहेतु सज्जनीं ॥१॥ कोपातें
आवरा । म्हणुनि नरवरा । विनवी जोडुनि दासी
करां । हेतू पुरवा शौर्याकरा ॥ २ ॥

प्रताप०—(स्वगत) वाः ! आज हें अगदीं नवीन दिसतं ! इतकं प्रौढ बोलतांना हिला मी कधींच ऐकिली नाहीं. असो ? हिचं म्हणणं काय आहे तें स्पष्ट विचारावं. (उघड) ललिते ! तूं हा कशाचा उपक्रम करीत आहेस ? स्पष्ट सांग.

ललिता—प्राणनाथ ! आपण कीर्तिसिंहाला शासन केलंत परंतु—

पद—चाल–सुकालीं भूमी पेरियली.

नसे तो दोषी भूमिपती !। करावा कोप न त्यावरती ।
विनंती ऐकुनी घ्या पुरती । तुम्ही मग न्याय करा नृपती ॥
अदोषी वधुनी गुणराशी । नका वरु पदरिं पापराशी ।
केवळ भास खरा म्हणुनी । रज्जुतें सर्प न कुणि मानी ॥

म्हणून म्हणतें कीं मी काय सांगतें तें ऐकून घ्यावं.

प्रताप—(तिला दूर लोटून रागानें) मला वाटलंच होतं कीं तूं त्या कीर्तिसिंहाविषयींच कांहीं म्हणशील ! परंतु ललिते !

पद—चाल–ओळखते लहान होता.

आजचि कां स्त्रैण झालों तुज ऐसें वाटतें ? ॥
दशरथ मी काय खोटे पुरवाया लाड ते ? ॥
मोहाया कीं सुधन्वा स्त्रीवचनीं वाटते !
मानिशि तूं या प्रतापां मूढचि का बोल ते ? ॥१॥

चल ! दूर हो.

[**अरण्यनाथसाधू** भजन करीत प्रवेश करितात].

अर०—(भजन करितात).

पद—चाल-राधाधर मधु मिलिन्द.

दे तव चरणीं वास ॥ शिव हर भक्तहृदयाचिरनिवास ॥ ध्रु० ॥ भवबंधननिर्घटनानिपुण तव नाम देत उल्लास ॥ १ ॥ मायासंभव हा भव बोधिशि श्मशाननिहितावास ॥ २ ॥ नेत्र-दग्ध-जगजैत्रकुसुमशर विषय-विरक्ति-विलास ॥ ३ ॥

जयभोलानाथ दिगंबर!

[प्रतापसिंह व ललिता नमस्कार करितात].

प्रतापसिंहा! बैस. ललिते तूंही उभी राहूं नकोस. मी पण आसनस्थ होतों.

[सर्व बसतात].

प्रता०—(विनयानें) आज अकस्मात् दर्शन देण्याचा काय हेतू?

अर०—प्रतापसिंहा आम्हांस तुझी नम्रता पाहून फार समाधान होत आहे. असो! तुला कांहीं जरूरीच्या कामांत दोन शब्द सांगावे म्हणून आलों आहें.

प्रता०—सेवक ऐकण्यास उत्सुक आहे.

ललि०—(स्वगत) कसलं बरं जरूरीचें काम!

अर०—प्रतापसिंहा? आज तूं कीर्तिसिंहास शिक्षेचा हुकूम सोडला आहेस!

प्रता०—(स्वगत) म्हणजे काय?

दिंडी.

कळत नाहीं सद्गुरू काय आतां ॥
वदतिशंका ही अशी येत चित्तां ॥
त्वरित म्हणती दंडि तूं पापियाशी ॥
म्हणति किंवा सोडि तूं पापराशी ॥ १ ॥

असो ! आतां काय सांगतात तें ऐकून घ्यावें (उघड) होय. त्यास मी शासन केलं आहे.

ललि०—(स्वगत) गुरुमहाराज ! मला आतां मात्र बरीच आशा उत्पन्न झाली आहे.

अर०—प्रतापसिंहा !

पद—चाल—**शशिकुल भूषण गुणवंता**

रविकुल ललित ललामारे । मानसिं घे मम वच सारें ।।ध्रु।।
इंदिरा वरी चंदिराची । परि तूं कलंक नच याची ।
निग्रहि पूर्वज तव सारे । होशी कोपविवश कां रे ।
न्यायीं दृष्टि असो द्यावी । समता मानसिं आणावी ।
।। चाल ।। सूज्ञ असशि तूं नलगे वदणें बहु तुज भूपा रे।
सोडी कीर्तिसिंह बारे ।। १ ।।

प्रतापसिंहा ! कीर्तिसिंहाच्या कामांत तुजकडून योग्य न्याय झालेला नाहीं. तू क्रोधान्ध होऊन आपल्या नेहमींच्या स्वभावास अनुसरून त्यास शिक्षा केली आहेस. या गोष्टींचा विचार कर. शिवाय त्याला केलेली शिक्षा पार पडल्यास दुर्धर अनर्थ होतील. यापेक्षां अधिक मला कांहीं सांगता येणार नाहीं.

ललि०—(स्वगत) आतां मला बाई मात्र धीर आला. कुणीकडून तरी त्या बिचाऱ्याचा प्राण वाचला म्हणजे झालं.

प्रता०—(स्वगत) गुरुमहाराजांच्या भाषणांतील पूर्वभाग ठीक आहे ? परंतु (साश्चर्य) या शिक्षेपासून अनर्थ होतील म्हणजे याचा अर्थ काय ? कीर्तिसिंह म्हणजे यःकश्चित् शिपाई आणि त्याला शिक्षा केल्यापासून दुर्धर अनर्थ ? काय असेल तें असो ! मला कांहींच कळत नाहीं. असो ! गुर्वाज्ञा अनुल्लंघनीय आहे. (उघड) गुरुमहाराजांची आज्ञा अनुल्लंघनीय आहे.

अर०—(स्वगत) याचा स्वभाव लहरी असून आमच्या आज्ञा पार पाडण्यास हा नेहमीं तत्पर असतो. (उघड) प्रतापसिंहा ! तुझी गुरुभक्ति पाहून मला फार संतोष होत आहे.

दिंडी.

पूर्वजांसम निष्काम शौर्यराशी ।
युक्त दाविशि गुरुठायिं आदराशी ॥
पूर्ण होतिल मनकामना नृपाला ।
रणीं अर्पिल जयदेवि कंठिं माला ॥ १ ॥

(**पहारेकरी** प्रवेश करितो.)

पहा०-(मुजरा करून) बाहेर हकीम साहेब आले आहेत.

प्रता०– (ललितेकडे पाहून) तुम्ही आतां जा. (ललिता जाते) (पहारेकऱ्यास) जा. त्यांना आंत पाठव.

[**हकीम** प्रवेश करितो.]

प्रता०-(उठून) यावें हकीमसाहेब !

हकी०-(अरण्यनाथाकडे पाहून) सलाम हम्याको साधुमहाराज. (प्रतापसिंहाकडे वळून) मलिक महाराणा प्रतापसिंह यांना वाचविणारा हकीम त्यांच्या ताब्यांत असलेला एकजीव वाचविण्याविषयीं विनंती करीत आहे.

प्रता०—(स्वगत) ह्मणजे काय? हा देखील कीर्तिसिंहाविषयीं शिफारस करण्यास आला आहे किंवा काय ? (उघड) मी कोणाचा जीव वांचवावा अशी आपली इच्छा आहे ?

हकी०—कीर्तिसिंहाचा.

प्रता०—(आश्चर्यचकित होऊन, स्वगत) वाः ! ललिता, गुरुमहाराज आणि हकीम ! तिघांनींही जणू कटच केला होता ! काय असेल तें असो (उघड) हकीम साहेब ! आपली इच्छा पूर्वीच पूर्ण झाली आहे कारण सद्गुरूंनीं हीच आज्ञा केली होती. (अरण्यनाथांस) गुरुमहाराजांच्या आज्ञेप्रमाणें मी कीर्तिसिंहास मुक्त केला आहे. परंतु त्यानें इतःपर येथें रजपूतछावणींत राहूं नये अशी माझी इच्छा असल्यामुळें मी त्यास हकीम साहेबांच्या हवालीं करावें असें वाटत आहे.

अर०--ठीक आहे. आमची कांहीं हरकत नाहीं. (उठून) प्रतापा ! तूं कीर्तिसिंहाचा देहान्त करण्यासाठीं नेमलेली वेळ झाली आहे. तर सत्वर त्याला सोडविण्याकरितां चल.

प्रता०—आज्ञा गुरुमहाराज.

(सर्व जातात.)

प्रवेश सातवा पूर्ण.

अंक तिसरा समाप्त.

अंक चवथा.

--:०:--

प्रवेश पहिला.

स्थळ--ललितेचा महाल.

ललि०—(स्वगत) आजपर्यंत मला वाटत असे कीं तिकडचं प्रेम माझ्यापेक्षां अधिक दुसऱ्या कुणावरही नसेल. हो ! आमची आपली बायकांची जात पडली भोळी. तेव्हां पुरुषांनीं त्यांना वाटेल तसं, गोड गोड बोलून भुलवावं. वरून मला किती तरी प्रेम दाखवायचं ! कुणी पाहिलं तर म्हणेल कीं अगदीं हिच्या मुठींत आहेत ! पण तें सगळं खोटं. (तिरस्कारानें) किंवा—

पद—चाल-कांरे हरि तूं मज छळिसी.

सारे पुरुष हे कुटिल असे ।। मुखिं दिसे मधु-
रस, हृदयांत परि विष, अंतरिं ना ते वरुनि जसे
।। धु० ।। गौराविती आम्हां मधुराचि बोलुनि ।।
" सुंदरी, तूं अमृतसरी, मज गमशि खरी, " असें
परोपरी ।। हें परि सारें कामापुरतें, तिळही आम्हां
मान नसे ।। १ ।।

वेडे ललिते ! अजून तरी ताळ्यावर ये. (विचार करून) माझ्या पेक्षां गुरुजी अधिक झाले तर त्यांत कांहींच नवल नाहीं. पण तो हकीम देखील माझ्यापेक्षां अधिक झाला ना ? (स्तब्ध बसते.)

[**प्रतापसिंह** प्रवेश करितो.]

ललि०—(उठून स्वगत) आतां असं गोडगोड बोलायचं होईल ! पण मी अगदीं फसणार नाहीं.

प्रता०—(जवळ जाऊन) प्रिये !—

ललि०—(रुसून) नको बरं ! इतकं गोड नको बोलायला !

पद—चाल—बघुनि त्या भयंकर भूता.

समजलें मनीं मी पुरतें हें सोंग नको हो आतां ॥
मज कळली सगळी माया फसविलीत बहु ही वनिता
मज होति आजवरि शंका—मी एक लाडकी आहें—॥
भ्रम फुटला परि तो सारा; अठवुनि जळे मन दाहें ॥
वरकांती ही मनधरणी करुनि कां शिणविता काया ॥?
नृपनाथा समजावे ना, मी फसेन हें मनिं वांया ॥१॥

प्रता०—लाडके !

पद—चाल—भूप म्हणतो हा तेवि तुझे.

राग आला कां सांग मला सर्व सुंदरी ॥
दास आहे पदिं लीन तुझ्या विनति हा करी ॥
मानिले कीं नच कार्य तुझे काय किंकरीं ॥
कोपकारण मज रूपखनी बोल सत्वरीं ॥

ललि०—(स्वगत) काय बाई मायावीपणा हा ! जसं कांहीं त्या गावचंच नसायचं (उघड) गरीब बिचाऱ्या सेवकावर कशाला उगीच आळ घ्यायचा ! आपणच डोळ्यांत बोट घालावं आणि डोळा कुणी दुखवला म्हणून विचारावं !

प्रता०--(तिला जवळ घेऊन) लाडके, या प्रतापसिंहानें का तुझा अपराध केला आहे ? तर मग त्याला शिक्षा करण्यास तुला अनेक मार्ग आहेत.

पद--चाल-मधुकरें जरी नाहिं चाखिला.

कमलकोमलीं त्वरित सुंदरी ॥ हस्तपाशिं तूं बद्ध मज करी ॥ १ ॥ घनपयोधरें अदयकिंकरीं ॥ खचित सुंदरी ताडनां करी ॥ २ ॥ विपुल अंक कीं श्रोणि घन-भरें भग्न हा करी पल्लवाधरें ॥ ३ ॥

ललि०--(त्यांस झिडकारून) मला कुणी आतां हात लावायाचा नाहीं हो !

प्रता०--सुंदरी--

पद--चाल-लाल झाली कोपानें चढवी.

रुससी फुगसी झिडकारीशी शशिवदने का दासाशी ॥ वाग्बाणें मज जर्जर करिशी कां मृगनयने गुणराशी ॥ धृ० ॥ कोपानें तव अधिक ललित हें रूप दिसे सौंदर्यखनी ॥ रक्तछटा ही गौर कपोलीं बालरवीसम तव वदनीं ॥ प्रकंपिताधर पक्व गमे मज जंबूफल कीं रूपखनी ॥ हस्त करावा वाटे पुढती तयां तोडण्या मधुराशीं ॥ १ ॥

(जवळ जाऊन अधराला स्पर्श करितो.)

ललि०--(रडवें तोंड करून) आतां मात्र बाई शर्थ झाली. हो ! आपला खेळ झाला म्हणजे झालं मग दुसऱ्याचा प्राण का जाईना ! मी रागावलें असतां माझी समजूत करणं एकीकडेच राहायलं आणि उलटं म्हणायाचं कीं रागामुळें तूं अधिक चांगली दिसतेस. दिसेन तर काय झालं ! आपल्याला कांहीं त्याचं आहे का ?

प्रता०—(स्वगत) स्त्रियांची तरी कशी वर्तणूक असते पहा !

दिंडी.

अनुनयीं त्या रुसुनि कीं दूर जाती ॥
कोप दिसतां अनुराग दाखवीती ॥
सकल युवतींची खचित उलट रीती ॥
सार्थ " वामा " कवि ह्यास नाम देती ॥ १ ॥

असो ! पण आतां गोष्ट अगदीं निकरावर आलेली दिसते. (उघड) जिवलगे तुझ्याविषयीं मला कांहींच का वाटत नाहीं ? अग तुला थट्टा देखील कशी समजत नाहीं ? हं बरं चला या आमचं चुवा उभं राहून पाय दुखायाला लागले (पलंगावर बसतात). हं. आतां आमच्या अपराधाची एकदां सुनावणी होऊं द्या.

ललि०—(विनयानें) अपराध कसला ! पण त्या दिवशीं मी जेव्हां कीर्तिसिंहाला सोडावं म्हणून सांगितलं तेव्हां माझं कांहीं ऐकलं नाहीं. आणि तो हकीम आल्याबरोबर त्याला सांगितलं कीं तुम्ही त्याला घेऊन जा. तेव्हां माझ्यापेक्षां हकीम लाडका नव्हे का ? (रुसल्यासारखं करिते.)

प्रता०–हें. हेंच तें. समजत नाहीं म्हटलं तर राग येतो. (तिला जवळ घेऊन) वेडे ! तुझ्यापेक्षां का मला हकीम अधिक ! अग कीर्तिसिंहाचा अपराध तसाच अक्षम्य होता म्हणून रागांत मी तुला कांहीं बोललों असेन. परंतु जेव्हां प्रत्यक्ष गुरुमहाराजांनीं मध्यस्थी केली तेव्हां माझा नाइलाज झाला. बरं. तू कीर्तिसिंहाविषयीं रदबदली करण्यास कां आली होतीस ?

ललि०—(स्वगत) मला वाटलंच होतं कीं शेवटीं हें माझ्यावरच येणार. त्या वक्रतुण्डाला सांगून शिकवून ठेवलं आहे म्हणून बरं. (उघड) हें पहा ! वन्संचं किनई सगळं मन त्याच्यावर बसलं आहे. तेव्हां मी म्हणालें त्या आतां मोठ्या झाल्या आहेत, त्यांनीं होऊन केलेल्या निवडीच्या आड आपण कशाला यावं ! शिवाय—

प्रता०–(मधेच रागानें) पुन्हा मोहिनीचं नाव मजसमोर काढूं नकोस. प्रेम होतं म्हणून त्याला रात्रीचं एकटं भेटायचं !

ललि०–हें काय ! पुरतं ऐकून तरी घ्यायचं ! त्यांत त्यांचा दोष मुळींच नाहीं.

प्रता०–(रागानें) मग कोणाचा ! तुझा कीं माझा !

ललि०– ऐकून तर घ्यावं ! हें सगळं कृत्य त्या वक्रतुण्डाच आहे.

प्रता०–(साश्चर्य) काय ? हें वक्रतुण्डाचं काम ! म्हणजे काय !

ललि०–त्या दिवशीं वन्संची अंगठी हरवली. ती त्याला सांपडली ती घेऊन त्यानं कीर्तिसिंहाला खोटनाटं सांगून आणला.

प्रता०–(स्वगत) हर ? हर ? मी माझ्या सुशील मोहिनीविषयीं उगीच शंका घेतली ? बरं आता या वक्रतुण्डाला तरी काय शिक्षा करावी ! मूर्खाचा धनी होऊं नये म्हणतात तें अक्षरशः खरं आहे. (उघड) लाडके ! हें तू मला आतांच सांगितलस हें बरं झालं. नाहीं तर मी मोहिनीला रागानें कांहीं बोललों असतों. (दाराकडे पाहून) कोण आहेग तिकडे ?

[**दासी** प्रवेश करिते.]

दासी०—जी सरकार !

प्रता०–पल्लविके ? त्या वक्रतुण्डाला इकडे आधीं घेऊन ये पाहूं ?

[आज्ञाम्हणून दासी जाते व वक्रतुण्डाला घेऊन येते.]

प्रता०—(वक्रतुण्डाकडे पाहून) काय रे मूर्खा ? त्या दिवशीं कीर्तिसिंहाला कोणी फसवलं ?

वक्र०–(भयानें कांपत) म्-म्-म् मी सर्-सरकार.

प्रता०–(रागानें) कां ?

वक्र०–(कांपत) च्-च्-चुकलों सरकार.

प्रता०—(ललितेकडे पाहून) हें पहा. आम्हांला अकबरशहाकडे कांहीं नजराणा पाठविण्याचा आहे. त्याबरोबर यालाही तिकडेच पाठवून देतों म्हणजे पीडा टळली. असंच ना ?

ललि०—हो. गडे असंच करावं.

वक्र०—(स्वगत) वाः ! खासा न्याय ! म्हणजे आह्मांला

त्या दिवशीं बळंबळं पाठवलं आणि आपणच आतां ह्मणे (तोंड वेंगाळून) हा गडे असंच करावं. पण हें पुढें असं होणार हें कुणाला ठाऊक ! नाहींतर कशाला शेण खाल्लं असतं ? बरं आतां सरकारस्वारीला खरं खरं सांगावें तरी तिकडूनही पंचाइत ! या मोठ्या लोकांच्या इथें नोकरी करायची म्हणजे हीच तर गंमत !— तोंड असून बोलायचं नाहीं. कान असून ऐकायचं नाहीं. एक का दोन ? असो ! आतां काय करणार ? दोन दिवस तिकडची हवा खाऊं.

प्रता०--(वक्रतुण्डाकडे पाहून) चल रे मजबरोबर. (उठून ललितेकडे पाहून) आतां आम्ही नजराण्याची व्यवस्था करण्याला जातो. समजलं ?

ललि०—(उठून मानेनें अनुमोदन देते.)

[**प्रतापसिंह** व **वक्रतुण्ड** जातात.]

ललि०—(स्वगत) करायला गेलें एक आणि झालं भलतंच. पण आतां मात्र माझी काळजी नाहींशी झाली.

पद--चाल-रमवाया जाऊं.

भीति लया गेली ।। मनींची ।। धृ० ।।
सहज विनोदें होउनि गेलें ।।
अंतीं परि तें उलटचि झालें ।।
त्यानें मन हें अतिशय भ्यालें ।। परि चिंता नुरली ।।

आतां तिकडचं मन वळवायला कांहीं वेळ लागणार नाहीं. बरं आतां वन्संची भेट घेऊन त्यांना हें सगळं सांगावं म्हणजे त्यांना बरं वाटेल.

(जाते).

प्रवेश पहिला पूर्ण

प्रवेश दुसरा.

मोहिनीचा बाग.

[**मोहिनी** फिरत आहे].

मोहि०--(स्वगत) मला कुठेंच करमत नाहीं. दादासाहेबांनीं

त्यांना सोडलं पण मुसलमानांच्या का ताब्यांत द्यायचं? तिथें राहणं त्यांना मरणाहून दुःख देणारं झालं असेल.

पद--चाल-दूर मी झाले या अंकाच्या.

प्राणविसाव्या चित्तानंदा त्यजसि कसा मजला ॥
हा विरहाग्नी जाळित राहे निशिदिनिं कीं मजला ॥
साहुं कशी यां धीर उडाला जीवहि सखया जड हा
झाला ॥ १ ॥

प्रियकरा ! आपल्याला दादासाहेबांनीं त्या हकीमाच्या ताब्यांत दिलं, तो आपल्याला सुख देत असेल का ? (विचार करून) त्या हकीमाला माझ्या प्रियकराचा इतका ओढा कां असावा बरं ! काय असेल तें असो बाई ! (मदन विव्हल झाल्यासारखें दाखवून) ह्या मदनानें तर माझी पाठ पुरविली आहे.

पद--चाल--नशिबीं असे नच तें टळे.

मधुरा मनीं जरि मूर्ति ती । ये क्षण तरि दुष्ट हा
गांजितो चित्त हें निशिदिनिं अती ॥ ध्रु० ॥
लोटुनि मजला संकटिं हा । प्रमुदितसा डोले ॥
वियोगतापें जाळोनी । कृश मज बहु केले ॥
मूर्ती केवीं विसरुं तरी ती । हिमकरविभा मधु-
राकृती ॥ १ ॥

(दीर्घ उच्छ्वास सोडून) माझ्या नशिबांत सुख असेल का ! जगदंबे ! तूं तरी इतकी कठोर कशी झालीस ? माझी दया तुला कशी येत नाहीं ? वहिनी ! तुम्हाला तरी तशी थट्टा करण्याची बुद्धि कशी झाली. (स्तब्ध बसते.)

(**ललिता** प्रवेश करिते.)

ललिता--(मोहिनीला पाहून स्वगत) तो कीर्तिसिंह हकीमाबरोबर निघून गेल्यापासून वन्संची अगदीं कठीण अवस्था झाली आहे. खाणं नको पिणं नको. बोलणं नको चालणं नको. एक ध्यास. पण त्यांना मी आतां सारं सांगितलं म्हणजे खात्रीनं बरं वाटेल. पण

जरा गम्मत करावी. (उघड) वन्सं ! इतका कसला गूढ विचार चालला आहे कीं मी आलें तरी माझ्याकडे तुमचं मुळींच लक्ष नाहीं ! माणसांनीं असं काय वेड्यासारखं करावं बाई ! हें पहा वन्सं–

पद––चाल–बघुनि सुभद्रेला.

शोक वृथा करिता । उगीच कां दुःखशतां वरिता ? ॥धृ०॥
मदनमनोहर जितकोकिलगिर । वीर--धुरंधर किन्नर--सुंदर ॥
इतरहि मिळतिल नृपती नरवर ॥ चाल ॥ अश्रु पुसा
आतां ॥ देहीं बहु दिसते कृशता ॥ १ ॥

तेव्हां मी म्हणतें, त्यांत आपण कशाला इतकं वाईट वाटून घेऊन जिवास त्रास द्यावा ?

मोहिनी––(संतापानें) कोण ? ह्या आमच्या वहिनीसाहेबच का ?

पद––चाल–ओळखतें लहान होता.

भलभलतें बोलतांना शंका कां ये न ती ।
शीलाची केविं झाली सहसा हो विस्मृती ॥
कुलकन्या अंतरंगीं एकाचि कीं वसविती ।
सुरनाथां त्यापुढें त्या तृणसम कीं मानिती ॥ १ ॥

ललिता––(जवळ जाऊन) वन्सं ! पण—

मोहिनी––(रागानें) चला. माझ्याजवळ, कांहीं बोलूं नका.

ललिता—अहो पण मी काय म्हणतें तें पुरं ऐकून घ्याल कीं नाहीं ?

मोहिनी––(त्रासून) हं. बोला काय तें.

ललि०–हें पहा–

पद––चाल–जाऊं कामाला.

ऐकुनि घ्या पुरतें । खरें नच सहजचि वदलें तें ॥ध्रु॥
प्रणयनिरीक्षण परिहासीं मी उगिच गडे केलें ।

सकल निवेदित करुनी जवळीं, कळवाया आलें ॥
कोप शांत केला हें तुह्मा कळवाया आलें ॥
म्हणुनी ऐकुनि घ्या पुरतें ॥ १ ॥

मोहि०–(लडिवाळपणानें) खरंच कां ! मग हें काय बरं वहि-नीसाहेब, अशी भलतीच थट्टा काय करावी ! दादासाहेब माझ्यावर आतां रागावलेले नाहींत ना ?

ललि०–हें पहा वन्सं प्रथम तुमचाच फार राग आला होता. पण मी जेव्हां सगळं सांगितलं तेव्हां फार वाईट वाटलं.

मोहि०–आतां मात्र मला बरं वाटलं हो ! वहिनी ! तुमच्या थट्टेचा परिणाम काय बरं झाला असतां ?

पद--चाल–सदय शांत असशी मरणा.

खचित निंद्य मनिं ते मजला। मानुनि कीं दुष्टेला ॥धृ०॥
डाग अर्पिला ह्या सुकुलां। कुलटेनें जन्मुनि विमलां।
म्हणुनि देत बसते कुटिलां। दोष गडे कर्माला ॥१॥

मी म्हणत आहे असं नसतं का झालं वहिनी ?

ललि०—वन्सं ? आतां तें नका गडे आठवूं. आतां माझी खात्री आहे कीं मी कीर्तिसिंहाना लवकर परत आणवीन. आणि तुम्हाला सुखांत डोळे भरून पाहीन.

मोहि०—(आनंदानें स्वगत) जगदंबे असं खरंच का लवकर होईल ?

पद—चाल–कधिं करिती लग्न माझें.

प्रियकर ते कांत येती रमवाया कां मला ॥ ध्रु० ॥
झडकरी। येति मंदिरीं। मञ्चकावरी। वदति बहुपरी।
कर्ण सुखवाला ॥ १ ॥
सुंदरी। मदनमञ्जरी। ह्मणुनि झडकरीं। धरिति मजकरीं।
दुःख हरण्याला ॥ २ ॥

नयवती । मदनमूर्ति ती । करुनि मजरती । रमत संगती ।
नयन सुखवाला ॥ ३ ॥

असं खरंच होईल का ? वहिनीसाहेब ! पण हें सगळं खरं का ?

ललि०—म्हणजे ! वन्सं मी इतकं का खोटं सांगेन ?

मोहि०–तसं नव्हे हो ? पण मला आपलं—

ललि०—विचारल्या शिवाय राहवत नाहीं **असंच** ना ? मग शंभरदा विचारायला मी नको का म्हणतें ? हें पहा वन्सं ? तुम्ही आतां अगदीं निर्धास्त असा.

पद––चाल–श्रीमंत पतीची राणी.

चित्तास धरा उल्लासां खिन्नशा तुम्ही कां बसतां ।
लव नाहीं उरली शंका सुखविते तुम्हां मी आतां ॥
मी जवळी जाउनि आतां वश करिते क्षणहि न घेतां ।
पुरवील कामना सारी कामदा कामरिपु–कांता ॥ चाल ॥
काळजी मनांतिल सारी । सोडावी दुःसह भारी । चित्तास हर्ष अनिवारीं । येईल पाहतां कान्ता, मग कशास आम्हां स्मरता ? ॥१॥

(हंसून) का वन्सं मी म्हणतें असंच ना ?

मोहि०––(स्वगत) आमच्या वहिनीच्या उतावळ्या स्वभावापुढें अगदीं हद्द आहे. सगळे घोटाळे त्यामुळेंच होतात. आतांच पहा. अजून कशास कांहीं नाहीं तो यांची झाली थट्टेला सुरवात. पण इतकं जरी आहे तरी आहेत मात्र अगदीं भोळ्या हो ! (उघड) वहिनी ! तुम्हांला किनई थट्टेशिवाय कांहींच दिसत नाहीं. (रुसल्यासारखं करिते.)

ललि०––बरं इतकं फुगायला नको कांहीं त्यांत. (आठवल्यासारखं करून) हो ! वन्सं आतां इथेंच किती वेळ बसायचं चला आंत.

मोहि०—चला.

[दोघी जातात.]

प्रवेश दुसरा पूर्ण.

प्रवेश तिसरा.

स्थळ--मोंगल छावणी. हकीमाचा तंबू.

[**कीर्तिसिंह** विचारांत फिरत आहे.]

कीर्ति०--(दुःखानें आपल्याशीं) परमेश्वरा ! तुझी लीला अगाध आहे.

पद--चाल-ये काल कसा विपरीत.

हें भ्रांत कसें मन होत असे। अनुमान तयां मुळिं होत नसे ॥धृ०॥ सुहासनिर्वासित शशिशोभा। मृगनयना ती सांग कुठें ॥ बंदिवास हें कुफल कुठें, हें अयुक्त सारें मोहितसे ॥१॥

माझ्या स्थित्यंतरावरून मला कांहींच अनुमान काढतां येत नाहीं. अमीरानें मला आश्वासन दिलें, परंतु तोही अद्याप भेटत नाहीं ! हकीमाचा व माझा तसा कांहीं स्नेहसंबंध नसतां तो प्रतापसिंहाकडून माझी सुटका करवितो ! याचा अर्थ काय ? (विचार करून) अथवा अमीरानें तर हकीमास पाठवलें नसेल ? कांहीं का असेना ! माझी मात्र स्थिति कष्टतर झाली आहे.

पद—चाल-वधू ही वल्ली.

मनीं जें आलें। सुमन तें गगनिंचें झालें ॥धृ०॥
मानिन निश्चित मी हें परि कां।
कालमुखांतुनि तारि वराकां ॥
विधि तो, छळण्या इच्छित मज का।
संशयीं डोले। चित्त ना अचल ना हाले ॥१॥

(दीर्घ श्वास सोडून) सुंदरी ! मोहिनी ! तुझी अवस्था काय झाली असेल ? लाडके !

पद--चाल-सुकुमार असुनि तूं फार.

अनिवार करिल तो वारमदन तव हृदयीं मदन तव हृदयीं ॥ तो कुसुमशर, परी असे कुटिल गे अदयी ॥ १ ॥ हा काम म्हणति निष्काम जाळि त्रिपुरारि जाळि त्रिपुरारी ॥ परि भासे मज हा पिशाचरूपां धरी ॥ २ ॥ राजसे लागले पिसे सुचत मज नाहिं सुचत मज नाहीं ॥ तव चरितां स्मरुनी हृदय भरुनि हें येई ॥३॥

(विचार करून) शिव ! शिव ! पण मी माझ्या वीर्यसिंहाला अगदीं विसरलों हें मला लांच्छनास्पद आहे. त्या वीराची महती किती वर्णन करणार ?

दिंडी.

क्षणार्धी तो स्वामीस सोडवील ॥
स्वामिकार्यीं काळांहि भय न वील ॥
क्षणीं अरिला लावील तृण चराया ॥
जरी आज्ञापन दिलें त्यां कराया ॥ १ ॥

त्याच्याजवळ मी प्रतारणा केली म्हणून तो मला दोष देत असेल. वीर्यसिंहा--

वीर्य०—(प्रवेश करून हात जोडून) आज्ञा सरकार.

कीर्ति०—(साश्चर्य) कोण वीर्यसिंह ! (सद्गदित होऊन)

साकी.

वीर्यसिंह हा तूंच कायरे वदाशि करा जोडून ॥ सत्सेवकगुणदर्शी कविही लपेल तुज पाहून ॥ सखया भेट मला ॥ स्पर्शे सुखवी देहाला ॥ १ ॥

(त्याला हृदयाशीं धरून) वीर्यसिंहा तूं विनयशील असल्यामुळें मजपाशीं अतिशय नम्र वर्तन ठेवतोस हें योग्य आहे. परंतु माझा तूं बाळपणचा स्नेही आणि वीरांतला अग्रणी म्हणून मींही तुला जवळ घेतला आहे हें योग्यच आहे बरं वीर्यसिंहा तुझा इथें कसा प्रवेश झाला ?

वीर्य०—(नम्रतेनें) सरकारस्वारीच्या पुण्याईनें.

कीर्ति०—(साभिमान) वीर्यसिंहा ! तुझ्यासारखे एकनिष्ठ सेवक झाले असतां—

पद—चाल—मज गमे ऐसा जनकतो

सुदिन तो मानि उगवला ॥ आर्यभूचा ॥ धृ० ॥
होतां तुजसम वीरचण्डकर । दास्यतिमिर कां दिसेल भूवर ॥ अरि ते होतिल नतसे किंकर ॥ ये मातेला प्रमोद विमला ॥ १ ॥ दास्यनिगडनिर्घटनपरांतें ॥ कार्यदक्ष निज बघुनि सुतांतें ॥ प्रेमसरी ती येइल मातें ॥ प्रसूति वाटे सफला तिजला ॥ २ ॥

(कानोसा घेतल्यासारखें करून) वीर्यसिंहा ! कोणी येत आहे असें वाटतें तूं जरा लपून बैस. (वीर्यसिंह लपतो.)

(**अकबरशहा** प्रवेश करितो.)

कीर्ति०—(त्यांस पाहून साश्चर्य स्वगत) अरे हा अनोळखी मनुष्य कोण असावा ? कोणी सेवक आहे असें समजावें तर ह्याचा वेष मूल्यवान दिसत आहे.

अकबर०—(स्वगत) कीर्तिसिंहा ! तुझं धैर्य मला माहित आहेच. परंतु पुन्हां एकवार परीक्षा घेतों (उघड) कोण रे तूं ?

कीर्ति०—(स्वगत) ह्या यवनांची आणि विनयाची जन्माचीच चुकामूक झाली आहे. तेव्हां याच्या उद्धट प्रश्नाविषयीं फारसें आश्चर्य वाटण्यास नको. (उघड) मला असे उद्धट प्रश्न करणारे आपण कोण ? आपणांस सभ्य वर्तन माहित नाहीं काय ?

अकबर०—(स्वगत)कीर्तिसिंहा ! तूं नुसता शिपाई असून तुझी भाषाशैली इतकी प्रौढ ! माझें मन यामुळें संशयांत पडत आहे. आजपर्यंत तुझ्या वर्तनाचा विचार केला म्हणजे तूं कोणी तरी निराळा असावास असें वाटतें. (उघड) का तुला सरळ बोलतां येत नाहीं का ? सभ्य वर्तन कोणास शिकवतोस ? तूं कोठें आहेस याचा विचार केला आहेस काय ?

कीर्ति०--(तिरस्कारानें) अरे ! विचार काय करावयाचा आहे ? मला याचना करून घेऊन आलेल्या शत्रूच्या गोटांत मी आहें मला पूर्ण माहित आहे.

अकबर०--(तुष्ट होऊन स्वगत) शाबास कीर्तिसिंहा ! तूं निधड्या छातीचा वीर खरा ! शत्रूच्या ताब्यांत असतांही तूं तुझा मानीपणा निदर्शनास आणीत आहेस. (उघड) कां ? कांहीं मासला पहावयाचा आहे वाटतें ?

कीर्ति०--(स्वगत संतापून) रजपूताच्या सौजन्याची सीमा इतकीच ! तरवार काढून (उघड) अरे जारे. तूं काय मासला दाखवणार ?

पद--चाल--तूं पापी खलकषाय.

जा मूढा तुजसमान, श्वान फिरति बहु जाण सिंह होय केविं लीन, कोल्हाहल अयकोनी, काय नमवि मान ।।धृ०।।
दाविशी अहंकृतीस । पाहुनि मज एकट्यास । कोण शूर निर्बल्यास । देइ तुजासि मान ।।१।।

अकबर०--(संतुष्ट होऊन स्वगत) शाबास ! कीर्तिसिंहा ! शाबास ! तुमच्या रजपूतांत सगळेच नांवाचे सिंह असतात. परंतु माझ्या पहाण्यांत खरे असे दोनच आले. प्रतापसिंह आणि कीर्तिसिंह. तुम्हां दोघांचें शौर्य अप्रतिम आहे, तुम्हां दोघांचा स्वाभिमान स्पृहणीय आहे. (उघड) कीर्तिसिंहा ! तुझ्या अमीराला तूं कोणत्याही वेषांत ओळखशील काय ?

कीर्ति०-(स्वगत साश्चर्य)अरे! ह्याचा स्वर माझ्या मित्रासारखाच वरटतो ? (उघड) आपण माझ्या अमीराप्रमाणें दिसता.

अकबर०-(बादशाही झगा काढून) आतां मी कोण आहे ?

कीर्ति०-(साल्हाद) कोण ?

दींडी.

आपदीं कीं विपदिं वा जो समान ।
स्नेहपूरां जगिं दुजें नोपमान ।
तोच माझा तूं बोल मित्र कारे ! ।
भेट मजला ये सख्या प्रणयभारें ॥ १ ।

(परस्परांस भेटतात.)

मित्रा अमीरा !

पद--चाल-सकल दोष मजवरिचा.

सुहृद आज मज दिसला धन्य जाहलों मी ।
मग्न सहज बघुनि तुला होइ हर्षधामीं ॥ धृ० ॥
संकटांत भेटलास हृदय भरुनि येई ।
या क्षणींच चिंता मम सकल लयां जाई ।
यास्तव हे जोडुनि कर ईश्वरां नमी ॥ १ ॥

अकबर०-(स्वगत) आतां तुझा अर्धा भ्रम दूर करितो.(उघड) कीर्तिसिंहा ! याक्षणापासून अमीर व अकबरशहा एकच समज. तूं सार्वभौम अकबराचा स्नेही झालास.

कीर्ति०—(आश्चर्यचकित स्वगत) काय ! हा अकबरच माझा अमीर काय ? (उघड) अकबरशहा ! इतके दिवस हें मला कां नाहीं सांगितलं ?

अकबर०-कीर्तिसिंहा ? तें असूंदे. प्रथम मी तुला विचारतों तें सांग. प्रतापसिंहाच्या बहिणीचें व तुझें प्रेम होतें काय ?

कीर्ति०-(स्वगत) अकबरा ?

पद--चाल-तेचि पुरुष दैवाचे.

भेदि वचन आघातें । हेंचि जाण हृदयातें॥ ध्रु०॥
कान्तास्मृति मी मज देवोनी ।
भ्रांती अर्पी धैर्य हरोनी ।
थरारवी मज शिरीं कडाडुनि ।
वीज काय येते ॥ १ ॥

(दुःखानें) माझा सर्व आनंद मावळला. कारण यानेंच आपली प्रीति तिजवर आहे असें अमीराच्या वेषांत असतांना दर्शविलें होतें (स्तब्ध बसतो)

अक०—मित्रा बोलत कां नाहींस ?

कीर्ति०-(दुःखानें) अकबरशहा ? काय बोलणार !

पद--चाल-सहज कशि खेळवितें.

विफल मसि बोलविशी वदनें ॥ ध्रु० ॥
वामाक्षींचें नामनिदर्शन तापचि देइ मुदां ने ॥१॥
मुधा वदोनी सुधाधरागत काय असे फल रसनें २

अक०—कीर्तिसिंहा ! असा धीर सोडूं नकोस. हें पहा इकडे कान कर. (कानांत सांगतो) हं म्हणजे सगळं जुळतं ना ?

कीर्ति०--(आनंदानें) मित्रा ! असं झाल्यास मला आणखी दुसरं काय पाहिजे ?

अक०—कीर्तिसिंहा ! यांत माझी एक अट आहे.

कीर्ति०--(स्वगत) आतां अट ती काय सांगणार ? कांहीं का सांगना. ऐकली पाहिजे. (उघड) कोणती अट ?

अक०--(त्याच्या कानाशीं लागून) हें तुला कबूल आहे.

कीर्ति०—(स्वगत) यांत काय मोठें आहे ! याचा निकाल सात्रीनें माझ्यासारखा होणार. (कबूल) आहे.

अक०--ठीक आहे. मी जातो. तूं लवकरच माझ्या तंबूवर ये.

कीर्ति०--हा मी आलोंच.

[**अकबरशहा** जातो.]

वीर्य०--(पुढें येऊन) सरकार ! थोरल्यासरकारांकडून जासूद आला आहे. तो रजपूतछावणीवर आपला शोध करीत फिरत आहे. हें मी मघाशीं सरकारस्वारीस सांगण्यास विसरलों. त्याची काय व्यवस्था करावी ?

कीर्ति--वर्यिसिंहा ! त्यास कसा तरी बिनबोभाट परत लाव. ही स्थिति महाराजांच्या कानावर जाऊन उपयोग नाहीं. तरी लवकर जा. पुन्हा तुझी माझी भेट लवकरच होईल.

वीर्य०—आज्ञा सरकार ! (जातो.)

कीर्ति०--(स्वगत) माझे मनोरथ पूर्ण होण्याचा समय जवळ आला आहे असें वाटतें. (रागानें) चोरा ! रामसिंहा !

साकी.

मद्भुजपञ्जरनिगडीकृत तूं लपशिल कोठें आतां ॥
हृदयविदारण दारुण रणिं मी करीन जाणी असता ॥
सार्थचि मज गमतें ॥ वच तें " सत्यमेव जयते " ॥१॥

(शांत होऊन वर पाहून) ईश्वरा ! तुझी लीला अगाध आहे.

पद----चाल--**काय मला भूल पडलि.**

कार्य सकल सफल होय आज शंकरा ॥
तृषित येत जणु मार्गीं स्वादु निर्झरां ॥ धृ० ॥
निर्दालिन एकटाहि रिपुशतां हरा ॥
असतां तूं साह्य मला लोकिं सुरवरा ॥
अवमानिन संकटांस खाचित दुर्धरां ॥
तोषवीन शौर्यानें ललित सुंदरा ॥ १ ॥

(सद्गदित होऊन) अमीरा---छे ! अकबरा ! या सर्व गोष्टींचें श्रेय तुझ्याकडे आहे. तूं माझ्या कानाशीं लागून माझ्या शौर्याची स्तुति केलीस परंतु तुझ्या साह्याशिवाय तिचा काय उपयोग ?

पद--चाल-वाहवा थोर तु भूपाला.

थोरवि माझि कशां गाशीं । सर्वां निदान तूं होशी॥ध्रु॥
षट्पद नसता जगतावर तरि स्थिति कमलां ती कैशी ।
सुपरीक्षक तो नसतां लोकीं रत्नां गति ती कैशी ।
गुणज्ञ नसतां काय गुणी रे कोण पुसे वद त्याशीं ।
सत्य असें हें ह्मणुनी वदतो निदान तूं गुणराशी ॥१॥

[वक्रतुण्ड प्रवेश करितो.]

वक्र०-(चेष्टा करीत)हँः-हँः-हँः नमस्कार महाराज बहुत खाशी " आपणासारिखे करिती तात्काळ " कां असंचना ? आपण करावं आणि दुसऱ्यानें भरावं.

कीर्ति०—(स्वगत) हा एक माझ्यामागें दुष्ट महच आहे. ह्याला प्रतापसिंहानें नजराण्याबरोबर पाठवला असं मला अकबरशहानें आतांच सांगितलें. परंतु हा माझ्या तंबूंत कसा आला ? उघड अरे ! तूं इकडे कुठें ?

वक्र०--आपल्या कृपेमुळें दोन दिवस इकडे आलों झालं.

कीर्ति०---(स्वगत) या मूर्खाजवळ फार बोलून उपयोग नाहीं. (उघड) वक्रतुण्डा ! मला आतां अकबरशहाकडे जावयाचें आहे. तरी आतां जा. समजलास ?

वक्र०-मग ? मी तर तुम्हाला बोलावण्यासाठीं आलों आहे. त्यानेंच मला आपल्याकडे पाठवलें आहे.

कीर्ति०-(स्वगत) ठीक आहे महाराज या बोलावण्यांत आणखी तिसरंच संकट आणूं नका म्हणजे झालं. (उघड) चल.

(दोघे जातात.)

प्रवेश तिसरा पूर्ण

प्रवेश चवथा.

स्थळ–प्रतापसिंहाचा कचेरीचा दिवाणखाना.

(**प्रतापसिंह** व **कुमारसिंह** बसले आहेत.)

प्रताप॰––(स्वगत) कीर्तिसिंहाविषयीं मी जों जों अधिक विचार करितों तों तों अधिक संशयांत पडतों. त्याचा आणि हकीमाचा संबंध काय ? गुरुमहाराजांनीं तरी कोणत्या हेतूनें मध्यस्थी केली असावी ? अथवा, हा कीर्तिसिंह दिसतो यापेक्षां निराळा असेल काय ? त्याच्या मुद्रेवरून तर तो थोर कुळांतला असावा असें अनुमान होतें. काय असेल तें असो. (उघड) कुमारसिंहा ! कीर्तिसिंहाला अपराधाप्रमाणें योग्य शिक्षा झाली. मीं त्याला प्रथम शिक्षा केली होती ती फारच कडक होती असें मलाही विचाराअंतीं वाटूं लागलें आहे. कारण तो त्याचा अपराध नसून वक्रतुण्डाच्या फसवणुकीमुळें तो फसला.

कुमार॰—(कीर्तिसिंहाचा द्वेष करीत) सरकार, पण त्यानें कोणत्याही कारणामुळें निशाण सोडून जाणें मुळींच इष्ट नव्हतें.

प्रताप॰—(रागानें) कुमार ! मी वेळोवेळीं पहात आलों. तूं कीर्तिसिंहाचा निष्कारण द्वेष करितोस. मूर्खा !—

दिंडी.

सुंदरींचा सौन्दर्यदर्प, हारी ।
आत्मरूपें सुंदरी नृपकुमारी ॥
प्रेमचिन्हां अवलोकितां तदीयां ।
लुप्तधैर्य न वद कोण हो जगीं या ॥१॥

यांत कीर्तिसिंहानें मनुष्यधर्माला सोडून असें काय केलें ? त्याच्या ठिकाणीं दुसरा कोणीही असता तरी त्या स्थितींत तेंच झालें असतें.

कुमार॰—(ओशाळून) सरकारस्वारी म्हणते तेंही खरें. मी प्रथम विचार केला नव्हता. परंतु आतां मलाही तसंच वाटतं.

[**पहारेकरी** प्रवेश करितो.]

पहा०—(मुजरा करून) बाहेर एक मुका शिद्दी आला आहे. त्याला सरकारस्वारीच्या भेटीची जरूर आहे.

प्रताप०—शिद्दी ! आणि तोही मुका ! बरं जा. त्याला आंत पाठव.

[**पहारेकरी** मुजरा करून जातो.]

प्रताप०—(स्वगत) कायरे कुमार, हा शिद्दी कोण असावा ?

कुमार०—सरकार, निश्चयानें कांहींच अनुमान होत नाहीं.

[शिद्दयाच्या वेषानें **कीर्तिसिंह** येतो.]

कीर्ति०—(लवून मुजरा करून उभा राहतो.)

प्रताप०--(त्याजकडे पाहून स्वगत) असा शिद्दी मीं कधींच पाहिला नाहीं.

पद—चाल-पांडु नृपति जनक जया.

आंदोलित चित्त असें । पाहुनिया होत असे । दृष्ट-
पूर्व वाटतसे दासरूप हा ॥ १ ॥ वर्णसाम्य मात्र
दिसे । दाससम न इतर असे । शंकित मन होत
असे । फिरुनि फिरुनि हें ॥ २ ॥

शिद्दयाच्या शरीराची ठेवण इतकी सुबक व नीटस मीं कधींच पाहिली नाहीं. शिवाय याजकडे पाहिलं म्हणजे कोणा ओळखीच्या मनुष्याची आठवण झाल्यासारखें वाटतं (उघड) कायरे तूं कोठून आलास ?

कीर्ति०—(स्वगत) कीर्तिसिंहा ! आतां या सिंहाच्या समोर आहेस. आणलेल्या सोंगाच्या बतावणींत चुकलास तर मात्र जड जाईल. (ओठावर बोट ठेवून बोलतां येत नाहीं असें सुचवितो.)

प्रताप०--अरे हो ! तुला बोलतां येत नाहीं का ? बरं. तुझ्याजवळ कांहीं पत्र वगैरे आहे का ?

कीर्ति०—(स्वगत) पत्रांत माझ्या प्रियेचा नामनिर्देश अकबरशहानें जरी स्तुत्य हेतूनें केला आहे तरी तें वाचून हा काय करील तें कांहींच कळत नाहीं. असो. पत्र तर द्यावें. (पत्र पुढें करितो.)

प्रता०—(पत्र घेऊन) कुमार ! हें पत्र वाच पाहूं.

कुमार०— आज्ञा सरकार. (पत्र फोडून वाचतो.)

" मलिक महाराणा प्रतापसिंह यास दोस्ताचे बहुत सलाम. आपण नजराणा म्हणून पाठविलेल्या अमोलिक चिजा पावल्या. फार संतोष झाला. वक्रतुण्ड तर फार गमती पात्र आहे. उत्तरीं शिद्दी मसाऊद यांस पाठविला आहे. हा मुका आहे. परंतु फार चाणाक्ष आहे. मुद्रेवरून अपराध्यास ओळखतो.—

प्रता०—(मध्येंच उत्सुकतेनें) थांब. (कीर्तिसिंहाकडे पाहून) कायरे ! तूं मुद्रेवरू अपराधी ओळखतोस ?

कीर्ति०—(स्वगत) प्रतापसिंहा ! तुझ्यासारखा भोळा परिक्षक असेल तर मी अपराध्यास मुळींच पाहिल्याशिवाय ओळखीन. (मानेनें "हो" अशी खूण करितो.)

प्रता०—(आनंदानें) कुमार ! हें फार चांगलं झालं. आतां आमचं निशाण कोणी उपटलं हें सहज कळेल. (कीर्तिसिंहाकडे पाहून) तूं आमचं निशाण उपटणाराचा पत्ता लावशील तर मग !

कीर्ति०--(मानेनें "हो" असें सुचवितो.)

प्रता०--वाः ठीक झालं. कुमार पुढं वाच.

कुमा०--(वाचतो.)

या दासाजवळ आम्ही एक पत्र आपल्या म्हणजे आमच्या भगिनी मोहिनीसाहेब यांस देण्याकरितां दिलें आहे तें त्यांना देण्याची मसाउदला मोकळीक ठेवाल अशी आशा आहे.

आपला--**अकबरशहा**. "

प्रता०--(स्वगत) इथेंच सारं आहे.

पद--चाल-**पांडु नृपति जनक जया.**

संशय दृढतर होई ॥ मोहिनी विधान देइ ॥ स्थान पूर्वस्मृतिस कांहिं ॥ नवल वाटतें ॥ १ ॥

(विचार करून) अकबरशहा ! तूं हें इतर प्रसंगीं लिहिलें असतेस तर माझ्या अंगाची आग झाली असती. परंतु या दासाकडे

पाहिलं म्हणजे त्यांतच कांहीं गूढ असावं असं वाटतं. म्हणून याचा पुरा तपास करण्याची मला इच्छा झाली आहे. तेव्हां मी याला पत्र घेऊन जाण्याची परवानगी देणार. (उघड) कायरे तूं आमच्या भगिनीस ओळखतोस काय !

कीर्ति०--(ओंठावर अर्धवट आलेलें उत्तर दाबून " नाहीं " असें खुणेनें सुचवितो.)

प्रता०—(हंसून स्वगत) आता पूर्ण खात्री झाली. (उघड)

दिंडी.

नाममात्रें वचशील मुकें होती ।
सुंदरीच्या ज्या, तिजसि जरि पहाती ॥
वाटते मज होतील वचगुरू ते ।
लाजवीतिल निःशंक, सुरगुरूते ॥ १ ॥

असो ! तुला आमच्या भगिनीस पत्र देण्याची मोकळीक देण्यांत येईल. पण लक्षांत ठेव कीं तिथें जर तुला वाचा फुटली तर या सिंहाच्या जबड्यातून सुटण्याची आशा राहणार नाहीं. समजलास !

कीर्ति०-(स्वगत) सुंदरीचें नांव ऐकल्यामुळें मला भान राहिलें नाहीं ही फार वाईट गोष्ट झाली. असो ! पण—

पद–चाल–वसंतीं बघुनि मेनकेला.

कशी ही स्वस्थ बसे रसना । हे न कळे मज बघता लल-
ना कांचि—मुखरजघना ॥ १ ॥
विलोकुनि केंवि मादिरनयना । कृत्रिमभावां सांभाळिन मी
हेंचि कळे मज ना ॥२॥
निश्चयें कांहींच वदवेना । मुखर सखीची रसना देइल
शिक्षण या वदनां ॥३॥

(मानेनें आज्ञा मान्य आहे असें सुचवितो.)

प्रता०—कुमार ! यास तूं आपल्याबरोबर ने. आणि सवडी-प्रमाणें पत्रासह यांस मोहिनीकडे पाठव. जा. याची व्यवस्था नीट ठेव. आणि उद्यां सकाळीं मला भेट.

कुमा०-आज्ञा सरकार.

[**कुमारसिंह** व **कीर्तिसिंह** जातात.]

प्रता०-(स्वगत) हा तोच असला पाहिजे. काळेपणा वजा केला तर बाकी तोच. असो. ही वार्ता आतां प्रियेला कळवावी.

(जातो.)

प्रवेश चवथा पूर्ण

प्रवेश पांचवा.

स्थळ—मोहिनीचा महाल.

(मोहिनी बसली आहे.)

मोहि०—(स्वगत) एकेक ऐकावं तों मति अगदीं कुंठित होते. काय ह्मणे कीर्तिसिंह दासाच्या वेषानें आले आहेत. ते खरोखरीचे दास होऊन राहतील का ! किंवा असं कांहीं करण्यांत त्यांचा हेतू तर नसेल ना ! काय असेल तें असो बाई. (स्तब्ध बसते.)

(दासी प्रवेश करिते.)

दासी०—बाहेर ताईसाहेबांची भेट घेऊं इच्छिणारा, अकबरशहाचें पत्र घेऊन एक मुका दास आला आहे.

मोहि०—जा. त्याला आंत पाठव.

दासी०—जी ताईसाहेब. (जाते.)

मोहि०—(स्वगत) दैवा ! तुझ्या परीक्षेची वेळ आली आहे. प्रियकरा !

आपणच जर दास असाल तर आतां मी आपणाला तसें सोडणार नाहीं हो ! (स्तब्ध बसते.)

(**कीर्तिसिंह** दासाच्या वेषानें प्रवेश करितो.)

कीर्ति०—(स्वगत) माझ्या विरहानें सुंदरीचा देह किती कृश झाला आहे !

पद--चाल-मलिन वस्त्र परिधान.

निसर्गतनुपरि तनुतर दिसते विरहें मन्नयनां ॥ सखी ही जलाविणें ही सुकली जाई गमते शशिवदना ॥ युवतिजनांचा शोभे तनिमा, वदली कविरसना ॥ असें ती ॥ परि तो योगें नव्हे वियोगें भासे खाचित मनां ॥ कोमलकरिं ही कपोलभारां आर्पित शुभरदना ॥ सखी ही ॥ विलग्नमध्या सुंदरी—दिसतें चिंताकुल नयनां ॥

असो ! आतां हिला तें पत्र द्यावें. (पत्र पुढें टाकतो.)

मोहि०--(दचकून कीर्तिसिंहाकडे पाहून) कोण आपण दास का ?

कीर्ति०—(स्वगत) कीर्तिसिंहा ! संभाळ. राण्याच्या वचनाची आठवण ठेव.

मोहि०—(आदरानें) ओळखलं बरं ! अलीकडे दासांतही असलीं रत्नं असतात का ? प्राणवल्लभा ! रात्रंदिवस डोळ्यापुढें खेळणारी आपली मूर्ति कितीही काळं फासून वेषांतर करून आली तरी माझ्या दृष्टीपुढें कशी लपेल ! जिवलगा ! आतां माझा अंत किती पाहणार ? आतां मन मोकळं करून—

पद--चाल-चुनरिया दे दे मोरी.

मधुरसें कांत बोला ॥ तुम्हि ॥ श्रांत तुम्ही
मजसाठीं बहुसे, तेंहि सारें विसरूनि आनंदीं डोला ॥ध्रु॥
आजवरि बहु शिणला सखया ॥
प्रीति दाविली दासीवरि या ॥
भीति नसे रसविलासलोला ॥ १ ॥

कीर्ति०--(स्वगत) कीर्तिसिंहा ! आतां संभाळ.

पद—चाल-जरि करिन सकल.

मधुमधुर वदत सखि, धैर्य गळत ॥ मज लोल
लोलतनु वचनिं करित ॥धृ०॥ मूकां वाचा अर्पिशि

तूं हें ॥ ज्ञात मुरारे इतर न पाहे ॥ गमत परि मनां
फुकटाचि सारें ॥ बल तव तें, ही युवति हरित ॥१॥

परमेश्वरा ! मुक्यांना वाचा देण्याचं तुझें अद्वितीय सामर्थ्य आज लयाला जाणार अशी मला शंका वाटते. तर त्याचा अभिमान तुला असूं दे. माझा निश्चय टिकेल किंवा नाहीं याची मला भीति वाटते.

मोहि०—प्रियकरा ! मनांत कांहीं शंका येत असेल तर ती सर्व सोडा.

पद–चाल–तरुण कुलिन गोरा.

मधुर तुम्ही सखया, हंसत कीं मधुर तुम्ही सखया ।
निःशंक वदावी प्रणय-भाषणें प्रणयघना सदया ॥ ध्रु ॥
जा भेदभाव तुह्मि विसरुनि मनिंचा सारा ॥
मज नसे जगावर अन्य तुम्हांविण थारा ।
तुह्मि मधुरवचोऽमृत पाजुनि मजसी तारा ।
उभे असें कां, या, बसा, या, उभे असें कां या ॥१॥

कीर्ति०–(स्वगत) चित्ता ! या समयीं तुझी त्रेधा उडाली तर नवल नाहीं. माझी प्रिया–

पद–चाल–भारती जडा सुधीहि.

कौमुदीच लोचनीं मुखीं शशी गमे ॥ चित्त हें रमे ॥
सुशब्दभाषणीं गमे सखी सुधा वमे ॥ ध्रु ॥
जणु अचल वल्लि चल बनलि चंचला वचशीला ।
कर करुनि पल्लवां स्तबककुचतटां प्रणयतटाकीं मदलीला १

मोहि०–प्रियकरा !

पद–चाल–मदना चंद्रा सुवैरि.

सखया कांता सुकालीं तुम्ही पातला ॥ ध्रु० ॥
देहलता मम सुकत हि असतां जलद जसे दिसला॥१॥
मधुरवचोजल वर्षुनि तारा शोकनिदाघीं मला ॥२॥

प्रियकरा ! अद्याप आपल्या मनांत कसली शंका आहे !

पद–चाल–उगीच कां कान्ता गांजिता.

विनाविते नाथा अजुनि कां माया ये ना ॥ ध्रु०॥
दीन किंकरी, ही चरणीं । लीन होउनी मन धरणी।
जोडुनी करां करिं रमणी । प्रेमलेश केविं दिसेना ॥१॥

अजुनही माझा अंत पाहावासा वाटतो ना ?

कीर्ति०—(स्वगत) मनमोहिनी ! तुझ्या भाषणानें माझें हृदय दुभंग होत आहे. पण काय करूं ! राण्याच्या वचनांत गुंतलों. (दीर्घ उच्छ्वास सोडून) ईश्वरा ! मला जन्मतःच बहिरा कां केला नाहीस.

पद—चाल–या विरहा कां भीसी.

श्रवणाचि वैरी साचे । सुशब्द सखिचे गमती मजला
तप्त गोल अयसाचे ॥ ध्रु०॥ वदत सखी ही मधुर
परी मज हृदयिं शरासम टोंचे । मानिल मजला निर्दय
कपटी स्तब्ध बघुनि हें जाचे ॥ १ ॥

मोहिनी ! लाडके काय करू माझा इलाज नाहीं.

(ओंठावर बोट ठेवून बोलतां येत नाहीं असें सुचवितो.)

मोहि०–(रागानें) वाचा गेली कां ! जाईलच. जाईलच बरं. अशा कपटी माणसाला बोलतानां पाहून ईश्वर कसं सहन करील ! नाहींच करणार बरं ! आतां तरी खोटं बोलून कुणी फशी पडायला नको.

पद—चाल–अभिनव मधु लोलुप.

ऐकुनि मम दीन वचन गमत कीं बलें ॥ पाषाणहि
पाझरता विमलशा जलें ॥ धृ० ॥ कुलकन्या रूप-
खनी ॥ विनातिनम्र झिडकारुनि ॥ अरसिकत्व दर्श-
वुनी ॥ सुप्त असंवृत्त नयनीं ॥ काककरीं रत्नशकल तेवि
भासलें ॥ १ ॥

चला. जा. मजसमोर एक क्षणही उभे राहूं नका.

कीर्ति०—(स्वगत दुःखानें) हर ! हर !

पद—चाल–कांते फार तुला मजसाठीं.

आतां प्राण तरी मदनारी निघुनि न कां गेले ॥ काय असे त्यां कार्यावासी सौख्य जगावर कांहिं न उरलें ॥ ध्रु० ॥ कान्ताकटुवच परिसुनि साचें ॥ चित्तीं शल्यासम तें जाचें ॥ क्षणप्रभा कीं कडाडली शिरिं, हृदय वाटते विदीर्ण झालें ॥ १ ॥

हतभाग्या कीर्तिसिंहा ! तुझ्या आशावल्लीची मुळीच उपटली आतां काय राहिलं ? (स्तब्ध उभा राहतो.)

मोहि०—(रागानें) कां ? आतां कां उभे !

कीर्ति०—(स्वगत) मला अगदींच भान नव्हतें. ही पत्र वाचून काय म्हणते तें पहाणें आहे. (पत्राकडे बोट करितो.)

मोहि०—(तिरस्कारानें) खरंच. मी अगदींच विसरलें. दासानुदास आपल्या राजाधिराजांचं पत्र वाचायाचं राहिलं. असो. (पत्र वाचून) संतापानें अरे चांडाळा यवना ! काय लिहितोस ! मला वरण्याची इच्छा ? दुष्टा !

पद—चाल–रामकरीं जरि नृपपद गेले.

उदेपूरचा सिंहवंश कां ॥ जंबूका तुज नसे ठाउका ॥ अभद्र लिहितां कर न तुझा कां ॥ नराधमा गळला ॥१॥ पदें सर्पिणी कुणि तुडविली ॥ जाणुनि पावकिं उडी घातली ॥ तेंवि सती चित्तेंहि चिंतिली ॥ नराधमा सांगे ॥ २ ॥

(कीर्तिसिंहाकडे पाहून) हें पत्र घेऊन येणारे आपणच का रजपूत वीर ? धिःकार असो तुम्हाला.

[चाल सदर]

कां नच मजसम युवती झाला ॥ महा दोष हा असता टळला ॥ विमल कीर्तिला डाग लाविला ॥ चला निघा पाहूं ॥ ३ ॥

(पत्राचे तुकडे करून लाथेनें तुडवून) समजलात ? हें माझें उत्तर तुमच्या बादशहाला कळवा. त्याला सांगा कीं रजपूतांत बायका पुरुषांइतक्या दुःशील झाल्या नाहींत. चला जा. माझ्या समोर एक क्षणही उभे राहूं नका.

कीर्ति०—(आनंदानें स्वगत) लाडके ! यावेळीं तुझे कठोर शब्द मला मृदु पुष्पाप्रमाणें वाटत आहेत. ऐकायाचं होतं तें ऐकलं.

पद--चाल-माधवि सखि माधवि.

सुंदरी सखि सुंदरी । वाहति अंतरिं प्रेमसरी ॥ ध्रु० ॥ पीयूषापरि मधुर गिरा ही परिसुनि आस नुरे सखि दुसरी ॥ १ ॥ विमल तुझें हें चरित विलोकुनि, स्तवितिल त्या तुजला सखि अमरी ॥ २ ॥ स्वर्गहि होइल भूवरि मजला स्थान मिळे जरि तें तव अधरीं ॥ ३ ॥

मोहि०—(रागानें) का ? आतां कां उभे ?

(**कीर्तिसिंह** तिजकडे पहात जातो.)

मोहि०—(स्वगत) मी त्यांना इतकं टाकून बोललें पण तें आतां माझं मलाच खातय. पण माझी तरी काय चूक ? मी इतकी विनवणी केली तरी एकही अक्षर बोलूं नये का ? (विचार करून) त्यांची मुद्रा निराश कां बरं दिसत होती ? मला बाई कांहींच कळत नाहीं. जरा वहिनीसाहेबांकडे तरी जावं म्हणजे समजेल.

(जाते.)

प्रवेश पांचवा पूर्ण.

अंक चवथा समाप्त.

अंक पांचवा.

प्रवेश पहिला.

स्थळ--मोगल छावणीजवळील मैदान.

(**बचंभट** प्रवेश करितो.)

बचं०--(तपकीर ओढीत स्वगत) हूँ. इथून दिसतयसं पहावं. (उंच मान करून) अरे बेटया अगदीं बरोबर दिसतय. इथेंच उभं रहावं. पुढें जाण्यांत कांहीं हंशील नाहीं.

(**रामभट** धांदलीनें प्रवेश करितो.)

राम०—अरे बचंभट ! तुला मी केव्हांपासून सारखा शोधतोय. आणि तूं इकडे कोणीकडे ? साऱ्या छावणीभर हिंडलों तरी तुझा पत्ता नाहीं.

बचं----रामभट ! तूं अगदीं अजगर आहेस. सकाळीं कुठें सांपडेल तिथें शांतिपुष्टी करून, दक्षणा उपटून दुपारीं एकदां आडवा हात मारलास कीं झालास कुंभकर्ण ! दिली ताणून. अरे ! आज या मोगलांच्या मैदानावर रामसिंहाचं आणि मसाउदचं द्वंद्वयुद्ध आहे हें तुला माहीत नाहीं का ?

राम०--अँ काय ? अरे तो रामसिंह कुठें आणि मसाउद कुठें ? आणि त्यांचं द्वंद्वयुद्ध म्हणजे काय ?

बचं०--अरे ! कीर्तिसिंहाच्या पहाऱ्यांतून निशाण उपटलें गेलें तें तुला माहित आहे का ?

राम०--हो हो. त्या कीर्तिसिंहाला म्हणतात. अंग—

बचं०--जाऊं दे रे मूर्खा ! तें राजरहस्य आपल्या भटगड्यांना काय कारायचं ?

राम०—बरं. पुढें सांग.

बचं०—अकबरशहानें हा मसाऊद महाराण्यास नजराण्याबरोबर पाठविला. त्यांत लिहिलें होतें कीं हा मुद्रेवरून अपराधी ओळखतो. तेव्हां महाराण्यानें परवा दरबार भरवला. आणि मसाउदला सर्व

संस्थानिक दाखवून त्यांतला अपराधी म्हणजे निशाण उपटणारा ओळखण्यास सांगितलें. तेव्हां सर्व संस्थानिक बसले असतां त्यानें राणा रामसिंह याचा हात धरिला.

राम॰--(आश्चर्यानें) अरे बेट्या ! त्याला गुलामाला तोच चोर असें कसें कळलं रे !

बचं॰--अरे ऐकून तर घे. तेव्हां रामसिंह आला एकेरीवर. मग महाराणा व इतर संस्थानिक यानीं असें ठरविलें कीं दोघाचं द्वंद्व-युद्ध लावावं मग त्यांत जो जिंकील त्याचं खरं.

राम॰—वा: अगदीं योग्य न्याय केला. सत्यमेव जयते.

बचं॰--हें जेव्हां अकबरशहाला समजलं तेव्हां त्यानें महारा-ण्यापासून मसाउद्‌ला परत मागून घेतला. कालच अकबरशहाचं पत्र प्रतापसिंह महाराजांस आलं होतें. त्यांत त्यानें द्वंद्वयुद्धास आपल्या रणमैदानावर यावें अशी विनंती केली होती. शिवाय दुसरीही कांहीं हकीगत होती म्हणून म्हणतात. पण ती मला कांहीं बरोबर समज-ली नाहीं. असो ? तेव्हां तें युद्ध आतां होणार आहे. समजलास ? (वर मान करून) बघ. बहुतेक तयारी झाली.

राम॰--(पाहून) अरे वा: ते पहा सर्व लोक अगदीं उत्कंठित दिसत आहेत.

बचं॰—(वर मान करून) हं. तो बघ अकबरशहा आणि ते प्रतापसिंह महाराज जवळ जवळ बोलत बसले आहेत.

राम॰—(पाहून) हं खरंच. आणि तो घोड्यावर कोण रे ?

बचं॰—(पाहून) अरे तो रामसिंह.

राम॰—(पुन्हां पाहुन) अँ. अरे बापरे ! अरे बचंभट हा दुसरा कोणरे ? अगदीं नखशिखांत सजला आहे गुलामाचा ! आणि तूप लावलेल्या पोळीच्या पापुद्र्यासारख्या तुकतुकीत घोड्यावर बसला आहे.

बचं॰—(हंसून) आणि तसल्या पोळ्या खाऊन तुझें पोट तरी काय कमी तुकतुकीत दिसतय ! मग त्याची उपमा कां नाहीं दिलीस? तुला खादाडाला जलीं स्थलीं पोळीच दिसायची (पाहून स्वगत)

वा! आमचा तर्क अगदीं बरोबर जुळला. कीर्तिसिंहच हा. निशाणाचा चोर दासाच्या वेषानें पकडून प्रतापसिंहमहाराजांचा स्वतःवरील कोप कमी करण्यासाठीं हें सगळं केलंन. आलं सगळं ध्यानांत. असो! पण या रामभटाला ही कुलकथा सांगत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं. (उघड) अरे! तो कीर्तिसिंह कायरे!

राम०—अरे हो. पण याचा काय संबंध!

बच०—अरे जाऊंदेरे. कोणी कां असेना. आपल्याला काय क्षणभर मजा पाहायची झालें?

राम०—दुसरं काय तर!

बचं—(स्वगत) शुद्ध नंदी बैल आहे गुलामाचा (उघड) कां रामभट! जरा पुढें जाऊं चल.

राम०—(घाबरल्यासारखें करून) हां. हां. त्याचं अगदीं नांव काढूं नकोस.

बचं०—कां तिरपिटशी उडाली?

राम०—वा! मी घाबरलों असं कां समजलास! अरे बाबा भीरुभट्टाचार्यांच्या कंपमानस्मृतींत "ब्राम्हणो न रणं गच्छेद् भोजने दर्शये द्बलम्" असं स्पष्ट वचन आहे. तेव्हां बाबा "महाजनो येन गतः स पन्थाः" मी कांहीं घाबरलों असं समजू नकोस. हा रामभट असा भिणारा नव्हे समजलास!

बचं—(हंसून) बडबडाला लेका वाचस्पती आहेस. (वर मान करून पाहून) हं रामभट ती बघ झाली तयारी युद्धाची. कीर्तिसिंह बघ कसा रागावलेला दिसत आहे.

दोघे.(कांहीं वेळ पाहून) अरेरे! बिचाऱ्या रामसिंहा! काय दुर्दशा हो! असो? पण बेट्याचं नाक तरी वर आहे.

बचं०—बाकी याला फल मिळालं तें अगदीं यथायोग्य. "यादृशीं भावनां कुर्यात् सिद्धिर्भवति तादृशी." पूर्वी निशीत विजयसिंहानें निशाण उपटलं होतं; तेव्हां आतांही नांव त्याच्यावरच येईल असं तुला वाटलं होतं नाहीं? पण बाबा? ह्या हाताचे झाडे ह्या हा-

तावर तुझ्याविषयीं म्हणशील तर—मी इतका क्षमावान ब्राह्मण असूनही—मला मुळींच दया येत नाहीं.

राम-अगदीं बरोबर बोललास. बरं एकदां डबी पाहूं.

बचं—(तपकीरीची डबी पुढें करून हंसत) चालले लेकाचे डबी पाहूं. जशी कांहीं आमच्याजवळ ठेवायलाच दिली आहे.

राम--(चिमूट भरीत हंसत) अरे ! तसे तूं आणि मी तीन कां आहोंत ! अरे तुझं तें अस्मादिकांचं आणि अस्मादिकाचं तें अस्मादिकांच्या प्रपितामहांचं.

बचं०- (हंसून) भले महाराज ! फुकटंशास्त्री स्वार्थवाचस्पति ! (वर मान करून पाहून) अरे ! ती सगळी मंडळी त्या वाटेनं गेली. चल आपणही जाऊ.

राम०-हो. हो. चल.

(तपकीर ओढीत जातात.)

प्रवेश पहिला पूर्ण.

प्रवेश दुसरा.

स्थळ--प्रतापसिंहाचा दिवाणखाना.

(**प्रतापसिंह** व राजकुमार **कीर्तिसिंह**.)

प्रताप०--(गहिंवरून) कीर्तिसिंहा ! राजकुमारा !

पद—चाल---लाज येई रजनीस ऐसे.

लाजवील सुरपतिला जें विस्मयें विशाला ।
करुनि शौर्य ऐसें वरिलें विमलशा यशाला ॥ धृ० ॥
व्यर्थ दोष तुजला आम्ही लाविला नृपाला ।
कोमलांग तव मी वायां काय कष्टवीला ॥
वधुनि तुजसि शिव ! शिव ! येता डाग मत्कुलाला ।
सत्य; परी सत्याची त्यां लाज ईश्वराला ॥१॥

हृदयानंदकरा कीर्तिसिंहा ! तुला मी न ओळखतां दुःख दिलं याची तूं मला क्षमा कर.

कीर्ति०—(नम्रतेनें) हें काय ! थोरांनीं लहानाशीं क्षमा ती कशी मागायची !

दिंडी.

पर्वतांतुनि जलपूर जो निघाला ।
निम्न वाहे तो, जाइ ना शिराला ॥
क्षमा करणें वडिलास बालकानें ।
कधीं पूर्वीं मी नाइकिलें कानें ॥ १ ॥

शिवाय आपला त्यांत कांहीं दोष नाहीं. कारण—

पद—चाल-विधितनये पाव गे.

लिखिताचे खेळ हे । राजसुखांतुनि ओढुन नेइल दीन-पदां समजे न कदा विपदांचें स्थान हें ॥ ध्रु० ॥

जगत्प्रभू परि त्या रामातें लावियला वनवास पहा मग कोणा सोडि हें ॥ १ ॥

सर्वंकष विधि आहे निश्चित चित्त सचिंत न उचित असें मग सोडा दुःख हें ॥ २ ॥

प्रताप०—(स्वगत) थोर तो थोर. याला मीं इतकें दुःख दिलें तरी हा कोणत्याही प्रकारचा द्वेष दाखवीत नाहीं. (उघड) कीर्तिसिंहा ! तूं फार थोर आहेस म्हणूनच तुला तसं वाटत आहे. अथवा—

दिंडी.

सत्व घेतां सौजन्य अधिक येतें ।
सत्वशीलां शालीन सज्जनातें ॥
घाशितां त्यां चंदनां कस्तुरी ती ।
घोटितां कीं सौरभ्य अधिक देती ॥ १ ॥

कीर्ति०--(नम्रपणानें) बालक इतक्या स्तुतीला मुळींच पात्र नाहीं.

प्रताप०--कीर्तिसिंहा ! म्हणतात तें अक्षरशः खरें आहे.

पद--चाल-हे प्रभो विभो अगाध.

ती कुमारिका स्तुतीसुता कीं अजुनी ॥ ना घटत कुठेंही सुजनी ॥ध्रु०॥ इष्ट तें न इच्छिति तिजला ॥ तत्कामुक तिज नच रुचला ॥ यापरी महाजन वदला ॥ अवलोकित तें मी नयनीं ॥ १ ॥

सज्जन स्तुतीला पात्र असतात तर त्यांना ती आवडत नसते. आणि दुर्जन—(आठवल्यासारखें करून रागानें) अरे मी अगदींच विसरलों होतों. हरामखोरा रामसिंहा ! तुला आजच वर झाडा देण्याकरितां पाठवितों.

कीर्ति०—(विनयानें) इतका राग करण्याचें कारण नाहीं.

पद—चाल-प्रिये पहा रात्रीचा.

दयानिधे मानावी उपकृतिकर रीति महासंमता ॥ध्रु०॥ नसतां तम जगतावर ॥ तेजोनिधि तो दिनकर ॥ खद्योतापरिस इतर ॥ खचित पाहि भासता ॥ १ ॥ निकषासम दुर्जन जन ॥ नसता ते काय सुजन ॥ दुःखरहित सुख समान ॥ रुचि न देत तें सतां ॥ २ ॥

म्हणून मी म्हणतों कीं त्यांवर महाराजांनीं इतकें रागावूं नये.

प्रता०--बाळा ! तुझं भाषण शीलास अनुसरूनच आहे. परंतु--

साकी.

पिउनि, मधुरही नित्य पयातें आशीविष दे गरळां ॥
उपकृति करितां करित दुष्कृति खल, ना लाज तयाला ॥
म्हणुनी शासन तें ॥ उचितचि दुष्टां मज गमतें ॥१॥

कीर्ति०—परंतु त्याला आतां कृतकर्मांचा प्रश्चात्ताप होईल असें मला वाटतें.

प्रता०—असो ! कीर्तिसिंहा ! मला सर्व वृत्तांत अकबरशहानें कळविला आहे. अकबरशहाचा व तुझा स्नेहभाव झाला ही फार आनंदाची गोष्ट आहे. परंतु मूळ तशा गुप्त वेषानें राहून तूं जिवाला इतके कष्ट कां घेतलेस ?

कीर्ति०—वडिलांचा वृद्धापकाळ झाला असल्यामुळें त्यास सोडून मी युद्धाला यावें अशी त्यांची इच्छा नव्हती. त्यांची इच्छा उघड न मोडतां मी गुप्त वेषानें एका सेवकासह आलों.

प्रता०—शाबास ! कीर्तिसिंहा ! तुझी धर्मप्रीति पाहून मला फार आनंद होत आहे.

[**पहारेकरी** प्रवेश करितो.]

पहा०—(लवून मुजरा करून) जयपूरच्या महाराजांकडून जासूद आला आहे. त्याच्यासांगण्यावरून त्यांची स्वारी अगदीं नजीक आली आहे असं समजतं.

प्रता०—ठीक आहे. ही सर्व हकीकत कुमारसिंहाला सांग. आणि सर्व व्यवस्था त्यानें स्वतः करून तयार असावें असें त्याला कळव.

पहा०—आज्ञा सरकार.

[**पहारेकरी** जातो.]

कीर्ति०—(स्वगत बाष्पाकुल) हर ! हर ! ताता ! आपणाला मजकरितां इतक्या लांब कष्ट घेऊन यावें लागलें !

पद—चाल–थोर तुझे उपकार.

प्रेमाला नच पार ॥ तात कीं ॥धृ०॥ वयोवृद्ध
परि वात्सल्यानें कष्टाचि घेत अपार ॥१॥ वार्द्धकिं
दिधले क्लेश तुम्हांला दुष्ट असे मी फार ॥ २ ॥
चिंतुनि हें मम स्नेहजलानें नेत्र भरति अनिवार ॥३॥

प्रता०—(स्वगत) रणसिंह महाराजांस मी सामोरा जाणें

इष्ट आहे. परंतु प्रथम या कुमाराचे हेतु पूर्ण केल्याशिवाय कांहींच करूं नये असें मला वाटतें. (उघड) कीर्तिसिंहा ! तुझ्या सर्व श्रमांची सार्थकता करावी असा माझा विचार आहे.

कीर्ति०--(स्वगत) चित्ता ! असा अधीर होऊं नकोस. तुझ्या इच्छेचाच उपक्रम आहे (उघड) तें करण्यास महाराज समर्थ आहेतच. परंतु कोणत्या गोष्टीनें तें कळल्यास बरं.

प्रता०—कीर्तिसिंहा ! तुला आतां संशयांत ठेवीत नाहीं.

पद—चाल–अति कोपयुक्त होय परी.

तुज अर्पुनियां भगिनीतें गेहिनीपदीं ॥ धृ० ॥
मुक्त होई चिंततुनि ॥ ज्याचें त्या जात मिळुनि
वृक्षावारि वल्लि चढुनि ॥ सुकुमारा, सागरा नदी॥ १

चल तर. मला पुन्हां रणसिंहमहाराजांस सामोरं गेलें पाहिजे.

(जातात.)

प्रवेश दुसरा पूर्ण.

प्रवेश तिसरा.

स्थळ—मोहिनीचा महाल.

(**मोहिनी** बसली आहे.)

मोहि०—(स्वगत) निशाण उपटणाराचा तपास लावून देण्याकरितां का दासाचा वेष स्वीकारला होता ! प्रियकरा ! या दासीकरितां आपल्याला किती कष्ट पडले ! त्यांची आठवण झाली म्हणजे माझ्या अंगावर कांटा उभा राहतो. अजून तरी दादांचा राग कमी झाला असेल किंवा नाहीं ?

पद—चाल–ठेऊ देह कशाला आतां.

झाले क्लेश तुम्हांला कांता ॥ ध्रु० ॥ केले तुह्मां दास
सख्या मी । दावुनि प्रेम विशाला ॥ १ ॥ प्राणावरही

संकट आले । डागहि ये सुयशाला ॥ २ ॥ किती कि-
ती तरि वदू मुखानें । बहुत छळी तुह्मांला ॥३॥

(विचार करून) पण तो मूल्यवान पोषाख कुठला ! प्रियकरा ! आपण दिसता त्यापेक्षा निराळे असाल का ? (विचार करून) मी वेडी तर नव्हेना ? अकबरशहाची आणि तिकडची मैत्री आहे तेव्हां त्यानेंच तो दिला असेलं झालं.

(**दासी** प्रवेश करिते.)

दासी–ताई साहेब ! कीर्तिसिंहासबरोबर घेऊन दादासाहेब येत आहेत अशी वर्दी घेऊन जासूद आला आहे.

मोहि०–(धांदलीनें) अग मग अशी उभी काय राहिली आहेस त्यांना बसायाला आणून ठेवशील कीं नाहीं.

दासी०–जी ताईसाहेब. (जाते व दोन आसनें घेऊन येते.)

मोहि०–हं जा तूं आतां.

दासी०–जी ताईसाहेब.

[**दासी** जाते.]

मोहि०–(स्वगत) जगदंबे ? माझे हेतू आज पुरे होणार का ! प्रियकरा ! आज आपण माझ्या महालांत येणार का ! (खिडकीशीं जाऊन पाहिल्यासारखें करून) अगबाई ! खरच येणं झालं.

पद–चाल–रजनिनाथ हा नभी उगवला.

मदनकांत हा सखा प्रगटला । कामतरू मम काय
किं फुलला ॥ धृ ॥ तृषित नराला सर हें गवसलें ।
सफल दिसे कीं लिखितचि झालें । चातक-मुखिं
जल जलदें दिधलें । ब्रम्हानंद यतीला आला ॥ १ ॥

आतां अगदी तयारीनें असलं पाहिजे. (बसते.)

(**प्रतापसिंह** व **कीर्तिसिंह** प्रवेश करितात.)

मोहि०–(लाजून उभी राहते.)

प्रता॰-ताईसाहेबांना आम्ही आजपर्यंत फार दुःख दिलं. परंतु तें सर्व विसरेल अशी माझी खात्री आहे. मोहिनी ! आजपर्यंत जें कीर्तिसिंह नुसते शिपाई म्हणून होते ते जयपूरचे युवराज म्हणून समज.

मोहि॰-(स्वगत) आता मात्र माझं भानच नाहींसं झालं ?

प्रता॰-(हंसून) कां ताईसाहेब ! आतां कसं काय वाटतं ? (कीर्तिसिंहाकडे पाहून) कीर्तिसिंहा वडील मंडळीच्या विचाराप्रमाणें दिवस पाहून लग्नसमारंभ साजरा करितां येईल. त्याचा विचार आतां करणें जरूर नाहीं. तरी क्षात्रधर्माला अनुसरून आज-(मोहिनीचा हात त्याच्या हातांत घालून)

साकी.

आनंदे कर भागिनीचा हा कीर्तिसिंह करिं दिधला ।
स्वीकारावा प्रेमभरें हा, गति नच दुसरी तिजला ।

कीर्ति॰—(सविनय) आज्ञा मान्य असे । टाकिन सुरत्न मी कैसें ॥ १ ॥

(पडद्यांत)

" जयपूराधिपतीचा जयजयकार "

प्रता॰-(ऐकून) कीर्तिसिंह ! रणसिंह महाराजांची स्वारी आलीशी वाटते तरी मी पुढें जातो. तुम्ही मागाहून या.

[**प्रतापसिंह** जातो.]

कीर्ति॰-(स्वगत) माझ्या सर्व श्रमांचे सार्थक झाले. (मोहिनीकडे पाहून)

पद-चाल-उठि प्रभातमा पोरमा.

सौंदर्यनिधी हा करीं । पातला कीं करी । क्लेश माझे
दुरी । खचित सारे ॥धृ॰॥ शशिसुंदरमुखि सुंदरी । भान
माझे हरी । दुःख राहे दुरी । लपुनि सारें ॥१॥

(जवळ जाऊन) सुंदरी !

मोहि॰–(दूर जाऊन स्वगत) असं काय बाई मला होतयं !

पद–चाल–दासी ऐसें मानुनिया.

कांत मला एकांती कांतवचें रिझवितसे ।
दिवस सोनियाचा बाई, हर्ष मनीं होत असे ।।धृ०।।
उत्सुकजरी मीहि तरी कंप देहिं सुटत असे ।
बोलु कैशि चालु कैशि कांहिं मला सुचत नसे ।।१

कीर्ति—(स्वगत) वाः पूर्वी मजजवळ ही प्रौढ भाषण करी. परंतु आतां लज्जेनें–

दिंडी.

जवाळि जातां ही दूर भिउनि जाते ।
धूतवल्लीसम कंपमान होते ।
प्रणय भाषणिं जरि मौन दर्शवीते ।
सखी मजलागी बहुत सौख्य देते ।। १ ।।

(उघड जवळ जाऊन) सुंदरी·प्रिये !

मोहि॰–(दूर जाऊन स्वगत) काय बाई या भित्रेपणाला ह्मणावं!

पद––चाल–किती कपटि असशि तू.

मन गमत मजसि हें सभय सभय ।। धृ०।। रतिलोलुप मज विनवित असतां दावुनि प्रियकर प्रणय प्रणय ।। १ ।। आलिंगनपर प्रियकर असतां दे दर मजला विनय विनय ।। २ ।। सुरतसमय हा नवा म्हणुनि कां दावित धीरां विलय निलय ।। ३ ।।

माझा धीर अगदीं नाहींसा झाला आहे.

कीर्ति॰–(जवळ जाऊन) सुंदरी, तूं एकांतात असं मौन किती वेळ धरणार !

मोहि०—(दूर जाऊन स्वगत) इथें येण्यापूर्वी मी मनांत किती तरी ठरवून ठेवलं होतं !

पद—चाल–अर्पिलें सुमन तें.

चिंतिले विविध मी विलास चित्तीं पूर्वीं ॥ धृ० ॥
परी भीति कसें हें मन वी ॥
जवळि हा शत्रुहा रवी ॥
येतां ॥ धराला ॥ कराला ॥ रतोत्सवीं ॥ १ ॥

पण आतां माझं तोंड कांहीं उघडत नाहीं.

कीर्ति०—(जवळ जाऊन) सुंदरी !

पद—चाल–तुझी स्मृति मजला होउनिया.

वरी कमलनाभ कमलेला उदधिमंथनें ।
तेविं मीहि तुजसि बहुकष्टें चंदिराननें ॥ धृ० ॥
होतां तो इष्ट लाभ । तुष्ट होय कमलनाभ । तेंवि मीहि गे १

तुझी प्राप्ति झाल्यामुळें माझे सर्व श्रम दूर झाले. परंतु लाडके ?

पद—चाल–बहुनीपतरू फुलुनि.

पृथुजघनभरे मृगनयने हे नितंबिनी त्वरा करी ।
परिरंभा देइ सखे रम्य मंदिरीं ॥ धृ० ॥
झडकरि ये धरवेना धीर अंतरीं ।
स्पर्शसुखें तोषवुनी क्लेश तूं हरी ॥
सुंदरि हा देह तरु तूं लतेपरी ।
ह्या अंतरंगभंगकुशल कुसुमशरां वारी ॥ १ ॥

मोहि०—(स्वगत)

पद—चाल–अहा माझा प्राणपती.

नसे आतां धीर मुळिं ॥ धृ० ॥

संमोहक हें वचन परिसुनी भीति पळाली समुळिं ॥
लाज धरावी कां एकांतीं खचितचि मी ही असे खुळी ॥१

(आलिंगन देते.)

कीर्ति०-(साल्हाद) अहाहा !

पद--चाल-जरि नाहिं कमल तें करीं.

स्पर्शेंच मदनमंजरी । सुखवि सुंदरी । मजासि अंतरीं ॥
ही मदनागद कीं खरी ॥ ध्रु० ॥
मद मार्दवि सारा हरी । शिरीषावरी । सरि सखीं करी ॥
नवनीत राहिलें दुरी ॥ १ ॥
ही झषकेतनकर्त्तनी । बोधिली जनीं । मजासि परि मनीं ॥
सुखविते बहुत गुणखनी ॥२॥
ह्या विमलवारिवाहिनी-॥--तुल्य कामिनी । दाविती अधरां ।
कामुकां शीतसा झरा ॥ ३ ॥

(चुंबन घेतो.)

बरं आतां उभं किती वेळ राहणार ! (पलंगावर बसतात.)

मोहि०--प्राणनाथ--

पद—चाल-भूपती खरें तें वैभव.

एकांति बोलले सोडुनि कांता विनयां ॥ तें फार
जाचतें अतां प्रिया यां हृदयां ॥ धृ० ॥ सद्रत्न
परी मी कांचशकल मानुनियां ॥ दूषणें लाविली
सख्या आपणां वांया ॥
विनविते करां मी आतां जोडुनि ॥
ही घ्यावी विनती माझी मानुनी ॥
मज दुजा आसरा नाहीं त्रिभुवनीं ॥

जें अयुक्त झाले त्याकारितां हो सखया ॥ मी क्षमा
मागतें पदर पसरुनि सदया ॥ १ ॥

कीर्ति॰--(हंसून) वाः हें सर्व मौन क्षमेकरतां का धारण केलें होतें ! आम्हांला कांहीं निराळेंच वाटलें.

मोहि॰--(स्वगत) आतां ही कशाची सुरवात आहे !(उघड) निराळें तें काय वाटलें !

कीर्ति॰--आम्हाला वाटलं हें उसनं फेडलं.

मोहि॰--(स्वगत) मल . वाटलंच होतें कीं त्याला अनुलक्षूनच कांहीं तरी निघेल म्हणून. (उघड) हें काय गडे ! पण मी आतां क्षमा मागितली ना ! आणि त्यावेळेस मी तरी काय समजूं ? (लडिवाळपणानें) खरंच गडे ! त्यावेळेस तसें मौन कां धारण करायचं ?

कीर्ति॰--हें पहा ! दासाच्या वेषानें आल्यापासूनच प्रतापसिंहमहाराजांच्या मनांत माझ्याविषयीं शंका आली होती. आणि त्यांनीं मला तुजकडे पत्र घेऊन येण्याची जेव्हां परवानगी दिली तेव्हां अगदीं एक अक्षरही बोलण्याची सक्त मनाई केली होती. त्यामुळें माझा निरुपाय झाला.

मोहि॰--(आठवल्यासारखें करून) खरंच गडे पण मी अगदींच विसरलें होतें. तसलं घाणेरडें पत्र आपण कसं बरं घेऊन यावें?

कीर्ति॰--प्रिये ! तूं अकबरशहाविषयीं कुकल्पना धरूं नकोस. तो फार नीतिमान् आहे. त्यानें मजकारितां किती कष्ट केले हें तुला माहित आहेच. हकीमाच्या वेषानें प्रतापसिंहमहाराजांस त्यानेंच औषध दिलें व मलाही त्यानेंच सोडवून नेलें. निशाण उपटणाऱ्याचा तपास त्यानेंच लावला होता.

मोहि॰--(साश्चर्य) म्हणजे ? तो कसा ?

कीर्ति॰--अमीराच्या वेषांत जेव्हां त्याचा आणि माझा स्नेहभाव झाला. तेव्हांपासून त्यानें माझ्या रक्षणाकरतां एक गुप्त हेर ठेवला होता. मी तुजकडे आलों तेव्हां त्याचा हेर निशाणाजवळ होता. त्यानें रामसिंहास निशाण उपटतांना पाहिला आणि यामुळेंच मी त्या दिवशीं त्याला नेमका धरला.

मोहि०—खरंच का ? मग बाई तो फार चांगला आहे. पण तें पत्र कां बरं त्यानें लिहावं ?

कीर्ति०—त्याच्या विनंतीवरून तो मी (तिला जवळ घेऊन) माझ्या लाडकीच्या प्रेमाला कस लावला.

मोहि०—(सगद्गद) रात्रंदिवस हृदयांत वास करणाऱ्या प्रियकरा ! अद्याप तरी खात्री झाली का ?

पद—चाल–त्या मदनमनोरमरूपीं.

ह्या कमलसुकोमल चरणीं ॥ पूर्वीच अर्पिलें सुमनां ॥
निशिदिनीं अन्य ह्या चित्तें ॥ नाहींच चिंतिलें रमणा ॥
हें कांत रूप मम दिसलें ॥ ब्रम्हसे सर्वगत नयनां ॥
॥ चाल ॥ दिनरात्र शयन मज नाहिं ॥ चित्तिं तळमळ हि ॥ तिळहि करमेना ॥ किति सांगूं मज वदवेना ॥ १ ॥

कीर्ति—(तिला हृदयाशीं धरून) लाडके !

दिंडी.

जाति सुंदर परि वन्हिसंग होतां ॥
कांचनाचीही कांति अधिक कांता ॥
सुपथगामिनि तूं अधिक सौख्य देशी ॥
निकर्षि उद्वेगां देशि कां मनाशीं ॥ १ ॥

हँ. वाः ! हें काय ! डोळे पुसा. (डोळे पुसतो.)

(पडद्यांत.)

" जयपुराधिपतींचा विजय असो. "

कीर्ति०—(ऐकून) लाडके ! तीर्थरूपांची स्वारी प्रतापसिंहमहाराजांच्या भेटीला आली असं दिसतं. तरी मला आतां गेलं पाहिजे.

मोहि०—पण काम झालं कीं यायचं हो ! (थट्टेनें) नाहींतर पहाऱ्यावर जाणं होईल.

कीर्ति॰–(थट्टेनें) अग हो ! मी अगदींच विसरलों ! इतकं झालं तरी माझ्या मागचा पहाराही सुटला नाहीं आणि निशाणही सुटलें नाहीं.

मोहि॰----(निराश होऊन) म्हणजे काय ? अजून दादासाहेब तेंच सांगणार का ?

कीर्ति॰----(हंसून) तें आतां निरंतरचेंच लागलें. प्रतापसिंहमहाराजांचीच नोकरी बरी होती असं आतां वाटूं लागलं आहे. कारण----

साकी.

मदननृपाची विजयपताका तूं मृगनयने असशी ॥
सेवक त्यानें केलें मजला विन्मुख मी कार्याशी ॥
सखये होउं कसा ॥ लाविल शासन मज सहसा ॥१॥

मोहि॰---(लाजून) काय तरी बाई ! मी म्हटलं खरंच.

कीर्ति॰----(हंसून) मग हें सारं खोटच वाटतं. बरं चला जाउंद्या आम्हाला. हं एक—(चुंबन घेतो.)

[**कीर्तिसिंह** जातो.]

मोहि॰---(स्वगत) जगदंबे ! तुझ्या कृपेमुळं आजचा दिवस दिसला नाहींतर मला कांहीं मुळींच आशा राहिली नव्हती.

[**मधुकारिका** प्रवेश करिते.]

मधु॰---(हंसत) ताई ! बरीच आहेस किंग !

पद—चाल—रुचती कां तीर्थ यात्रा.

रणभूमी केलिभूमी केली त्वां मोहिनी ।
जिंकाया म्हणुनि आले जित त्यांना करवुनी ॥
अबला हें नाम देई युवतीना जो कवी ।
असतां तो आज येथें मानचि गे वांकवी ॥ १ ॥

मोहि॰----(स्वगत) आधींच हिला थट्टा करायला नको. तशांत हें कारण झालं. आतां काय विचारावं ! (उघड) अग पण बसशील तर खरी.

मधु०—अग मी कांहीं बसायला नाहीं आलें. तुला वहिनी-साहेबांनीं बोलावलं आहे. चल.

मोहिनी—चल तर.

(दोघी जातात.)

प्रवेश तिसरा पूर्ण.

प्रवेश चवथा.

स्थळ—अरण्यनाथ साधूंचा मठ.

(**अरण्यनाथ प्रतापसिंहादि** रजपूत वीर बसले आहेत.)

अर०—(स्वगत) जें कार्य युद्धानें प्राप्त व्हावयाचें तें अनायासेंच जुळून आलें. अकबरशहा पुष्करतीर्थ सोडणार असें जेव्हां मला समजलें तेव्हां फार समाधान झालं. (उघड) प्रतापसिंहा ! कीर्तिसिंहामुळें जे एकंदर विपरीत योग प्राप्त झाले होते त्या सर्वांचा शेवट त्याच्याच गुणांमुळें अतिशय समाधानकारक झाला ही फार आनंदाची गोष्ट आहे. मी तुला कीर्तिसिंहाविषयीं शिफारस केली. त्याचें कारण तुला समजलें नसल्यामुळें तूं संशयांत पडला असशील. तर ऐक. तूं कीर्तिसिंहास शिक्षा केलीस तेव्हां मी त्यास त्याचें वसतिस्थान विचारलें. त्या समयीं त्यानें आपली खरी स्थिति सांगितली. परंतु ती कोणाजवळही सांगणार नाहीं असें त्यानें मजकडून कबूल करविलें होतें. त्यामुळें त्या वेळेस मला अधिक सांगतां आलें नाहीं. (कीर्तिसिंहाकडे वळून) कीर्तिसिंहा ! तुझ्या अलौकिक सामर्थ्यामुळें तुला आज जें महाश्रेय मिळणार आहे तें योग्यच आहे. तूं आपल्या गुणामुळें अकबरशहास वश करून घेतलास आणि एक महत्कार्य घडवून आणलंस. असो ! तुला अधिक सांगण्याची अवश्यकता नाहीं. परंतु ऐक.

पद—चाल-मुला सांग नृपतीस.

महाशूर तूं योग्य उपदेशकार्यीं ।
प्रीति आहे तुझी देशकार्यीं ॥धृ०॥

घेशि जन्मासि तूं क्षत्रियाच्या कुळीं ।
सार्थ पद तें करी, भूमि पाळी ॥
वर्णगुरु आदरी जोडुनी अञ्जली ।
दाखवी साम्यता प्रेम आर्यीं ॥१॥

कीर्ति०---(नम्रपणानें) गुरुमहाराजांची आज्ञा मला शिरसा वंद्य आहे.

पद —चाल–परिणिले न मुनिकन्येला.

मम जन्मभूमिसेवेला ॥ हा देह सदोदित दिधला ॥ गुरुवरा ॥ जरि देशकार्यिं हा पडला ॥ सार्थकत्व आले त्याला ॥ गुरुवरा ॥ नच आस दुजी चित्ताला ॥ स्वातंत्र्य आर्यमातेला ॥ गुरुवरा ॥ शंकरां । स्मरुनि सुरवरां । वदत मी गिरा । देह हा दिधला ॥ निष्काम देशसेवेला ॥ गुरुवरा ॥ १ ॥

अर०--(संतुष्ट होऊन) शाबास कीर्तिसिंहा ! तुझ्यासारखे निश्चयी पुरुष निपजल्यावर काय होणार नाहीं ?

[सपरिवार **अकबरशहा** प्रवेश करितो.]

अक०--सलाम साधुमहाराज.

अर०---अकबरशहा बैस.

अक०---(बसून) साधुमहाराज ? आपणांस पूर्वीं कळविल्याप्रमाणें आम्ही मालिक महाराणा प्रतापसिंह व कीर्तिसिंह यांच्या शौर्यादिगुणांवर लुब्ध होऊन पुष्करतीर्थ हिंदूंचे स्वाधीन केलें आहे. मालिक महाराणा यांस हें आम्हीं पूर्वी कळविलेंच आहे.

प्रता०—शहानशहा ! तुमच्यासारखा उदार शत्रू मिळाल्यामुळें आम्ही कृतकृत्य झालों.

अर०---अमो ! अकबरशहा ! प्रतापसिंहा ! एकंदर कथानकाचा शेवट गोड झालेला पाहून आम्हांस फार संतोष होत आहे. तुम्हीं

दोघेही स्तुतीस पात्र आहांत. असो! (कीर्तिसिंहाकडे वळून) कीर्तिसिंहा! आतां तुझी काय इच्छा आहे ?

कीर्ति०--गुरुमहाराजांच्या कृपेमुळें सर्व इच्छा पूर्ण झाल्या आहेत. तथापि----

पद--चाल--तुम जागो मोहन प्यारे.

गतवैभव आर्यां यावें ॥ परवश आम्ही कधिं न असावें ऐसें मनिं उमजावें ॥ धृ० ॥ देशद्रोहां स्थान नसावें ॥ भीरुत्वहि तें विलयां जावें ॥ समत्त्व लोकीं दृढ बाणावें ॥ प्रभुनें साह्य करावें ॥ १ ॥

अरण्य--तथास्तु. तथास्तु. तथास्तु.

(पडदा पडतो.)

॥ श्रीशिवःशरणम् ॥

प्रार्थना.

पद--चाल--शंकरा पामर हा नर.

उमावरा, नश्वर हें क्षर, अक्षर प्रभुवर तूंचि खरा ॥धृ० हें दासां यां मनिं उमजाया मति या ठाया देइ हरा ॥ हा भव निष्फल समजुनि निष्फल उमजाविण फल नये हरा ॥ तत्व दावुनी मज तारा दातारा सुरेश्वरा ॥१॥ सोडुनि तव पद भक्तसुसंपद फिरतो बहुमद मूढ खरा ॥ मोहगदातें त्रिपुराराते धरुनि करातें शिरीं हरा ॥ दयासिंधु हें पद हेरा गुणाकरा सार्थ करा ॥२॥ ईप्सित सदया करुनि मसि दया पुरविशि राया मदनदरा ॥ कवितकुसुमितां प्रेमग्रथितां अर्पित हारां कंठिं धरा ॥ द्यावा आश्रय भक्तवरां मनोहरा शुभंकरा! ॥ ३ ॥

॥ श्रीसांबसदाशिवार्पणमस्तु ॥

॥ श्री ॥

श्रीज्ञानदेव

श्रीनामदेव श्रीएकनाथ

गाथापंचक

श्रीतुकाराम श्रीनिळोबा

यांच्या समग्र अभंगांच्या गाथा.

हे ५ ग्रंथ घेणारास किं. ५रुपये--व्ही. पी. नें ५८१५.

शिवाय कबीर, मिराबाई इत्यादि सकल संतांच्या अमृतवचनांना येत्या कार्तिकांत प्रसिद्ध होणारा ग्रंथ

श्रीसंतगाथा

हा गाथापंचकास मदत देणारे राजेरजवाडे व सद्गृहस्थ ग्राहक यांच्या मदतीची नांवानिशी जोडून [वा.ट. खर्चापुरतें] ८५च्या व्ही. पी.नें नजर करण्यांत येईल.

☞ इतका स्वस्त ग्रंथ कोणीही दिला नाहीं. इतर कोणतीही गाथा या गाथांशीं ताडून पहा ! असे ग्रंथ अशा सवलतीनें पुढें मिळणार नाहीत.

श्रीनानामहाराज साखरेकृत

सान्वय व सार्थ भगवद्गीतेसह सटीप व सार्थ

ज्ञानेश्वरी

आवृत्ति दुसरी—छापत आहे.

आगाऊ कार्तिकापर्यंत नांवें नोंदणारास किंमत दोन रुपये. मागाहून तीन रुपये. टपाल व्ही. पी. वगैरे खर्च निराळा पडेल.—आगाऊ नांवें नोंदवा.

त्र्यंबक हरि आवटे, मालक इंदिरा प्रेस पुणें सिटी.